म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं.

"…पन्नाशीच्या आनंदोत्सवाचें स्मारक."

…द्वारा

# …वेध'-काव्यमाला.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८४२.
सन १९२१

काव्य सं ५८४

REFBK-0001969

किंमत १ रुपया.

म. ग्रं. सं. ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. [illegible]
[illegible] ठाणा

"विविधज्ञानविस्ताराच्या पन्नाशीच्या आनंदोत्सवाचें स्मारक."

ग्रंथ तिसरा.

# 'विविध'-काव्यमाला.

अथवा

अर्वाचीन कवींनीं 'विविधा'च्या या खास ग्रंथासाठीं लिहिलेला

## काव्यसंग्रह.

REFBK-0001969

REFBK-0001969

दा. क्र. १९९८

[ पुनर्मुद्रणाचे वगैरे हक्क प्रकाशकांनीं स्वाधीन राखले आहेत. ]

जुलै १९२१

किंमत १ रुपया.

प्रकाशकः—नाडकर्णी आणि मंडळी यांच्यासाठीं
अनंत आत्माराम मोरमकर, ८१ फणसवाडी, मुंबई.

प्रिंटरः—अनंत आत्माराम मोरमकर, श्रीलक्ष्मीनारायण प्रेस,
४०२ ठाकुरद्वार, मुंबई.

# दोन प्रास्ताविक शब्द.

१. विविधज्ञानविस्ताराच्या पन्नाशीच्या आनंदोत्सवार्थ छापूं योजिलेल्या तीन ग्रंथांपैकीं प्रस्तुतचा ग्रंथ एक असून तो अर्वाचीन कवितेस अर्पण केला आहे. प्रतिभावंत म्हणून नांवाजलेल्या सर्व विद्यमान–तसेंच अगदीं अलीकडेच मृत झालेल्या–कवींच्या कृतींस स्थल दिलें जावें असा हेतु धरून हा ग्रन्थ तयार करण्याची योजना ठरविली; व सदर हेतु दृढ निश्चयानें तडीस नेण्याचा यांत यत्न केला आहे. वस्तुतः हा ग्रंथ १९२० च्या आरंभींच प्रसिद्ध व्हावयाचा. परंतु ग्रंथविषयच असा होता कीं, तो घाईनें पुरा करणें म्हणजे 'निरंकुश' असलेल्या कवींना रश्मिबंधन करूं इच्छिण्यासारखें होतें. तें करण्याचा यत्न केला असता तर ग्रंथांत न्यूनव्यंग्यें राहतीं, व त्याबद्दल रसिकांनीं आम्हांस दोषच दिला असता. छापखान्यासंबंधींच्या कांहीं विशिष्ट अडचणींनींही विलंब होण्यास मदत केली. परंतु रसिकजनांस सादर केलेली ही अभिनवकाव्यरत्नांची माला आमच्या सर्व अपराधांबद्दल आमच्या गुणज्ञ वाचकांकडून आम्हांसाठीं क्षमा मिळवून घेईल अशी खात्री वाटते.

२. ह्या ग्रंथाच्या स्वरूपाविषयींचें श्रेय आणि जबाबदारी हीं आमच्या वाचकांस सुपरिचित असलेले आमचे चिरसंबंधीय मित्र रा. रा. दामोदर गणेश पाध्ये, एम्.ए., यांजकडे आहे. आलेल्या कविता त्यांजकडे दिल्या गेल्या व त्यासंबंधींचें निवडानिवडीचें व त्याशिवाय संपादकत्वाचें सर्व तऱ्हेचें काम त्यांनीं केलें. आपला अमोल वेळ खर्च करून आम्हांस त्यांनीं हें जें बाह्यतः अकृतज्ञतामय पण परममहत्त्वाचें साह्य दिलें व तदनुरोधें महाराष्ट्रभाषामातेची सेवा केली त्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानितों; व आमचे वाचकही त्याचा अनुवाद करितील अशी खात्री आहे.

३. या ग्रंथांत सर्व अर्वाचीन कवींच्या कृतींचा समावेश व्हावा व त्यांपैकीं कोणीही प्रमुख कवि वगळला जाऊं नये असें जागृत ध्येय ठेविलें होतें. म्हणून ग्रन्थासाठीं खास असें आपलें एकादें काव्य धाडण्या-

साठीं सर्व कविवर्गास जाहीर विनंती करण्यांत आली होती, आणि शिवाय परिचित मित्रांस खासगी पत्रेंही पाठविण्यांत आलीं होतीं. त्यास अनुसरून ज्यांनीं काव्यें पाठविलीं त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहों. एखाद्या श्रेष्ठ आणि कसलेल्या कवीची कृति या ग्रंथांत न आढळल्यास त्याचें कारण त्या कवीबद्दलचें आमचें अज्ञान अथवा त्या कवीचा स्वतःसंबंधींचा भिडस्तपणाच होय असें वाचकांनीं समजावें, अशी आमची प्रार्थना आहे.

४. या '**विविध**'-**काव्यमालें**त एकंदर ५ कवयित्री आणि ६३ कवि यांच्या कवितांचा संग्रह करण्यांत आला आहे. प्रत्येक कविता अर्थात् त्या त्या कवीची सरसांत सरस म्हणून निवडलेली आहे. यांतील पुष्कळशा कविता मात्रागणवृत्तात्मक असून, रागदारींत म्हणतां येतील अशीं थोडीं पद्येंही यांत संग्रहित केलेलीं आढळतील. शिवाय अलीकडे प्रचलित झालेल्या नव्या स्वरूपाच्या वीणाकाव्याचेही बरेचसे नमुने यांत पाहावयास मिळतील. निर्यमक कवितेचाही एक नमुना–आणि तोही तिच्या आद्यप्रवर्तकाच्या हातचा–आहे. तात्पर्य, ही **काव्यमाला** '**विविधा**'ची ऊर्फ विविधज्ञानविस्ताराची आहे असें जसें म्हणतां येईल, तसेंच 'विविध'कवींच्या विविध विषयांवरील काव्यांची माला अशा अर्थीं सुद्धां प्रस्तुत पुस्तकास दिलेलें नांव अत्यंत सार्थ असल्याचें आढळून येईल.

५. ग्रंथांत समाविष्ट झालेल्या काव्यांचें विषयरसपाकादींच्या अनुरोधानें वर्गीकरण करण्याचा प्रयत्न, अर्थात् रा. पाध्ये यांनीं, केला आहे. त्यांचें स्वतःचें म्हणणें आहे कीं, सदर वर्गीकरणासंबंधीं मतभेदास जागा होईल; परंतु खऱ्या प्रतिभेच्या रसपूर्ण कवितांचा भरपूर संग्रह ह्या ग्रंथांत झाला आहे याबद्दल कोणाही रसिकाचा–कोणाही विद्वानाचा–मतभेद होणार नाहीं. ग्रन्थांत कविप्रतिभाजनित आनंदीआनंद भरपूर भरला आहे, असें आढळून येईल.

**संपादक, वि. ज्ञा. विस्तार.**

# 'विविध'-काव्यमाला.

## अनुक्रमणिका.


| | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| मंगलाचरण. | | पाध्ये दा. ग. ... | १ |
| कविस्तुति. | | श्रीरामदास. ... | २ |
| विस्ताराभिनंदन. | १ | पाध्ये दा. ग. ... | ३ |
| ,, | २ | 'मुकुंदराय.' ... | ५ |
| ,, | ३ | जोशी पु. बा. ... | १० |
| ,, | ४ | लेले लक्ष्मणशास्त्री. ... | १३ |
| [ कवयित्रींचीं काव्यें. ] | | | |
| सुखाची कल्पना. | | श्री. दाणी, वेणूबाई. ... | १६ |
| हंसदूत काव्य (दमयंतीसंदेश.) | | अभ्यंकर, सौ. लक्ष्मीबाई | १७ |
| नभोलेख. | | रानडे, सौ. मनोरमाबाई. | २२ |
| कालियामर्दन. | | परांजपे, सौ. शारदाबाई.... | २८ |
| बालोपदेश. | | भिडे, सौ. सरस्वतीबाई.... | ३५ |
| [ भक्ति रस. ] | | | |
| उषःसूक्त. | | 'महाराष्ट्रिय.'... ... | ३७ |
| मुरली. | | चापेकर श्री. नी. ... | ३९ |
| पंढरी. | | बोबडे श्री. रा. ... ... | ४० |
| मुरलीधरास पुढें घेऊन- | | 'कुवलयानंद.' ... ... | ४३ |
| प्रभुप्रार्थना. | | 'माधवानुज'( कै. ) ... | ४५ |
| ईशान्वेषण. | | टिळू ग. दा. ... ... | ४६ |
| ईश्वर कोठें आहे ? | | लोंढे मो. ग. ( कै. ) ... | ४९ |
| स्तुतिसुमनमाला. | | लेंभे वि. भ. ( कै. ) ... | ५० |

पृष्ठ.

[ शृंगार रस. ]


| | | |
|---|---|---|
| चित्तरंजन. | टेकाडे आ. कृ. ... | ५५ |
| दर्शनोत्सुका. | पळशीकर ध. ह. ... | ५६ |
| 'भृंगा ! हृदय न मम कळलें.' | मायदेव वा. गो. ... | ५८ |
| तुझे शब्द. | परांजपे कृ. रा. ... | ६० |
| बंडवाला. | 'Bee.' ... ... | ६१ |


[ वीर रस. ]


| | | |
|---|---|---|
| कृष्णा घोडी. | 'अरविंद.' ... ... | ६४ |
| 'धन्य जननि जनकोजीची' ! | तिवारी दु. आ. ... | ६७ |
| मर्द हो, पळता काय ? | 'कमलावर.'... ... | ७४ |


[ करुण आणि शोक रस. ]


| | | |
|---|---|---|
| माता व पुत्रवियोग. | पाध्ये दा. ग. ... | ७७ |
| जीवा, बोल ! | 'नागेश.' ... | ८१ |
| भवितव्यता. | ऱ्हाळकर न. शं. ... | ८४ |
| सुहृत्सांत्वन. | फणसे के. वि. ... | ८७ |
| अढळ प्रेम. | लोहोकरे पां. गो. ... | ९१ |
| जाळ्यांत अडकलेल्या हरिणीचे उद्गार. | टेंभुर्णीकर के. ल. ... | ९७ |
| प्रणयमुग्ध तारा. | 'अनंततनय.' ... | १०० |
| शिवकालीन एक संस्मरणीय प्रसंग. | देवस्थळी भा. शं.... | १०८ |
| नाहक तुरुंगांत जातांना पत्नीस— | 'अज्ञातवासी.' ... | ११० |
| विरहकटुता. | पावणसकर कृ. ल. | १११ |


[ प्रेम व आनंद. ]


| | | |
|---|---|---|
| आईचें संगीत. | महाजन गो. ना. ... | ११४ |
| बारसें—समस्या. | वाकसकर वि. स. ... | ११५ |
| हृदयदेवता. | 'कृष्णतनय.' ... | ११९ |

| | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|

## [ स्वभाववर्णन. ]

| | | | |
|---|---|---|---|
| इंद्रधनुष्य. | भिडे ना. म. | ... | १२० |
| मेघाची दर्पोक्ति. | ठोसर स. ना. | ... | १२५ |
| आकाशांतून पडणारा तारा. | दिघे पां. बा. | ... | १२८ |
| कमलबद्ध भ्रमरास. | कुळकर्णी कृ. बा. | ... | १३१ |
| धुकें. | परांजपे न. रा. | ... | १३३ |
| वसंतरजनी. | माकोडे गो. ब. | ... | १३७ |
| महापूर. | नंदुरबारकर पां. रा. | ... | १३८ |
| निसर्गाची असहकारिता. | पद्माकर द. बा. | ... | १४१ |
| पुष्पाचें जीवित. | माडीवाले शं. ना. | ... | १४२ |

## [ वैराग्यपर. ]

| | | | |
|---|---|---|---|
| भावनात्रय. | 'सुमंत.' | ... | १४३ |
| बाळें तीं खेळत होतीं. | ठोमरे त्र्यं. बा. (कै.) | ... | १४५ |
| मायेचा बाजार. | गद्रे य. म. | ... | १४८ |

## [ समाजस्थिति–राजकीय, नैतिक. ]

| | | | |
|---|---|---|---|
| जय हिंदभूमिचा बोला ! | बेडेकर श्री. गो. | ... | १५० |
| अढळ पद–अथवा अंत्यजाष्टक. | कोल्हटकर श्री. कृ. | ... | १५१ |
| नूतनाभिषिक्त राजास. | वडकर पां. बा. | ... | १५३ |

## [ विविध. ]

| | | | |
|---|---|---|---|
| पद्ममृणाल. | केणी य. म. ... | ... | १५७ |
| आकाशांतील चंडोलास. | 'गिरीश.' ... | ... | १६० |
| मोडकी खाट. | देवधर गो. पां. | ... | १६३ |
| मृत्युपत्र. | 'साधुदास.' ... | ... | १६५ |
| क्रोध. | भिडे वि. वा. | ... | १६७ |
| स्वप्नभाषा. | भिडे बा. अ.... | ... | १६८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पृष्ठ. |
| संसाराचें सर्साकी नाटक. | दामले गं. गो. | ... | १७४ |
| मृत्यूस ! | रेंदाळकर. ए. पां. (कै.) | ... | १७६ |
| वनवासाचीं सुखें. | ‘ चंद्रशेखर.’ ... | ... | १७८ |
| ‘मातेस्तव व्हा सिद्ध मराया!’ | तांबे भा. रा. | ... | १८५ |
| पंचप्राणांची पूर्णाहुति. | ‘ मनोहर.’ ... | ... | १८६ |
| जुळे भाऊ. | ‘ यशवंत.’ ... | ... | १८७ |
| तुणतुण्याचि माझ्या तार. | अत्रे प्र. के. ... | ... | १९१ |
| मोगऱ्याचीं फुलें. | कीर्तिकर रा. घा. | ... | १९५ |
| कर्तव्यपथ. | बेहरे ना. के. | ... | १९६ |

# कवींची नामानुक्रमणिका.

[ नांवापुढें दिलेल्या तारखा कवींच्या जन्माच्या आहेत. ]


| नांव. | पृष्ठ. |
|---|---|
| **कवयित्री–** | |
| दाणी, श्री. वेणुबाई ... ... ... ... | १६ |
| अभ्यंकर, सौ. लक्ष्मीबाई ग. १० मे १८८५ ... ... | १७ |
| रानडे, सौ. मनोरमाबाई श्री. १४ जानेवारी १८९६ ... | २२ |
| परांजपे, सौ. शारदाबाई मो. २१ एप्रिल १८८८ ... | २८ |
| भिडे, सौ. सरस्वतीबाई वि. २४।१२।८२ ... ... | ३५ |
| **कवि–** | |
| अत्रे, प्रल्हाद केशव, B. A. ( 'केशवकुमार' ) १३।८।९८ | १९१ |
| अधिकारी, गोपाळ गोविंद ( 'कमलावर'). १८।९।०१ ... | ७४ |
| आपटे, दत्तात्रेय अनंत ( 'अनंततनय' ). ५।७।८१ ... | १०० |
| कानेटकर, शंकर केशव. ( गिरीश ) २८।१०।९३ ... | १६० |
| कीर्तिकर, रामराव बाळकृष्ण. इ. स. १८६९ ... ... | १९५ |
| कुळकर्णी, कृष्णाजी बाबाजी. ५।१०।८० ... ... | १३१ |
| केणी, यशवंत महादेव. १०।७।८८ ... ... ... | १५७ |
| केळकर, दिनकर गंगाधर. ('अज्ञातवासी'). इ. स. १८९८ | ११० |
| कोल्हटकर, श्रीपाद कृष्ण, B. A., LL. B. इ. स. १८७१... | १५१ |
| गद्रे, यशवंत महादेव ( 'कृष्णाग्रज' ). ५।११।८७ ... | १४८ |
| गुणे, जगन्नाथ गणेश, B. A. ('कुवलयानंद'). ३१।८।८३... | ४३ |
| गुप्ते, नारायण मुरलीधर ( Bee ). इ. स. १८७२ ... | ६१ |
| गोऱ्हे, चंद्रशेखर शिवराम. २९।११।७१ ... ... | १७७ |
| चापेकर, श्रीकृष्ण+ नीळकंठ, M.A., LL.B. (श्रीकृष्ण). ३।८।७७ | ३० |


+ हें नांव ३९ पृष्ठावर चुकून ' श्रीकंठ ' असें पडलें आहे.

नांव पृष्ठ


जोशी, रा. ब. पुरुषोत्तम बाळकृष्ण, F. R. G. S. मार्च १८५६ १०
टिळू, गणेश दामोदर, M. A. १८।९।९५ ... ... ४६
टेकाडे, आनंदराव कृष्ण. इ. स. १८९१ ... ... ५५
टेंभुर्णीकर, केशव लक्ष्मण. इ. स. १८९१ ... ... ९७
ठोमरे, त्र्यंबक बापूजी. (कै. बालकवि) ज. इ. स. १८९१ मृ. ५।५।१८ १४५
ठोसर, सदाशिव नारायण, B. A., LL. B. २५।४।८२ ... १२५
तांबे, भास्कर रामचंद्र. इ. स. १८७४ ... ... १८५
तिवारी, दुर्गाप्रसाद आसाराम. १७।९।८७ ... ... ६७
दडकर, पांडुरंग बाळकृष्ण. १।८।७१ ... ... १५३
दामले, डॉ. गंगाधर गोविंद, L. M. &. S. ७।६।८१ ... १७४
दिवे, पांडुरंग बापूजी. २६।६।८६ ... ... ... १२८
देवधर, गोविंद पांडुरंग, M. A. LL. B. १३।४।८३ ... १६३
देवस्थळी, भालचंद्र शंकर. २१।१०।७२ ... ... १०८
नवरे, नागेश गणेश ('नागेश.') ... ... ... ८१
नंदुरबारकर, पांडुरंग रामचंद्र. १०।२।७० ... ... १३८
पद्माकर, दत्तात्रय बापुराव. २२।४।९५ ... ... १४०
परांजपे, कृष्णाजी रामचंद्र. ९।५।९६ ... ... ६०
परांजपे, नरहर रामचंद्र. २।१०।९२ ... ... ... १३३
पळशीकर,* बळवंत हणमंत ( 'बळवंत.') १२।६।०१ ... ५६
पाटणकर, गोपाळ गोविंद ( 'साधुदास.' ) १७।२।८४ ... १६५
पाटणकर, नारायण रामचंद्र ( 'महाराष्ट्रिय.') २९।१।८८ ... ३७
पाध्ये, दामोदर गणेश, M. A, इ. स. १८६५... ...१,३,७७
पावणसकर, दि. ब. कृष्णाजी लक्ष्मण,
C. I. E., M. A. ३०।१२।७१ ... १११
पेंढरकर, यशवंत दिनकर ('यशवंत.') ९ मार्च १८९९ ... १८७
पोतदार, गोपाळ गंगाधर, B. A. ( 'मनोहर.' ) १२।१०।९६ १८६


* हें नांव ५७ पृष्ठावर चुकून ' फणशी कर '

| नांव | | पृष्ठ |
|---|---|---|
| फणसे, केशव विश्वास. ९ एप्रिल १८७१ | ... ... | ८७ |
| बेडेकर, श्रीराम गोविंद. २२।१०।८८ | ... ... | १५० |
| बेहरे, नारायण केशव, M. A., B. SC. ४।७।९० | .. | १९६ |
| बोबडे, श्रीनिवास रामचंद्र. B. A. इ. स. १८९० | ... | ४० |
| भिडे, नारायण महादेव, B. A. २९।६।८४ | ... ... | १२० |
| भिडे, बाळकृष्ण अनंत, B. A. इ. स. १८७४ | ... ... | १६८ |
| भिडे, विद्याधर वामन, B. A. १५।११।६० | ... ... | १६७ |
| महाजन, गोपाळ नामदेव. १ जुलै १९०३ | ... ... | ११४ |
| माकोडे, गोविंद बळवंत. १०।८।९१... | ... ... | १३७ |
| माडीवाले, शंकर नारायण, B. A. ६।६।९१ | ... ... | १४२ |
| मायदेव, प्रो. वासुदेव गोविंद, M. A. ('वनमाळी.')२६।७।९४ | | ५८ |
| मिरजकर, मुकुंद गणेश ( 'मुकुंदराय.' ) ४।४।८२ | ... | ५ |
| मुर्तुले, धुंडिराज आप्पाजी ('सुमंत.'). १।११।८१ | ... | १४३ |
| मुळ्ये, रा. ब. विनायक कृष्ण, B. A. ('कृष्णतनय.')२।४।७७ | | ११९ |
| मोडक, काशिनाथ हरि (कै. 'माधवानुज.') इ.स.१८७१ ... | | ४५ |
| रहाळकर, नरहर शंकर, B. A. २०।१२।८२ | ... ... | ८४ |
| रेंदाळकर, एकनाथ पांडुरंग (कै.) ज. १८८९; मृ. १।८।२० | | १७६ |
| लेंभे, विठ्ठल भगवंत. ( कै. ) ज. १।४।५०; मृ. १।८।२० | | ५० |
| लेले, लक्ष्मण गणेशशास्त्री. १।११।७२ | ... ... | १३ |
| लोंढे, मोरो गणेश (कै.) ज. २०।११।५४; मृ. ११।११।२० | | ४९ |
| लोहोकरे, पांडुरंग गोपाळ. माघ व. १४ श. १८१७ | ... | ९१ |
| वाकसकर, विनायक सदाशिव. १५।२।८५ | ... ... | ११५ |
| शिंदे, भास्कर नानाजी ( 'अरविंद.') १०।९।९५ | ... | ६४ |

" विविधज्ञान-विस्ताराच्या पन्नाशीचा आनंदोत्सव."

## ग्रंथ तिसरा

# 'विविध'-काव्यमाला.

### ॥ मंगलाचरण ॥

[ आर्या. ]

**विविध** हि शोधिं न ज्याच्या **ज्ञान**—युतां अंत ये गुणाब्धीचा,
**विस्तार** विफल वर्णनिं **लेख**—गणांचा नितांत बुद्धीचा. १
**रत्नांचा** परि यत्नीं **सागर** दे, तेविं वृंद मोक्षाचा;
**विद्या**ऽभाविंहि, भावें, **भक्त**जनां दे कृपाप्रसादाचा. २
**अग्रेसर** सृष्टीचा, **चिरं** दयार्द्र प्रभू,—तया शरण
**लोकहिता** जाउं, नमूं; **करो** जगीं तो सदा तमोहरण ! ३

दा. ग. पाध्ये.

☞ वरील आर्यांतील चरणांच्या आरंभींचे शब्द क्रमानें वाचिले म्हणजे ओवी होते ती अशी:—

विविधज्ञानविस्तार। लेखरत्नांचा सागर।
विद्याभक्त अग्रेसर। चिरं लोकहिता करो ! ।

# श्री

## कविस्तुति.

जयन्ति ते सुकृतिनो रससिद्धाः कवीश्वराः ॥
नास्ति येषां यशः काये जरामरणजं भयम् ॥

## श्री रघुवीर समर्थ.

आतां वंदूं कवीश्वर । जे शब्दसृष्टीचे ईश्वर ।
नातरी हे परमेश्वर । वंदावे तरी ॥

कीं हे सरस्वतीचें स्थान । कीं हे नाना कलांचें जीवन ।
नाना सद्विद्यांचें भुवन । यथार्थ होय ॥

कीं हे पुरुषार्थाचें वैभव । कीं हे जगदीश्वराचें महत्त्व ।
नाना लाघवें सत्कीर्तिस्तव । निर्माण कवी ॥

ऐसे पूर्वी थोर थोर । झाले कवीश्वर अपार ।
आतां आहेती पुढें होणार । नमन माझें त्यांसि पै ॥

नाना चातुर्याच्या मूर्ति । कीं साक्षात् बृहस्पती ।
वेदश्रुति बोलों म्हणती । ज्यांच्या मुखें ॥

कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसांचे वोघ लोटले ।
नानासुखांचें उचंबळलें । सरोवर हें ॥

आतां असो हा विस्तार । जगास आधार कवीश्वर ।
तयांसि माझा नमस्कार । साष्टांगभावें ॥

श्रीरामदास.

# विस्ताराभिनंदन.

## १

[ श्लोक. ]

स्वातंत्र्याच्या शिवनृपतिनें रोवियेलें ध्वजातें,
जेथें ज्ञानेश्वरसम बुधीं गाइलीं भक्तिगीतें,
त्या देशाची रसयुत महाराष्ट्रभाषा, तियेची
सेवा श्रेष्ठा तव च विविधज्ञानविस्तार ! साची. १

मंथूनीयां विविधविबुधज्ञानसिंधूमधील
उत्साहानें निज जनिं सुधा वर्षण्याच्या अमोल–
वर्षें पंचाशदधिक तुवां सुव्रता चालवीलें:
अन्यें ऐसें सुयश न कुणीं मासिकें मेळवीलें ! २

वाढे जेणें विषयरतिचें वेड वेड्या मनाचें,
राज्यीं नाहीं लवहि तुझिया मूल्य ऐशा कथांचें;
चित्रांनीं तूं सजसि न दुज्या कृत्रिमा भूषणांहीं:
आली नाहीं तव गुणरसीं वाण तेणें कधींही. ३

ठावे नाहीं चटक-चुटके, चारुताहीन वेंचे;
चाळे केले नसतिहि तुवां व्यर्थ आत्मस्तुतीचे;
तत्त्वासाठीं दृढमन; बहिष्कारिसी जाहिरात;
विद्याध्येयीं विरत पुतळा, सोवळा सोवळ्यांत ! ४

लेखांसाठीं फिरशि न; तुला लेख शोधीत येती;
विद्वद्रत्नें सहकृति तुझ्या कार्थि सानंद घेती;
संमानाचें स्थळ, रसिकताधाम तूं आदराचें;
क्रीडास्थान प्रिय खचित तूं शारदा-देवतेचें ! ५

जीवातें या सुकृत करुनी सार्थकीं लावण्याच्या
नाना रीती विदित जगतीं जन्मभूसेवनाच्या;
त्यांमाझारी प्रमुख सरसा सन्मतांची सुवृत्ती
भाषा-माता-चरण रुचिरीं लेखिं अभ्यर्चिण्याची. ६

देशी स्फूर्ती, सतत करिशी वृत्तितें या प्रदीप्त;
धीमंतांतें विसर न पडूं देशि कर्तव्यतेंत;
विद्या, भाषा, निजजननभू—तीनही देवतांचा
विस्तारा ! तूं सुभग असती एक आचार्य साचा ! ७

चालो तूझें व्रत ! तव सदा ज्ञानदीप प्रदीप्त
शुक्लेंदूवद् भुवन सुखवो ! रंजवो श्रेयमंत
अज्ञानाच तिमिर पळवो दूर तो सुप्रकाश !
सद्बुद्धत्वें सुयश मिळवो हा महाराष्ट्रदेश ! ८

दा. ग. पाध्ये.

## २

[ आर्या. ]

आयुष्य अल्प किंवा दीर्घ प्रभुच्या करीं असे यदपि,
मानवयत्न तयाला नाशक पोषक असे खरें तदपि. १
बहुविध लोकांसंगें असतो संबंध सर्व संस्थांचा,
यास्तव व्हावा चालक धैर्याचा तेविं पूर्ण आस्थेचा. २
पुरुषायू संस्थायू अल्प, अमर्याद हें जरी सत्य,
चालक योग्य न म्हणुनी संस्था जाती रसातळा नित्य. ३
अपवाद तूंचि याला **विस्तारा** ! अधिक बोलणें काय ?
राष्ट्रहितें आचरसी सोसुनियां कष्ट झिजवुनी काय. ४
**विस्तारा** ! प्रिय मित्रा ! चुकलों, तूं मित्र नच, अहो तात !
उपकार थोर अपुले लिहिण्याला क्षम न हात होतात ! ५
कुरुवंशिं भीष्मसा तूं ज्ञानवयोवृद्ध मासिकांमाजी;
होईं बृहस्पतिपरी अजरामर तूं विनंति हे माझी. ६
जेव्हां अज्ञानाचा लोकीं सर्वत्र जाहला प्रसर,
येउनि उदया मित्रा ! तूंचि तया मार्ग दाविला सुकर. ७
त्वत्पूर्वीं गद्याचा प्रचार भाषेमधें कमी होता;
तूंचि प्रवर्तक तया, यज्ञाचा जेविं होतसे होता. ८
परकीय राज्यविद्युद्दीपें दिपले समस्त जननेत्र,
स्वत्व लयाला गेलें, अनुकरणाचें बळावलें क्षेत्र. ९
आचार, धर्म, भाषा, किंबहुना चाल, रीत, पोषाख
रुचती अन्य जनांचे, स्वगुणांची जाहली जणों राख ! १०

ऐशा समयीं धैर्यें तूंचि दिला हात सर्व पतितांतें—
उन्मार्गगामि पुत्रा उपदेशुनि वळविजे जसें तातें. ११

गुण घ्यावे परक्याचे प्रेमानें, दोष तेविं टाळावे,
टीका मत्सरहीना, अपशब्दें मुख न तें विटाळावें; १२

स्वमतविरोधी लेखहि सद्धेतूचे कधीं न गाळावे,
घ्यावें यश यत्नें, हें विषम असिव्रत तुवांचि पाळावें. १३

लोकहिताचें धोरण, गंभीर अनंत लेख, तन्मयता,
स्वार्थत्यागादि गुणें कोणी पावे न बा तुझी समता. १४

भुलला त्वद्गुणनिवहें वाचकगण, काय राहिली वाण ?
पंकजमधुपसमागम रसिकांचें मन हरी न कां जाण ? १५

आश्रय वाढो म्हणुनी व्रतभंग तुवां न केधवां केला;
सात्त्विक मार्गें जगतीं आजवरी काल सर्वही गेला. १६

ब्राह्मण शूद्र सुधारक दुर्धारक वा जहाल नेमस्त
वाचक भजती तूतें समभावें भेद पावुनी अस्त. १७

प्रतिमास वाङ्मयाचे लेख नवे वाचुनी तुझ्या द्वारें
उत्कंठित चित्तें तव करिती मार्गप्रतीक्षणा सारे. १८

ग्राहकवंचन करिसि न लटिक्या तूं वाजवोनियां चिटक्या;
सेवुनि रुचिकर पथ्यहि अन्न तुझें रसिक मारिती मिटक्या. १९

मासिकमाला निघती पैशाला पांसरी न कामाच्या;
आल्हादकत्व शुचिता तुजमधिं नामांत जेविं रामाच्या. २०

विषय असा अतिदुर्मिळ ज्याची केली न तूं कधीं चर्चा;
सर्वप्रवीण म्हणुनी करिती साधू तुझी सदा अर्चा. २१

त्वदितर मासिक अशा सत्त्वस्थ न दुग्ध, पाजिती पेज;
नानोपायें भाषायुवतीला आणिलें तुवां तेज. २२

ज्येष्ठ, श्रेष्ठहि तूतें बुध म्हणती;—कोण तें वृथा मानी ?
धन्या वीरा ! अविरत यश वर्णूं तरि न कां तुझें गानीं ? २३

त्या त्या विषयाचे बहु लेखक पटु करुनि ठेविसी जतन;
आधारस्तंभ असे दृढ ज्याचे, त्या नसे कधीं पतन. २४

भाषाकंठमणी कवि लेखक वा प्रथम ये तुझ्याजवळ;
प्रेमानें मातेसा रुचिकर तूं त्यासि चारिसी कवळ. २५

बाळाचाही उत्तम गुण ध्याया तूं न पाहसी मागें;
विविधज्ञान म्हणोनी विस्तारा ! तुज न शोधण्या लागे. २६

राजानें विद्वज्जन यद्यपि देवोनि पाळिले वतन,
तुजसम कार्य तयांतें दुष्कर; मद्वचन हें असांप्रत न. २७

द्रव्याभिलाष सोडुनि सद्धेतुक करिति कार्य जे साधू
यश दे तयांसि ईश्वर, शकती विघ्नें न त्यांजला बाधूं. २८

**ज्ञानेश्वर** योगींद्रापासुनि अद्यावधी पहा सगळे
भाषासेवक तितुके दारिद्र्याचेचि जाहले पुतळे. २९

बालाभ्यासार्थ जपे चिमटा वेळेस घेउनी पोटा,
तात उदारात्मा तो नाहीं होणार मान्य कां मोठा ? ३०

तरलासि आपदंबुधि केवळ दृढनिश्चयामुळें सर्व,
**अर्धशताब्दमहोत्सव** बघण्याचें म्हणुनि लाभलें पर्व. ३१

असुनि महाश्रयहि, बहू बुडती वा अल्प मासिकें तरती;
अल्पाश्रय, उत्साही तूंचि चिरायूहि धन्य या जगतीं ! ३२

केव्हां वाक्शर सोडुनि, केव्हां चुचकारुनी, भली सरणी
दाविसि तूं जनतेला; इतरांतें साधते न हे करणी. ३३

पुस्तक-परीक्षणाची शैली तव होतसे जगन्मान्य;
गुरुला छात्र तसे तुज मानिति अतिपूज्य लोक सामान्य. ३४

साहित्यपत्रिकेची जोड दिली करुनि तूं अम्हांस नवी;
सर्वमनोहर तीतें करण्या विज्ञप्ति तुज कशास हवी ? ३५

त्वद्गत जीर्ण बुधस्तुत लेख पुनर्मुद्रणार्ह करण्या तूं
सजसी धन्या ! होवो श्लाघ्य तुझा पूर्ण हा झणीं हेतू ! ३६

वाग्देवीसमुपास्या खरतर आहे खरी तपश्चर्या
विद्वद्वर्या ! ती तूं संपादुनि दाविसी मनोधैर्या. ३७

रत्नें रत्नाकरगत कोणाला गणवतील कां बापा !
लेख मनोहर तुलण्या आणूं मी तवहि कोणत्या मापा ! ३८

" बाणोच्छिष्टं सर्वं जगत्" न गर्वोक्ति हे, यथार्थ गमे;
" विस्तारस्पृष्ट महाराष्ट्रगिरा" बोलण्या न मी विरमें ! ३९

प्राचीनकाव्यजीर्णोद्धारार्थ कितीक लोक ते सजले;
परि हा ! दुर्दैवानें विहतोद्यम जेथच्या तिथें थिजले ! ४०

अर्वाचीन कृतश्रम कविलेखक तूं अनेक सांवरिले;
स्वापत्काल न गणितां इतरांतें सज्जना ! करीं धरिलें. ४१

विस्ताराज्ञा होतां सोडुनि बहुमोल कार्यसंततिला
लेखक धांवे, ठावा अनुभव हा तातभक्तसंततिला ! ४२

गुंजारव गुंजीकर मंजु करी जेधवां त्वदुद्यानीं
मन धालें श्रोत्यांचें वर्णावें तें न शुष्क पद्यांनीं. ४३

आमोदें नैसर्गिक सद्वर्णेंही दिगंत दरवळवी
**तो मोगरा** फुलोनि त्वदुपवनीं रसिकभृङ्गमन भुलवी. ४४

जर्जर शरीरयष्टी होउनि मंदावली जरी दृष्टी,
**विष्णू मोरेश्वर** तो लेख तुला द्यावया नसे कष्टी. ४५

हां हां म्हणतां प्राकृतसंस्कृतरसपूर्णकाव्यनिर्माता
**आगाशे** तुज लाभे लाधे सत्पुत्र जेविं सन्माता. ४६

लोकविरुद्ध परंतू सत्य स्वमतें न भी वदाया जो
विद्वद्वर **भागवता** प्रशंसितां त्या न हे मती लाजो. ४७

रामायण भारत या ग्रंथांचा दीर्घकाल अभ्यास
करणारा **चिंतामणि वैद्य**हि धांवे तुझ्याच कामास. ४८

लेख विनोदी ज्याचे भाषालंकार जाहला नव्य,
**श्रीपाद कृष्ण** तो तव संगेंचि प्रथम पावला भव्य. ४९

जीवन्मृत सारस्वतभक्तांचा हा अपूर्वतर मेळा
डोळां समक्ष पाहूं प्रसंग जन्मांत हा न बहुवेळां. ५०

वर्षें पन्नास तशीं पुष्पें तितुकींच अर्पुनी धन्य
झालों मी; शतवार्षिक उत्सव करितील तव कवी अन्य! ५१

'मुकुंदराय.'

## ३

[ आर्या-गीति. ]

विविधज्ञानतरूचा रोपा लावून जाहलीं वर्षें
पन्नास आज ज्याचीं पुष्पफलें सेविलीं जनीं हर्षें, १

त्या वाङ्मयद्रुमाचा झाला विस्तार या महाराष्ट्रीं;
तुष्टि मिळाली शिष्टां, गेलें अज्ञान तूर्ण संपुष्टीं. २

छाया घनदाट किती ! पुष्पांचे गुच्छ ते किती रम्य !
वाङ्मयवृक्षपितामह, ह्याचें इतरांस ये कसें साम्य ! ३

आश्रय ह्याचा मिळतां 'आर्याछंदांत मोगरा डुलला;
प्रावृट्कालिं न केवळ शिशिरवसंतींहि शोभला फुलला. ४

मोहक-महाजनि द्विज कविवृंदीं वंद्य, लेखकीं थोर
शोभवि विस्तारातें, विस्तारें शोभतो जसा मोर. ५
काव्यविशारद म्हणुनी वर्णिति अद्यापिही जया लोक,
विस्ताराश्रय मिळतां 'काव्यीं माधुर्य ' सांठवी ओक. ६

पुत्रवियोगें दुःखीं सौख्याची संपली असे आशा,
विस्ताराश्रय मिळतां स्वास्थ्य मिळालें गणेश आगाशा. ७

भार्याविरहव्याकुल, चित्ताला शांति द्यावयाकरितां
कीर्तीकर विस्तारा अर्पी करुणारसान्विता कविता. ८

गुंजीकर-कर-निर्मित, मंजुळ गुंजारवास विस्तारीं
कवि-कुंजीं किति करिती सुकविद्विज जेविं काम्य कांतारीं. ९

बहुविध कविद्विजांनीं विविधज्ञानाचिया तरूवरती
बैसुनि गाउनि गीतें केली राष्ट्रीय वाङ्मयीं भरती. १०

विदित न अवघीं नामें, परि मी तात्पर्य सांगतों परिसा—
लोहहि सुवर्ण होतें त्याचा संपर्क लागतां परिसा. ११

गद्यात्मक लेखसुधा सिंचुनि **विस्तार** ज्या विदग्ध जनीं
वाढविला तीं सारीं नांवें देणें अशक्य या कवनीं. १२

थोडींच सांगतों जीं आठवती तींच मीं इथें नांवें:
पंडितभागवतासम वाङ्मयभक्तां कधीं न विसरावें. १३

बहुविधविषयविवेचनमंडित सुंदर 'विचारमाधुकरी'
मधुर रसें भरलेली देउनि शास्त्री तया सतेज करी. १४

पंडित हरि करि मंडित विस्तारा रम्य लेखरत्नांनीं
विविधज्ञान-सुवर्णीं करुनी एकत्र दीर्घ यत्नांनीं. १५

मोडक ज्योतिःशास्त्रा; इतिहासा घेउनी करीं साने
विस्तार-वाचकांचीं करिती दोघे पुरीं प्रहृष्ट मनें. १६

विविधज्ञानविभूषित वाङ्मयविस्तारवर्धिनी सेवा
केली तेलंगानें विस्तारें तो सुधी न कां गावा ? १७

पतिपत्नी दोघेंही विस्तारा लेख अर्पिती प्रेमें—
कानिट्कर-द्वयाचीं वर्णावीं कां न हो इथें नामें ? १८

आर्तांस शांति, रसिकां लाभे स्वारस्य, मोद विस्तारीं;
विबुधांस विविध आश्रय देउनि यश दशदिशांस विस्तारी. १९

नांवें कविद्विजांचीं किति तरि सांगूं जयांस दे जागा
वृक्षीं गीतें गाया ! वाङ्मयसंवर्धनीं सदा जागा. २०

लेखीं गांभीर्य खरें अभिनववैचित्र्य भारदस्तपणा;
अश्लीलता न शिवली, विस्ताराच्या स्तवूं न कां सुगुणां ? २१

आश्रय कधीं न केला, कविता पूर्वी न एकही दिधली,
यास्तव कविनें करितां विस्तारस्तुति जनीं दिसेल भली. २२

वंदन करुनि प्रेमें अभिनंदन मित्र ! या करूं भावें;
द्याया ज्ञान जनांतें विस्तारा स्थैर्य ईश्वरें द्यावें ! २३

पु. बा. जोशी.

## ४

[ अनुष्टुप् छंद. ]

विविधज्ञानविस्तारा सखया ! जाहलीं पुरीं,
वर्षें पन्नास जन्मोनी तुज मुंबामहापुरीं. १

जन्मकालीं तुला वाटे मंगल ग्रह लाभले;
तेणें संपादिलें लोकीं, मित्रा ! यश तुवां भलें. २

ज्ञानासम दुजें कांहीं पवित्र भुवनीं नसे
श्रीकृष्ण[1] भगवान् पूर्वी पार्थाला वदले असें. ३

तें ज्ञान[2] मनुजालागीं मोक्ष आणोनि दे करीं.
व्यवहारार्थ विज्ञान आवश्यक असे परी. ४

हें विज्ञान[2] प्रयत्नानें तुवां विस्तारिलें जनीं,
नाम सार्थ तुझें तेणें, जाहली सफला जनी[3]. ५

ज्ञानाची महती थोर वानिताति घरोघरीं,
परि ते वितरायाला सिद्ध थोडे तुझ्यापरी. ६

तुझ्यापूर्वी मागुनीही मासिकें जन्म पावलीं;
दुर्दैवाच्या विलासानें परि अल्पायु जाहलीं ! ७

भाग्य थोर तुझें, मित्रा ! पोष[illegible] तव तत्परा
आहे सदैव कुशल लेखकांची परंपरा. ८

---

१ न 'हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' (भगवद्गीता). २ 'मोक्षे धीर्ज्ञानमन्यत्र विज्ञानं शिल्पशास्त्रयोः' ( अमरकोश ). ३ जन्म.

ते गुंजीकर ते ओक ते पंडित महामति,
ते मोगरे, भागवत; तयांची होतसे स्मृती ! ९

थोर विद्वान् विद्यमान महाराष्ट्रिय लेखक
गद्यपद्यालंकृतींना करिती तव कौतुक. १०

उदार शुद्ध मधुर विविध प्रौढ वाङ्मय
असें तुझें रम्य रूप कवणासि नसे प्रिय ? ११

'निबंधमाला' भगिनी धाकुटी तव सुंदरा,
विद्युद्विलास दावोनी जाय ती भुवनांतरा ! १२

भावंडांचे तुम्हां झाले झगडेही कधीं कधीं;
परंतु अंतरीं होती उभयांची विशुद्ध धी. १३

तुला होता तिचा मोठा अभिमान खरोखरी;
तिच्या विरहदु:खानें पोळलासि निजांतरीं. १४

बंधुप्रेम तिचें होतें अकृत्रिम तुझ्यावरी,
प्रसंगानें तिनें त्यातें दावियेलें परोपरी. १५

विष्णुहस्तप्रसादानें[४] ती[५] जनीं धन्य जाहली;
अनंतहस्तसामर्थ्यें[६] प्रतिष्ठा तुज लाभली. १६

उपजीव्य तुझे होती सर्वस्वीं सर्व लेखक;
पंचप्राणचि ते सत्य होति सौभाग्यवर्धक. १७

व्हावे चिरायु ते लोकीं हेचि इच्छा असे मला;
तेणें सहजची लाभे भाग्यसम्पन्नता तुला. १८

---

४ विष्णुशास्त्री चिपळुणकर. ५ निबंधमाला. ६ अनंत हें विष्णूचेंही एक नांव आहे.

तुझा संचार लोकांत स्वल्प आहे म्हणूनियां
दूषिती दूषणमती, त्यासाठीं खेद कासया ? १९

मुक्ता हीरक अन्येंही रत्नें होती जनामर्धी,
काय ग्राहक त्यांलागीं लाभती फारसे कधीं ? २०

हा नसे दोष रत्नांचा मुक्तांचा वा गमे मना,
ग्राहकांच्या खचित हा संपदेचा उणेपणा. २१

अत्यल्प असती तेवीं जनिं ते रत्नपारखी;
या गोष्टी धरुनी चित्तीं होइं, मित्रा ! मनीं सुखी. २२

तुझी सेवा महाराष्ट्रा बहु मानवली असे;
आहे तुझ्या दर्शनाचें कित्येकां लागलें पिसें. २३

शारदामंडनासाठीं अखंड करिं तूं श्रम;
ज्ञान विस्तरुनी वारीं अज्ञानमतिचा भ्रम. २४

ज्ञान साध्य तुझें आहे, आहे रंजन साधन;
हें धोरण तुझें ज्ञात्यांलागीं आनंदवर्धन. २५

हे मंगला महोदारा ! ईश्वरा ! करुणालया !
सदैव शक्ति दे मित्रा॰ देशसेवा करावया ! २६

लक्ष्मणशास्त्री लेले.

---

७ मित्राला, वि. श. विस्ताराला.

### कवयित्रींचीं काव्यें.

## सुखाची कल्पना.

जन्म कशाला हा मजला
ईशें न कळे हें दिधला;
तारा जरि मी नभिं होतें
जग तेथुनियां तरि बघतें;
चम् चम् करुनी नभःपटीं
स्थिर मनुजांच्या मनःपटीं
जन्म सुखाचा, तो गमतीचा, त्या ताऱ्यांचा,
येता जरि तें मला किती
होतें सुख त्या नसे मिती ! १
जन्म सुमांचा जरि येता
सुख होतें उद्यानीं फुलतां;
स्थान प्रीतिचें मनुजांच्या
होतें मग मी सुजनांच्या;
प्रभुचरणांवरि मी जातें
रमणीकचपाशीं वसतें;
चिन्ह प्रीतिचें, मी गमतीचें, युवयुवतीचें,
होउनि वसतें या भुवनीं
मौज सुमांची किती जनीं. २
निर्झर जरि झालें असतें
म्हटलीं असतीं मधुगीतें;
धांवत हांसत गाऊनी
उडया किती तरि घेऊनी

जन-नयनांला सुखवीतें
काव्यीं गुंफुनि मी वसतें
झुळू झुळू तो, वाहत जातो, जनां सुखवितो,
निर्झर जगतीं सुखी असे
उपमा त्यातें कुठें नसे. ३

तरू जरी झालें असतें
आश्रय कितिकांना होतें;
छाया श्रांत जनांस तरी
होती माझी किती बरी;
फळां-फुलांनीं मोदभरें
स्वागत त्यांचें करितें रे!
विहंगमांनीं, आनंदानीं, म्हटलीं गाणीं,
तरूवरी त्या बैसुनियां
सार्थक होतें जगुनीयां. ४

मधुर नाम किति कोकिल तें
मिळतें तरि सुखि मी होतें;
फुललेल्या आम्रावरतें
गात पंचमीं मी बसतें;
वसंत-सख मी होउनियां
तत्संगानें राहुनियां
ताना घेतें, सुंदर गीतें, किति तरि गातें,
परि आतां तें सौख्य नसे
हुरहुर रात्रंदिन भासे. ५

विहंग-जन्मा मी घेतें
सौख्य किती मज तर्यि होतें;

प्रातःसमयीं सूर्याचें
स्वागत करितें मौजेचें;
वृक्षकोटरीं मी वसतें
उंच भराऱ्या नभिं घेतें;
बहू उंच मी, जाउनि व्योमीं, विश्वस्वामी,
कोण असे तो कुठें वसे
बघण्या जातें मोदरसें ! ६
जन्म भ्रमरा ! तव नामी
येता तरि सुखि होतें मी;
कुसुमीं वसतें मौजेनें
गुङ् गुङ् गातें लीलेनें;
गंधयुक्त तो मकरंद
सेवुनि गणतें आनंद
त्या उद्यानीं, सुमरसपानीं, गुंग होउनी,
बाह्य जगाला विसरुनियां
सुखि होतें मी याहुनियां ! ७
त्रास असे या जगिं भारी,
सोडुनि जावें गमे दुरी!
क्रोध लोभ हे खरोखर
राज्य करीती निरंतर;
ईर्षा मत्सरही माजे
यांचा डंका जगिं गाजे;
सोड येथुनी, त्वत्पदसेवनिं, सुख मी मानीं,
केशव हरि नारायण रे !
विनती माझी ऐक त्वर ! ८

वेणुबाई दाणी.

# हंसदूत-काव्य.

## (दमयंतीसंदेश.)

वैदर्भाची प्रियतम सुता, नैषधाची प्रिया जी,
क्रौर्यें अंतःकरणिं तिजही केविं दुर्दैव गांजी?
द्यूतीं सारें विभव पतिचें राज्यही घेइ बंधु !
पाडोनीयां व्यसनिं बुडवी सज्जना स्वार्थसाधु. १

दैवाघातें पतिहुनि दुरी राहिली तातगेहीं,
साकेताच्या नरपतिपदीं सारथी नाथ होई;
वार्ताही ना कळत तिजला क्षेम वास्तव्य कोठें;
वैदर्भी ती पतिविण महाकष्टिं कालास कंठे. २

दुःखव्याप्ता क्षणहि युगसा घालवी संकटानें,
अर्ची ईशा, व्रत कटु करी, देत दीनांस दानें;
खाद्या पेया अवगणि सती सौख्यभोगीं समस्त;
तों साकेतीं नृपति दिसला ऐकिलें ब्राह्मणोक्त. ३

उद्यानीं तों सहज पडला दृष्टिसी हंस पक्षी,
बाही त्यातें; वदत करिंच्या मुक्तहारास भक्षी.
बोले, 'बंधो ! करित तुझिया स्वागता प्रेमभावें !
नाथालागीं कुशल पुसुनी शोध घेऊन यावें. ४

श्वेतांगातें तव बघुनियां मानसांतील वृत्ति
आहे वाटे धवलचरिता; ऐक माझी विनंती.
जा वेगें ये, प्रियपति सुखी सांग आहेत ऐसें;
शोकार्ता ही विरहिणि तुझा मार्ग लक्षीत बैसे. ५



२

स्नेहौदार्यें युत तव पदीं ठेवुनी आज भावा
संदेशार्थी तुजसि कथितें जाणुनी सुस्वभावा.
थोरांपाशीं विफल बरवें याचकीं इच्छिलें तें;
जावें क्षुद्राजवळ न कधीं कोणि मागावयातें. ६
मार्गी तूतें बहुत असती वृक्ष बैसावयास,
श्रांता ! तेथें मग पळभरी हिंड तूं आसपास;
आहारा ये खगगण तया आपुले मित्र जोडीं,
भक्षीं नाना सुमधुर फळें घेइं विश्रांति थोडी. ७
तूतें सौख्या वितरिल पथीं चालतां वात मंद,
तैसा, हंसा ! रमविल तुला वल्लरीपुष्पगंध;
प्याया वारी मधुनि सरिता वाहती, हंसराया !
सारे साह्या करिति झिजवी जो परार्थी स्वकाया. ८
सायंकाळीं गिरिवरि सुखें घेइं निद्रा, प्रभातीं
लागें मार्गा मग पुनरपी ये नभीं जैं गभस्ती;
कार्यीं घाई, म्हणुनि न कधीं विश्रमावीण जाईं;
प्रार्थीं, बंधो ! सकरुण तुला, याकडे लक्ष देईं. ९
नाना वल्ली फलभरनता सिद्ध या स्वागतार्थ,
तूतें हर्षें सुरुचिर फलां अर्पितील क्षुधार्थ;
बंधो ! तेथें किमपि न परी गुंग होऊन जावें,
मत्कार्याचें स्मरण हृदयीं सर्वदा बा असावें ! १०
क्रीडोद्यानीं रमणरमणी कोकिला कांतसंगें,
तूंही त्यांना बघुनि शिणसी त्वत्प्रियेच्या वियोगें;
आहे येथें विरहि भगिनी दुःखिता ही त्वदीय
तूतें, बंधो ! मग सुख कसें भोगणें योग्य होय ? ११

कोणी जातां विकल विरहें देखसी दीन आर्त,
वृत्ता तीच्या कळविं पतिला होउनी शांतचित्त.
तेथें गेला जरि तव, सख्या! काळ थोडा तरी ही—
मत्क्षोभासी तव कृति कधीं पात्र होणार नाहीं! १२

चालोनीयां पथ, खगवरा! तूं अयोध्येस जातां,
अश्वागारीं बघसिल झणीं माझिया प्राणनाथा;
गेलें सिंहासन नृपतिचें, दुर्दशाग्रस्त होय;
कार्यालागीं श्रमति नमिले जे नृपांनींहि पाय! १३

भक्षी कर्कोटक, तनु दिसे गौर ती कृष्णवर्ण,
पाहीं रूपा म्हणुनि निरखीं नासिका नेत्र कर्ण!
चित्तीं शांती, वदनिं विलसे सुप्रभा मूर्तिमंत;
दृष्टी येई पुनरपि कधीं ना कळे भाग्यवंत! १४

मंत्रोच्चारें त्वरित सदनीं लागती दीप सर्व,
पक्षींद्राचा निषधपति तो हारवी वेगगर्व,
होई अग्नीविण सकलही पाकसिद्धी तयाची;—
घे ध्यानीं हीं तुजसि, कथितें लक्षणें राजयाचीं. १५

सांगें आतां तुजसि विहगा! आणखी एक खूण,
या योगें तो तुजसि नृपती ओळखे खास जाण;
'त्यागी भार्या विजन विपिनीं नैषधावीण कोण?'
बोलें ऐसें क्षणभरि; पुढें बैस घेऊन मौन. १६

नेत्रीं अश्रु स्रवतिल तदा, जाण तो नाथ माझा;
झाली कष्टें कृश तनु असा ओळखीं तोच राजा!
सेवेलागीं परिजनशतें वेष्टिती ज्या सदैव,
सेवा भाळीं लिहित अजि कां भूवरा त्या कुदैव? १७

इंद्रातेंही करुनि समरीं विक्रमा लाजवीलें
सर्वप्रांतीं अजित नळ घे सार्वभौमत्व कालें;
वृत्ती साधी, रत जनहितीं, सर्वदा लोकपाळ;
प्रेमें केलें वश पुरजनां, दुर्जना मात्र काळ. १८

आतां भृत्यां मुकुनि कपटें वित्त-राज्यासनास
जाई कांतेसह विजनिं तो एकटा जीवितेश;
शौर्यें धैर्यें प्रमुख, असुनी सर्वथा दीप्तिमंत,
हा हा दैवा ! तरि तुजपुढें वाकला बुद्धिमंत ! १९

कीर्ती गाती कवि, खग तिथें जाहले भाट आजी,
वारा घाली हलवुनि अतां पल्लवां वृक्षराजी;
गाई गीता मधु मृदुरवें कोकिला रंजनास;
सन्मार्गा जो जन अनुसरे ईश रक्षी तयास. २०

पाहीं ऐसा नळ नृपति तो वर्ततो राजगेहीं—
बंधो ! त्यातें कथिं गुज, तुला सांगतें, फार नाहीं;
बैसें स्कंधीं हळुच सखया सांगण्या हें तदीयः
सांगें त्यातें विशद सकला दुःस्थिती ही मदीय. २१

घालीं कानीं मम पुढिल ह्या दीन शब्दांस चार,
होई तेणें ऋणि भगिनि ही, हंसराया ! अपार;
मोठें पुण्य प्रकट वसतें दंपतीमेलनांत—
शास्त्रग्रंथीं लिहिति बुध तें नित्य ठेवीं मनांत. २२

"हस्तीं माझ्या अमित घडले थोर अन्याय, नाथा !
पोटीं घालीं, सदय नृपते ! नेइं सेवेस कांता !
क्षोभा कैसी तव सहचरी पात्र होई, कृपाळा !
पुष्पासंगे गुण न मळतो गंध लागे तयाला. २३

दीनार्ता ही तृषित हरिणी दर्शनावीण झाली,
चेतोभृंगी चरणकमळीं, नाथही ! रुंजि घाली;
कैसें, कांता ! अदयहृदयें लोटिलें दूर ईतें ?
त्यागी लोणी कधि तरि मृदुत्वास ऐसें न होतें. २४

झाला आहे असह बहु हा आपणांही वियोग;
जाणें हें मी प्रभुसि न चुके भोगिल्यावीण भोग.
होई आतां कधि नच कळे पूर्ण हें नष्टचर्य,
केव्हां देखें वदनरवि तो आपुला भूपवर्य ! २५

शय्या हस्तें रचुनि निजती, नीज येईल कैसी ?
नाहीं सेवेस्तव जवळ, ही नैषधा ! दीन दासी !
होती पात्रीं अमित मधु ते, प्राणनाथा ! पदार्थ;
आतां देई कवण करुनी पाकसिद्धि क्षुधार्थ ? २६

चित्तीं ध्यावें मृदु शिशुमुखा, आठवा गोड बोला,
होती सारे मम अघगिरी क्षम्य तेव्हां, दयाळा !
यावें प्रेमें, तनयहि तशी पाहते वाट बाला;
ध्यावें सौख्या ममहि हृदया दुःखिता अंगनेला ! " २७

❀ ❀ ❀

वृत्तार्था या कथुनि तिथुनी शीघ्र हंसा ! निघें तूं,
येई वेगें कुशल कळवीं मानसीं हाच हेतू;
प्रार्थी ईशा सुखद पथ हा तुजला व्हावयास !
देवो मार्गीं बल अमित तो जावयातें सुरेश ! ! २८

(सौ.) 'लक्ष्मीतनया', सांगली.

# नभोलेख.

निष्ठुर धाता, निष्ठुर जगती, निष्ठुर रूढिकृती,–
त्रिकूट जमलें ! खलबत करिती, प्रणयिजनां छळिती.
खेळ भयानक ! रण माजविती, रुधिर पिण्या बघती;
धीर वीर परि काय म्हणुनि ती इच्छा पुरवीती ?

* * * *

रम्य भाषणें जाउनि आला काळ वियोगाचा;
अभेद्य चित्तें विरह किती तरि हा सोसायाचा !
वज्रशिलेची योग्य न उपमा, आघातें भंगे;
विरहिंहि तव वच स्मृतींत राखुनि दुःखी मन रंगे.
गतस्मृतीचीं चित्रें बघतां देहभान हरतें;
मन भ्रमे, तरि त्या चित्रांतें नभिं नयनीं लिहितें !
' जवळ बससि तूं–' होइ कल्पना; हावभाव होती;
वदनीं नयनीं भाव तरंगीं प्रतिबिंबित होती.

* * * *

स्वार्थत्याग तव स्मरतां जडतो चित्ता अनुताप,–
व्यर्थ फसविलें पाशामध्यें मन तव निष्पाप !
आम्र धरितसे कवळुनि हृदयीं कांटेरी वेली,
शल्यें सोसुनि सुखवी मन, ती पुष्पभरें लवली.
रूप गंध नच, कला न एकहि ! निर्व्याज प्रेम
केवळ देतें उदार वीरा ! वाढूं दे जोम.
हवी कशाला ती सारंगी ? असे हृदयतंत्री,
तारा जुळवुनि मधुर गायनें गावीं तिजवरती.

घडयाळ टिक् टिक्-फेंक दूरि तें, श्रवुनी हृत्कंप
काला विसरूं गुणगुणतांना प्रेमळ आलाप!
हार कशाला? करच वेढितिल परस्परां कंठा;
पहा फेंकिला नयनावाटे मोत्यांचा कंठा!
शिवणें विणणें? हवें कशाला? नांव नको त्याचें!
एकजीव हीं हृदयें झालीं, काय शिवायाचें!
अधरकांतियुत स्मित विलसवुनी अरुणप्रभा पसरी;
नाथ-रवी! हे प्रिया धरा तव आकर्षी स्वकरीं!

*   *   *   *

जलदागमनीं मोर पिसारा उभारुनी नाचे
प्रतिभाशालिन्! कवनीं गासी स्वागत प्रेमाचें!
अनुकार करी निज रमणाचा मदमत्त मयूरी,
स्वीकारी हें हृदय, तुझेंची असे हृदय-हारी!
तुझीं गायनें ऐकत असतां मन हें बेताल,
किती धन्य मी! तुझ्या संगमीं लपुनि चर काल.
घनरवश्रवणीं विरहि मनाच्या संतापा बहर;
वीज चमकतां, द्युति मिळतां तव मनिंची, ये धीर.
सुखद गायनस्मृति होवोनी तल्लिन मम वृत्ति,
जवळ बैसुनी तींच गायनें गासि, गमे चित्तीं.
अकांड तांडव पवनासंगें प्रबला जलधारा
करिती तेव्हां तीव्र जाळतो विषाद जीवाला.
हळहळ लागे, शोक भरे मनिं, अश्रुपूर गगनीं
कोण ढाळिते?–गाल पदर मम भिजले अश्रूंनीं!

*   *   *   *

दिवसांमागुनि दिवस चालले वाट किती पाहूं ?
कुशलवृत्तिचें लिखित धाड तरि, उशीर नच लावूं !
पत्रांतुनि तव हृदय समजतें, नयनांतुनि दिसतें;
तूं–मी एकच, लिहुं मग कवणा जें हृदया पटतें ?

* * * *

प्रेमकरांगुलि धरुनि तुझी मी चालत असतांना
सकल वस्तुंना विसरुनि जातें, स्मरतें तव ताना.
लाजाळूची लतिका लपली, लाज कुठें उरली ?
लाज कुणाची ? निज हृदयाची ? इश्श जळो गेली !
छे ! मी वदलें कांहिं तरी हें; कोटिक्रमच वृथा
होइल करणें ! निर्लज्जच मी, बरें काय म्हणतां ?
विनोदसमयीं पाणी चमके नयनीं, मी हरतें,
वेडि खुळी परि सौख्य सेवितें, तव हृदया वरतें !
नकोच सोडूं हात सुखद हा, अविरत प्रेमसुधा
संचरुं दे प्रतिरोमीं गात्रीं नव चैतन्य सदा.
करस्पर्शनें, प्रेममीलनें, प्रतिनेत्रनिपातें
जागृत स्वप्नें पडती, होती खरीं, साक्ष पटते.
अश्रुस्मरणी फिरवुनि जपतें मधुर तुझें नाम;
भक्तावर कर दया,–हा न कां प्रेमाचा हुकुम ?

* * * *

ज्योत्स्नारंजित घालविल्या किति शरदीर्घरजनी;
विषाददीर्घा घालविणें परि भाग पडे रुदनीं !
हिंदोळ्यावर बसुनी प्रेमें गाणीं तूं म्हटलीं:
चंद्र लाजला, गर्व हरपला, लपे ढगाखालीं.

अशुभ तेंच मज होतें गमतें, तूं कोठें लपसी !
चंद्र उगवला तरी न दिससी, अंत किती बघसी ?
लतिकावलयीं शशि नसतां करि नर्तन खद्योत;
क्षुद्र जनांचे चार बघुनि तुज जडे काय खंत ?

* * * *

हृदय थोर तव भव्य सिंधुसम विशाल तें दिसतें,
मीनासम मम क्षुद्र हृदय हें त्यांत सदा रमतें;
किंचित जातां तीरावरतीं प्राण लया जाती,
त्वन्मानसजलविणें गमतसे दुःसह ही जगती !

* * * *

क्षुद्र मीन कां ? प्रतिबिंबित मी इंदु तुझ्या सलिलीं,
तव प्रेमाला भरती आणीं बांधुनि करजालीं;
तव हृदयाची खळबळ होतां अस्थिर शशिबिंब,
सुखदुःखाचा भार तुझ्यावर जीवन-अवलंब !
रत्नाकर ! दे विचार-मौक्तिक-गण तळिंचे मजला;
कर-तारेनें हार गुंफुनी उधळिन गगनाला.
हृदयावर कां थर बर्फाचा ? विचार ते लपले;
परावर्तनें किरण इंदुचे निष्प्रभ बघ झाले.
कवण रीतिनें तुला आळवूं ? मूक कसा बनसी ?
हाय ! जळाली ज्योत्स्ना ही बघ ! स्मृतिहि सकल हरिसी !

* * * *

त्वत्प्रेमाचें पान कराया जीव तहानेला,
दानशूर तूं पुढें ठेविसी सुधापूर्ण पेला !

करितां करितां पान तयाचें त्रिभुवन हो फुल्ल,
सर्व संपतां–छे संपे कां ?–मना पडे भूल !
वेड जडतसे ! एक तुझें तें मधुमंजुल हृदय
स्मरतां रमतें, परि न काव्य करि शब्दीं शिरकाव.
त्या हृदयाची, त्या प्रेमाची, दिव्य सुधेची त्या
फेड करुं कशी ? तुल्य न जवळी थोर तुझ्या हृदया !
मारुतगानीं तन्मय कुसुमें माना डोलविती,
पवन करितसे छिन्न पाकळ्या नष्ट सुरस-कांती !–
असें वाटतें काय तुला वद ? पसरूं दे गंध !
ठेविन हृदयीं, अधिकच विखरिन दिगंतिं स्वच्छंद.
हृदयपात्र तव प्रेमसुधेनें वाहूं दे पूर्ण !
उन्मत्त मनें करीन प्राशन त्यांतच पोहेन.

* * * *

विरहतनुतनू निर्झरणी हळु दरींत झुळझुळते;
व्यथा न साहुनि, तुझ्या चिंतनीं गात तिथें बसतें.
नाथ ! अतां किति हृदय-परीक्षा बघतां यावेळीं ?
निकषघर्षणीं सुवर्ण संपे, हळहळ मग जाळी !
' आम्र फुलतसे युवतिगायनें '–कविजनसंकेत;
यत्न गावया करितां विरली स्फूर्ती नामांत !
लक्ष्य तव मुखीं, स्फूर्ती कसली ? म्हणूं काय गान ?
हृदय-चोरिची तऱ्हा नवीनच दिलीस शिकवून !
कां म्हणुनी पण दोषुं तुला ? तव ठेव सुखें जपुन.
श्रांत होइ का तरु जरि लतिका अर्पितसे सुमन ?

सद्गुणमंजरि तुझी इंगितां मनिं येई शुचिता,
मंगल विदिशा उत्सुक होते वाट तुझी बघतां.

*　　*　　*　　*

शयनावरती पडतां जागृत गतस्मृती होती,
सुखस्वप्नांनीं पुलकित हो तनु निद्रेंतच रात्रीं.
अर्धजागृता असतां मी, विधु स्पर्शी किरणांनीं
गवाक्षांतुनी; गमे सुखविशी तूंच मृदु करांनीं !
स्वप्नामध्यें रात्र संपते, येइ निशा त्वरित,
मत्सरपूर्णा विघात करि ती डोळे मिचकवित.
येत नसे कां तुजला अजुनी दीनेची करुणा ?
हृदयकथारसपानिं तव सदा तृषिता मम रसना.
निशाच रुचते रम्यतरा सुखस्मृतीकल्पनांनीं,
संगमिं होतिल रम्यतरा मग अखिला दिनरजनी.
रोषयुक्तमुख उषा, भानुही; साहूं दिन कैसे ?
सुधा धाडिसी काय दयाळा ! सदया ! इंदुमिषें ?
शशिकररज्जू धरुनि चढेनच, तुझ्याकडे ध्यान;
खुशाल कोपें उषा चडफडो ! हाः सारें स्वप्न ! !

*　　*　　*　　*

नभोलेख हा पुसला येतां नयनिं अश्रुजाल !
उत्कंठायुत तोडि निराशा हृत्कंपनमाळ !

(सौ.) मनोरमाबाई रानडे.

# " कालियामर्दन. "

जलीं स्थलिं दिसे प्रभू नयनिं कर्म-कंसा सदा;
प्रमोद बहु होय त्या, अवतरे अरी तो यदा;
अनादि विभु पातला जठर-बंदिशाळा-गृहीं,
गमे हरिस तैं मिळे सुखद योग्यसें क्षेत्रही. १

अधर्म कलि मातला, सबल रूढि ही जाहली,
नुरे सुकृति नीति वा, समुळ उन्नती खुंटली;
स्वधर्म परिपाळुनी सुपथ दाखवावा जनीं
म्हणूनि शिव येतसे जगतिं जीव तैं होउनी. २

चतुर्भुज सुलक्षणी बटु पुढें उभा पाहतां,
सुखोदधिंत पोहुनी जननि भोगि एकात्मता;
क्षणांत परि तो हरी रुचिर बाल-रूपा धरी,
सतृष्ण-हृदयें तया निरखि माय डोळे-भरी. ३

पडे विकल देवकी स्मरुनि कंस-कर्में परी,
म्हणे पतिस—"बाळ हें लपवितां नये स्वोदरीं !
कसें करुनि वांचवा तनय एवढा हा तरी !
न कंस वधि यास तों कुणिकडेहि ठेवा दुरी ! " ४

पुशी पदरिं नेत्र ती, गंहिवरे, धरी त्या उरीं,
करी हृदय वज्रसें, तनय देइ नाथा करीं;
पिता जड-पदें निघे, वचहि बोलवेना तया;
असंग नर तो खरा, द्रव न पुत्रशोकें जया. ५

अपार यमुना भरे, वरुनि मेघही वर्षती,
जलीं हरि-पिता शिरे, तरि न चालवे त्याप्रती;
दुभंग परि होउनी तटिनि मार्ग देई तया;
घडे सुजन-संग जैं कुमतिगर्व जाई लया. ६

भयार्त वसुदेव तो लपत नंदगेहीं चढे,
तयें निरखिली तदा नवसुता यशोदेपुढें;
हरीस मग ठेवि तो, उचलि योग-मायेप्रती;
वसेल हरि त्या स्थलीं कधिं न सांपडे माव ती. ७

चिरंतन परेश तो प्रकट जाहला गोकुलीं;
व्रजीं सकल त्यामुळें प्रबळ चेतना लाभली.
जगज्जनक त्या स्थलीं जनन घेइ इच्छागुणें.
शिशु-स्वरुपि ईश तो रडुनि शब्द ' कोऽहं ' म्हणे. ८

प्रमोद निजनंदना बघुनि होइ नंदाप्रती,
जिवाहुनि जपे सुता सतत वासना-माय ती;
दुरी न करि, वाढवी स्वकरिं ती तया घेउनी,
शुचित्व-गुटि पाजि ती सजवि त्यास दिव्यांजनीं. ९

सदाचरण-तीट ती तनयभालिं लावी करें,
तदीय तनु झांकिते विमल पुत्र-मायांबरें;
परोपकृति-ताइतीं हरिस भारुनी बांधि ती,
तशाच भव-बंध ह्या यदुस सांखळ्या शोभती. १०

करी जननि कौतुका स्मरुनि जन्म-हेतू परी,
सखे करुनि गोकुलां रमवि त्यांप्रती श्रीहरी;

अकर्म-दधि-गोरसा पचवि त्यांसवें चोरुनी;
अलिप्त-गतिनें कृती सफळ बोधि हें क्रीडनीं. ११

दशेंद्रिय-गणांसवें शिरुनि देह-वृंदावनीं
प्रपंच-भंवऱ्याप्रती फिरवितो सदा हर्षुनी;
मना-परिस फेंकितो निज परिस्थिती-कंदुका,
स्व-संचित-फळें तशीं स्वकरिं वांटि गो-बालकां. १२

गमे अबल तो जनां बघुनि बाह्य बालाकृती,
परी सहज खेळतां करि अतर्क्य दैवी कृती;
निरा-कृति अ-नाम जो, जननि पुत्र मानी तया !
व्रजा स्ववश ठेवितो हरि निरोधुनी इंद्रियां. १३

खुडी स्व-अघ-बीज तो वधुनि कोप-कामाऽसुरां,
वधी कुमति-पूतना तशिच शोषुनी तद्धरा;
विराटपुरुषा बघे हरि-मुखीं जई जन्मदा,
प्रभु-स्वरुप बाल्य हें जणुं कथी तिला तो तदा. १४

वदेल हरि तें करी बनुनि पूर्ण सत्याग्रही,
परार्थ झटतो तसा अनुचरांसवें प्रत्यहीं;
पडे कु-वच-मेघ जैं करि तदा स्वकार्याविना,
हरी स्वबलवर्धनें उचलि धैर्य-गोवर्धना. १५

जगाख्य यमुनाजलीं प्रबल जाहलासे कली,
विकार-गरलें तयें सुजन-मानसें दूषिलीं;
पिईल जल तो पडे तटिं गतासु तैं होउनी,
म्हणून सजला हरी कुटिल कालिया-मर्दनीं. १६

अधर्म भय मानुनी करुत लोक धर्माश्रया,
म्हणून अहि हा असे; उलट तोच मोही तयां;–
भुजंग-खलता अशी बघुनि कोपला गो-पती,
म्हणे–" करिन केधवां विगत-तेज मी त्याप्रती." १७

बसे प्रगतिरोधनीं टपुनियां कली-कालिया
रुढीस अवमानि जो, चिडुनि दंशितो हा, तया;
नियोजि मनिं देव कीं–"म्हणुनि मर्दुनी त्याजला
करीन भय सोडुनी अमल लोक-गंगा-जला." १८

विवेक-बल-यंत्रिं तो निज-मनस्तरी आंवरी,
अभंग मग तीप्रती षडरि-छिद्र-नाशें करी;
अही-दमनिं नाव तो सु-मति-नाविकां अर्पितो,
विदेहि हरि जाहला तदुपरी स्थित-प्रज्ञ तो. १९

बुडे जलिं हरी, पडे तटिंच वासना-माउली;
नुरे तदिय काज, ती निधन यास्तवें पावली;
करोनि लय वृत्तिचा प्रभु समाधि लावी जलीं,
अचेतन दशेंद्रियें म्हणुनि तेधवां जाहलीं. २०

हरी चरण-ताडनें फणि-मदा हरी जेधवां
अही गलित होइ तैं, नुरति दंत-संस्कार वा;
अनन्यगतिनें तदा शरण काल त्या येतसे,
दयार्द्र मतिनें प्रभू अभय त्याजला देतसे. २१

वदे प्रभु तया " सुखें जलिं मदाश्रयें राहुनी
जनोन्नतिस साह्य हो मजसवेंच रात्रंदिनीं !

मला विसरुनी परी त्वदधिकार तूं दाविसी,
तरी मम करें असा कठिण शासना पावसी ! " २२

प्रभू निज मनोबळें स्ववश काल-वृत्ती करी,
विशुद्ध जन-वारितें करुनि येइ मोदें वरी;
हरी बघुनि गोकुळीं स्व-पर-भावना लोपली,
विकल्प हरुनी व्रजा अढळ शांतता लाभली. २३

पदें फणिमदा हरी सगुण कर्मयोगी हरी,
स्वदेह-मुरली करीं धरुनि वाजवी सुस्वरीं;
अनंतमय होय तो, पुढतिं सत्स्वरूपा धरी,
शिवांश-मुरलीधरा मजसि आत्मबोधा करी ! २४

(सौ.) शारदाबाई परांजपे.

# बालोपदेश.

## १. सिंह आणि चार वृषभ.

एका वनांत होते वृषभ करुनि जूट राहिले चार;
त्यांचेवरि सिंहाचा होता डोळा अनेक दिन फार. १

त्यांतें मारुनि खाया बहुविध केले उपाय सिंहानें;
परि वृषभ साध्य झाले ते न तया संघशक्तियोगानें. २

मग सिंहानें अपुलें या कामीं बल उदंड तरि फुकट
ऐसें पाहुनि चारी माराया वृषभ चिंतिलें कपट. ३

चौघांच्या मनिं मत्सर पेटवुनी त्यांत फूट पाडावी–
मोडावी जूट अशी सिंह मनीं युक्ति सुलभ तो भावी. ४

बहुत चहाडया करुनी त्यानें त्यांच्यांत वैर माजविलें;
झाले जूट फुटूनी निर्बल, ते संघशक्तिनें त्यजिले. ५

मग एक एक त्यानें मारुनियां वृषभ भक्षिला सहज;
वायूच्या शक्तिपुढें क्षणही न टिकेल एक एक रज. ६

* * * *

बालांनो ! गोष्ट अशी करिते बहुमोल विविध उपदेश:
जोंवरि ऐक्य स्थिरतम, तोंवर रिपुची न भीति लवलेश. ७

सामर्थ्य जेथ निष्फल तेथ मनोरथ फळेल युक्तीनें–
हें तत्त्व धरुनि चित्तीं वागो तो, जो न थोर शक्तीनें. ८

योजुनि बहुविध माया शत्रु झटति संघशक्ति फोडाया,
हें स्मरुनि मनांत करा धैर्यानें विफल शत्रुची माया. ९

## २. करडूं आणि लांडगा.

तान्हेलें करडूं जल प्याया गेलें सरित्प्रवाहाला;
प्याया जल तान्हेला त्याच ठिकाणास लांडगा आला. १

देखुनि करडाला तो वदला हें लांडगा वचन खोटा:
"माझें प्यायाचें जल बिघडविसी, त्वदपराध हा मोठा!" २

नम्रपणें करडूं तें वदलें: " तुम्हि वरि असून, मी खालीं,
तुमचें जल बिघडविलें ही तुमच्या गोष्ट मनिं कशी आली?" ३

करडास लांडगा तो मग वदला: " हें असो; तुवां गाली
मज दिधल्या गतवर्षी, ही मज आतांच आठवण झाली." ४

वदलें करडूं: " दादा, मज जन्मुनि जाहले न सा मास,
गतवर्षी तुम्हां गाली म्यां दिधल्या हें अशक्य वच खास." ५

पदरांत मूर्खपण हें येतां तो लांडगा चिडुनि वदला:
"त्वां नसल्या तरि तुझिया जनकें असतिल शिव्या दिल्या मजला. ६

एकुन एकच; दुष्टा! तूं कीं तव बाप नीच दोघेही!
सभ्याचार न तुजला ठावा वृत्ती सदोष तव रे! ही." ७

हें लांडगा वदुनि वच करडा फाडून भक्षिता झाला;
बल हाचि न्याय–असा ये प्रत्यय या जगीं सदा असला. ८

(सौ.) सरस्वतीबाई भिडे.

[ भक्तिरस. ]

# उषःसूक्त

( " उद्धवा शांतवन कर जा० "–या चालीवर. )

बाळ हें कुणाचें न कळे तनु दिसते गोजिरवाणी
लोचन हे धाले माझे कुंठित मम झाली वाणी ! ॥ ध्रु० ॥

कमल तें फुलावें सलिलीं त्याच्यापरि दिसतें अंग,
पावेल पाहुनी वाटे मदनाचा गर्वहि भंग,
युवतिचा कोणत्या न कळे भूषवी बसुनि उत्संग;
उचलुनी वाटतें घ्यावें,
पाहतां मुखाशीं न्यावें,
अमृत तें मुखानें प्यावें,
त्यापुढती अमृतहि पाणी; बाळ हें० १

केश ते पातले भालीं उडुनियां शोभती गालीं,
वरिवरी चाळवे तेणें गालांवरि आली लाली,
भूषणें नसोनी अंगीं नैसर्गिक शोभा आली;
घालितें मुखामधि पाय,
डुलुनियां रसातें खाय,
अस्पष्ट शब्दही गाय,
तुच्छ या जगातें मानी; बाळ हें० २

कुटिलता स्वल्पही नाहीं केशाविण देहावरती,
नासिकीं लाविली दृष्टी तेथुनी करीना परती,
हृदय हें भरोनी जाई प्रेमाची येउनि भरती;

ऐकुनी तयाचें गान
देहाचें हरपे भान,
विसरलों भूक ताहान,
मोदाश्रु स्रवती नयनीं; बाळ हें० ३

मानवी म्हणोनी हृदयीं आलेली शंका फिटली,
पाहुनी लक्षणें सारीं ओळखी मनाला पटली,
सृष्टि ही निर्मिली जेणें मूर्ति ही तयाची नटली;
हा असे जगाचा राय,
अन्यथा रूप हें काय
निर्मिते मानवी माय,
देखिलें न असलें नयनीं; बाळ हें० ४

तापसी काननीं तपती कष्टविती तपतां देह,
ज्ञान तें कळाया ज्याचें जाउनी लया संदेह,
सांडुनी कामना सारी कुणि त्यजिती दारा गेह;
तोच हा शिशुत्वें आला,
अद्भुत कीं त्याची लीला,
कोणतें घडेना त्याला,
कवळितों जवळि जावोनी; बाळ हें० ५

" महाराष्ट्रिय."

# मुरली.

वंद्य सदा मुरली, प्रभूची, वंद्य सदा मुरली;
शब्दसृष्टि तशि जननमरणगति,
जिला वर्णितां कविची सरली;। वंद्य सदा मुरली ॥ध्रु०॥

प्रभुहृदयाची अंतःस्फूर्ति,
चराचरांची नादप्रीति,
अखिल जगाची शाश्वत शांति
जीच्या ठायीं समरस मुरली । वंद्य सदा मुरली० १

दोन वितींची, बहु छिद्रांची,
सहजभंगुरा स्थिति वर्नि साची,
पुण्याई परि सद्वंशाची
म्हणुनि कृपें करिं प्रभुनें धरिली । वंद्य सदा मुरली० २

भवतापें सद्हृदयें उलती
अमित, तींच जणुं मुरलिंत शिरती,
करुणामृतमय अधरप्रांतीं
धरुनि सुखवि त्यां नित वनमाली। वंद्य सदा मुरली० ३

नादचि आदि सकल जगताचा,
नादांतुनि उद्भव शब्दाचा,
शब्द जनक शुचि काव्यनदीचा
समूर्त नादब्रह्मचि मुरली । वंद्य सदा मुरली० ४

**श्रीकंठ नीलकंठ चाफेकर.**

# पंढरी.

सगुण ब्रह्म सांवळें विटेवरि उभा पांडुरंग
भोळा भाविक भक्त तुकोबा गातो अभंग. २.

* * *

गंगा वाहे पवित्रसलिला विमल चंद्रभागा
पदोपदीं हरिनाम गर्जते पंढरिची जागा
पुण्यात्म्यांच्या पुण्याईनें स्थळ तें पुण्यमय
उभा विटेवरि वैकुंठींचा भक्तसखा सदय
हरिनामाचे घोष चालले गजर नभीं भरला
फुलले साधुजनांचे मेळे नाद एक उरला. ८:

* * *

ज्ञानोबा पालखींत बसुनी जाती मिरवीत
" भावार्थाची " उच्च " दीपिका " सतेज पाजळित
भागवताचा पाया रचुनी धन्य धन्य झाला
नामा भगवद्भक्त कुटुंबासह तेथें आला
भगवंताचा ताइत केवळ धन्य पुंडरीक
प्रभुहृत्कमळीं बैसुनि घेई प्रभुपार्शी भाक.
राजयोगि एकनाथ आले हत्तीवर स्वारी
भागवताचें पुराण सांगति, डोलति नरनारी
भक्तिमार्ग कळसास पोंचवुनि मंदिर पूर्ण करी
महाराष्ट्राचा वेद गात ये तुकयाची स्वारी.
एकतारिवर सूर लावुनी येत मिराबाई
प्रेमानें जी पंढरपुरचा नाथ विकत घेई
" या दुःखावेगळें एकदां करिं पंढरिराया "
गान्हाणें सांगण्यास आली सखू हरीपाया

आंत बाहेरी ध्यान लागलें पंढरिनाथाचें
घोष विठोबा रुक्माईचा गर्जतात वाचे
एकादशिची पुण्यपर्वणी महाराष्ट्र लोटे
वैकुंठींचें ब्रह्म सांवळें पंढरीस भेटे. २६

* * *

धन्य देश महाराष्ट्र मराठे लोक धन्य धन्य
पन्नगशायी उभा विटेवरि हें ज्यांचें पुण्य. २८

* * *

साधाभोळा मराठमोळा हरिभजनीं लीन
आला पंढरपुरास भक्तीनदींत वाहून
प्रसाद हरिचा गळयांत साध्या तुळसीच्या माळा
अखंड हरि हरि घोष मुखानें हातीं करताळा
" अनंतगुणमय अनंतरसमय " नाम अनंताचें
अखंड हरि हरि घोष मुखानें शब्द जिव्हाळयाचे
या भक्तीस्तव क्षीरसागरा सोडुनि हरि आले
सोडुनि पन्नगशयन विटेवरि सदैव राहीले
महाराष्ट्राच्या धर्मग्लानीस्तव हरि कळवळुनी
पुंडरिकाचें निमित्त करुनी आले धावोनी. ३८

* * *

पंढरपुरचा अपार महिमा सर्व एक झाले
विसरुनि भेदाभेद सकलही हरिनामीं रतले
पंढरिनाथापाशीं नाहीं नरनारी-भेद
ऐके विठ्ठल केवळ एकच भक्तीची साद
पृथ्वीचें वैकुंठ पंढरी नगर आटपाट
प्रेमाचा दरबार प्रेमळ भक्तीची पेठ

विसरुनि मीपण ब्रह्मपदावरि व्हावें तल्लीन
जावें पंढरपुरास नंतर हरिचरणीं शरण. ४६

* * *

"वृत्तींची विषमता लोपली द्वैतभाव हरला"
महाराष्ट्राचा सर्व मराठा त्यांत एक झाला
पंढरपुरच्या राउळामधें ऐक्य-ध्वज उगवे
त्या ऐक्यानें देश एकदां नवजीवन पावे
महाराष्ट्राचें स्वराज्य झालें स्थापन रायगडीं
परी तयाचें बीज रोविलें भिवरेच्याच थडीं
महाराष्ट्राची कीर्ती केली मावळवीरांनीं
तरी तयांना समर्थ केलें भक्तिसमर्थांनीं
पंढरपुरची रुक्माबाई तुळजापुरिं गेली
जगदंबारूपानें शिवकरिं भवानि अर्पियली
गर्जे पंढरपूर 'ज्ञानबा तुकाराम' नादें
रायगडीं ध्वनि 'जय जय ! हरहर महादेव !' कोंदे. ५८

* * *

भगवंतानें महाराष्ट्र हें धन्य धन्य केलें
वैकुंठाचें नगर उचलुनी येथें वसवीलें
खरा मराठा पंढपुरची प्रौढी मिरवील
महाराष्ट्रभांडारपंढरीयशगुण गाईल
महाराष्ट्राचें मंगल खेळे खेळ वाळवंटीं
महाराष्ट्राचा नाथ जागतो भीमेच्या कांठीं. ६४

पुंडरीक वरदा हरि विठ्ठल !

श्रीनिवास रामचंद्र बोवडे.

# मुरलीधरास पुढें घेऊन—

[ प. वा. विनायक त्रिंबक टोकेकर हे तत्त्वज्ञानविषयांतील पंजाब विश्व-विद्यालयाचे फर्स्ट क्लास् एम्. ए. होते. भगवद्दर्शनार्थ अनेक निर्वाणीचे प्रयत्न झाल्यावर **मुरलीधरास** पुढें घेऊन त्यांनीं साक्षात्‌दर्शनाकरितां तीन दिवस अहोरात्र त्याचा धांवा केला. अखेर भेट न झाल्यामुळें त्याच मुरलीधरासह विहिरींत उडी टाकून त्यांनीं देह कृष्णार्पण केला! त्यांची शेवटची हाक पुढील गाण्यांत दिली आहे.]

[ चाल:—धांव् धांव् श्रीरघुराया० ]

बोल् बोल् मजसि कन्हय्या! एकवार तरि बोल।
सख्या रे। एकवार तरि बोल।
किति काकुळती येउं। किती ही। तळमळ माझी फोल।
सख्या रे। तळमळ माझी फोल॥ ध्रु०॥
क्षणैक थांबिव थांबिव सखया। मंजुल मुरलीगान।
तुझें हें। मंजुल मुरलीगान।
शब्द न पडतां श्रवणीं माझे। जातिल पंचप्राण।
सख्या रे। जातिल पंचप्राण्॥ बोल् बोल्० १
पुरे पुरे या बोटांचा हा मुरलीवरती खेळ।
सख्या रे। मुरलीवरती खेळ।
शेवटची बघ हाक कन्हय्या। सांभाळीं ही वेळ।
सख्या रे। सांभाळीं ही वेळ॥ बोल बोल० २
दृष्टि तुझी या मुरलीवरुनी। क्षणभरि तरी ही काढ।
सख्या रे। क्षणभरि तरि ही काढ।
तुझिया शब्दापुढतीं नाहीं। मोक्षाचीही चाड।
मला रे मोक्षाचीही चाड॥ बोल् बोल्० ३

तव अधरींचें लीलास्मित हें । अजुनि न पावे भंग ।
सख्या रे । अजुनि न पावे भंग ।
कासाविस हें माझें मन, तूं । गानामाजी दंग ।
सख्या रे गानामाजी दंग । बोल् बोल्० ४

अजुनि कसा हा पायीं नाचे । पैंजण धरुनी ताल ।
सख्या रे । पैंजण धरुनी ताल ।
बोल एकदा करुनि कृपा गा । पुरे पुरे हे हाल ।
सख्या रे । पुरे पुरे हे हाल ॥ बोल् बोल्० ५

शेवटचा हा श्वास कन्हय्या । गेले बघ हे प्राण ।
सख्या रे । गेले बघ हे प्राण ।
भरुनी विश्वीं परि हे गातिल । एकचि कानीं गान ।
तुझ्या हें । एकचि कानीं गान ॥ बोल् बोल्० ६

'कुवलयानन्द.'

# प्रभुप्रार्थना.

## भूपाळी.

[ कै० 'माधवानुज' यांची एक अप्रसिद्ध कविता. ]

प्रभो ! सदा तुजसाठीं अविरत हे नयन जागती. ॥ध्रु०॥

घडलें नच तव दर्शन
मार्ग करी अवलोकन
त्यांतचि सुख मानुनि मन । स्वस्थ हो अती. प्रभो० १

द्वारीं धूळींत बसें
करुणा तव भाकितसें
प्राप्त न, सुख मानितसें । इच्छिण्यांत ती. प्रभो० २

गेले मम मित्र दुरी
साह्य न मज कवण करी
इच्छुनियां तुजसि हरी । सुख वरी मती. प्रभो० ३

अमृतरसें पूर्ण धरा
व्याकुल ही प्रेमपरा
प्राप्त न तें प्रेम जरा । सुखवि आस ती. प्रभो० ४

# ईशान्वेषण.

निशा संपली, गगनमंडळीं भास्वत्कर येतां
जळुनि जाहलें भस्म तमाचें भिउनि पळुनि जातां. १

उषा उघडुनी नेत्र आपुले पाही स्मित करुनी
दिशा धवळल्या तत्तेजानें लालि चढे गगनीं. २

कमळें होउनि जागीं पाहति आश्चर्यें वरतीं
तत्सख येउनि भृंग किमपि तयिं कर्णीं गुणगुणती. ३

तरु आनंदें डोलुं लागले, लता स्मिता वरिती
कुसुमांचा उपहार घेउनी जणुं सजल्या दिसती. ४

मंजु मंजु करि गुंजित वायू कुंजलताकर्णीं
समद भृंगही तुंद मधूनें सुंदर करि गाणीं. ५

येतां रवि उदयास, तयाची स्तुति करुनी गाया
विहग उडाले गगनमंडळीं प्रभुसी सेवाया. ६

पाहुनि ऐशा प्रभातसमया नवबल हृदयिं शिरे
नवजीवनही गात्रिं संचरे, मज तिळ भान नुरे. ७

गाइन मी मम सखया प्रभुला करिन नविन गाणें
शरिराची ह्या करुनि मुरलि मम गाइन प्रेमानें. ८

बसविन हृदयासनीं प्रभूला, चरण धुइन प्रेमें
नयनाश्रूंनीं, सेविन सखया त्यजुनि सर्व कामें. ९

धांवत येतां श्रम प्रभूला असतिल बहु झाले;
रगडिन हळुहळु पाय म्हणुनि मी मदर्थ प्रभु दमले. १०

हाय हाय मी देउं काय परि प्रभुला खायाला ?
सर्व विश्व हें तुझें, मम असें नुरलें जगिं मजला. ११
येशिल ना परि सख्या येथवरि मजसी सुख द्याया
करिं आमंत्रण दीन जरी मी तुजसी भेटाया. १२
सामग्री मम नसे तिळहि गृहिं, अर्घ्य न वा पाद्य,
वस्त्र न, सुम फळ नसे कांहिंही, मग कोठुनि खाद्य ? १३
वस्त्र नेसतों जीर्ण जीर्ण जें शतस्थळीं झालें
शीत उष्ण वा निवारिना जें, जें सर्वहि विरलें. १४
शोधुं कुठें परि तुज सखया मी, कुठें असिस बसला ?
कुठें धावसी, कुठें रंगसी, कुठें अससि गेला ? १५
किती धुंडिले पर्वत दुर्गहि गहनहि वनमार्ग
कुठें लपुनि पाहसी मौज का सखया मज सांग. १६
रम्य नृत्य करि नदी तिथें मज नाहिं सखा दिसला,
वनवायूसह सुस्वर रव वा नच काढित बसला. १७
कुसुमित वल्लरिकुंज पाहिले, धुंडियलीं रानें,
खगांसवें आकाशिं उडालों बघण्या प्रेमानें. १८
नभःसरीं पोहलों, तोडिलीं किति तारापद्में,
परि न गवसला सखा मला कीं लपला तो छद्में. १९
प्रदोषसमयीं रजनिमुखाचें चुंबन जों घेई
रसिक सुधाकर प्रेमरंगिं, तों त्या स्थळिं मी जाई. २०
मला वाटलें गोपिजनांचा महारसिक प्रेमी
असेल खेळत रासक्रीडारंगीं निजधामीं. २१
धांवत गेलों, मज पाण्याला पाहुनि वाटे कीं
मज टाळाया सखा मोडुनी रासरंग टाकी. २२

मुखा दडविसी कां मजपासुनि, कुठें लपसि सखया ?
हृदयासन हें रितें करिसि कां सजसी भटकाया ! २३

किंवा कौतुक करावया कां रडविसि प्रेमानें ?
नको चाळवूं, जीव गुदमरे प्रेमि विनोदानें. २४

कंटक रुतले पदीं, शुष्क मुख झालें बळ गळलें
किती अंत पाहसी पळाया प्राण सर्व सजले. २५

थकलों, दमलों, पद न हालवे पूर्ण निराशेनें
कोरड पडली, येइल कैसें स्तुतिचें मूखि गाणें ? २६

जरठ तरूच्या खालीं दु:खें तडफडुनी बसलों
लोचन मिटले, स्मृतिहि निमाल्या, गलितगात्र झालों. २७

पटल तमाचें पसरुं लागलें, भान सर्व हरलें
दूरदूर परि तेज रुचिर तम सारुनि अवतरलें. २८

हृदय विकसलें, हास्य चमकलें, सुखमय मन झालें
अंतरंगसुम फुलुनी परिमलरूपें दरवळलें. २९

चित्तवृत्ति मम सर्व हरपल्या, अहंभाव विरला
जवळि जवळि ये तेज बघुनियां प्रेमि जीव नटला. ३०

निकट राहिला उभा सखा मम, स्मित चमके गालीं
वाटे उमलति दशनकोरकहि रम्य अशा काळीं. ३१

उठलों दचकुनि, हात पसरले, नयन सुखें मिटले
अधरा मिळतां अधर प्रभुचा, जीवन मम विरलें. ३२

गणेश दा. टिळक.

# ईश्वर कोठें आहे ?

आहे कुठें सागर थोर बोला–
मासा पुसायास तयार झाला;
येते जयाला भरती सदाही
ऐसें कथावें मज पूर्वजांहीं. १
मोठा असे थोर अफाट भारी
आहे जयामाजि अपार वारी
कानावरी ये मम सुज्ञवाणी
दावाल का तो मजलागिं कोणी ? २
नद्या पवित्रा मिळतात ज्याला
ज्यापासुनी जन्मति मेघमाला
ऐसें कथावें मज पूर्वजांनीं
दावाल का तो मजलागिं कोणी ? ३
पक्षी उडे जो गगनीं सकाळीं
तोषे मनीं पाहुनि अंशुमाळी
आनन्द मोठा हृदयास झाला
कोठें हवा तो पुसतो दुजाला ! ४
जीवास दे संतत जीवनाला
भूगोल हा सर्व भरून गेला
ऐसें जियेला बहु वर्णिताती
दावाल का हो मजला हवा ती ? ५
वस्तूस दे सूर्य नवीन रूप
पाहून येतो हृदया हुरूप

मी गान गातों गगनांत जातों
हवा न देखून निराश होतों. ६

वसे सदा मानव ईशरूपीं
जाणे तयाला न तरी कदापी
पुसे सदा मानव मानवाला
कोठें दिसे ईश्वर का तुम्हांला ? ७

जाणे जरी सर्व खगोलमाला
भूगोल धुंडाळुनि तृप्त झाला
तत्त्वार्थ शोधूनि मनीं निवाला
जाणे न चित्तीं तरि ईश्वराला. ८

अनेक सिद्धांत नवीन दावी
प्रौढी मुखें काय किती वदावी
भरून विश्वीं जरि राहियेला
तरी न जाणे मनिं ईश्वराला. ९

दुर्लक्ष तें लक्षितसे जरी तो
भविष्यही या जगिं वर्तवीतो
भ्रमें भरूनी पुसतो दुजाला
कोठें दिसे ईश्वर का तुम्हांला ? १०

विश्वेश जो विश्व भरून ठेला
ज्ञानाविणें तो न दिसे कुणाला
शोधीतसे संतत कारणाला
जाणे न तो कारण कारणाला. ११

मोरो गणेश लोंढे.

# स्तुतिसुमनमाला.

[ कै. विठ्ठल भगवंत लेंभे. ]

प्रसन्न प्रेमें हो, सरस रसने! मंजु कवनीं
रसाच्या आधारें कवि म्हणविती धन्य भुवनीं;
तुझ्या लीला लोकीं रसिकहृदया लोल करिती,
तुझ्या हस्तीं सूत्रें सुकविमतिचीं सत्य असती. १

प्रबंधच्छंदांच्या खवळुनि मनीं थोर लहरी
करील श्रोत्यांचें कविवर मनोरंजन जरी,
चमत्कारें सारें भरुनि उरलें विश्व बघुनी
अहो खुंटे माझी मति खचित मी मंद भुवनीं. २

प्रभास्तोमा चंद्रा जणुं चुरुनियां रत्नवलयें
सुनील व्योमीं हीं कवण पसरी, हेंचि नकळे;
शशीच्या खंडाचा धवलरजनीकांतवलयें
कसा शोभे? कालें! वरि वरि मनीं हें नवल ये. ३

नितंबीं अद्रीच्या रुचिर हिरव्या गार कुरणीं
सख्या गाईसंगें चरति झणिं निःशंक हरिणी;
खुले फुल्लाम्भोजप्रकरविभवें रम्य सरसी,
जळीं बिंबे रत्नांकुरवलयशी कांति रविची. ४

कसें वर्षाकालीं जलदनिकरें अंबर भरे,
कडाडे कैशी ही चपल चपला घर्षणभरें,
तळीं जागोजागीं जमति पिवळ्या किल जलें,
जिथें भेकांमागें फिरति ढवळे रानबगळे. ५

गिरे ! व्योमा ! सोमा ! अभिनव रवे ! सुन्दर धरे !
नद्यांनो ! वृक्षांनो ! कुसुमित लते !—गंधचतुरे !
समुद्रा !—गंभीरा ! बघुनि तुमचें वैभव मनीं
गमे श्रीविश्वेश भ्रमण करितो पुण्यभुवनीं ! ६

स्वरूपीं विश्वाच्या अभिनव विभो ! वैभव भरे,
तुझ्या अस्तित्वाचा परि अजुनिही संशय उरे;
जडां मूढां नाहीं अजुनि परमानंद कळला;
कसा अंधा द्याया कर न अजुनी देव वळला ? ७

अहा ! लागे चित्ता तळमळ बहु श्रीप्रभुवरा !
दयासिंधो ! बंधो ! तुजसि नमितों जोडुनि करा !
महाक्षुब्धा वृत्ति क्षणभरि न विश्राम मज दे;
अहो देवा ! केव्हां दिसतिल मला मंगल पदें ? ८

जिथें शब्दस्पर्शाद्यखिल[1] गुण जे पांच वसती,
तसेच त्रैगुण्य[2]प्रकृतिगुण हो ज्यासि मिळती,
तयाच्या संसर्गें क्षर[3] पुरुष हो भासुनि मनीं
क्षण क्षीणत्वाचा अनुभव जडे सर्व भुवनीं. ९

वसे सर्वां भूतीं प्रभु सतत जो प्रेमळ असे,
विनाशी भूतान्तीं उरुनि भुवनीं ईश्वर दिसे;
पदार्थांच्या रूपासह सुरुचि आनंद वरितें,
वृथा नामीं रूपाविण न भुवनैश्वर्य कळतें. १०

१ शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध. २ तामस, राजस, सात्त्विक प्रकृतीचे गुण. ३ नाशिवंत.

अखंड ब्रह्मांडीं प्रभुवर ! तुझें रूप भरलें,
तुझ्या ज्ञानें ध्यानें सकल मम हें पाप सरलें;
तुझी धन्या मूर्ति स्फुरण मज देवोनि वदवी—
नसे दासा दूर क्षणभरहि कैवल्यपदवी ! ११

ऋतूच्या वैचित्र्यें वरि सुफलता हे वसुमती,
सुगंधी पुष्पांच्या मधुकर मरंदासि हरिती;
मनुष्याच्या सौख्यास्तव झटतसे ईश्वर असा
वसंतोद्यानानें बघुनि सकलां ये भरंवसा ! १२

परंतु श्रीकांता ! सकल जग हें नश्वर असे,
विपर्यासें भासे मृगजलचि विश्वान्तरिं वसे;
असे या जन्माचें फल विमल कैवल्य जरि तें
त्यजोनी या पाया मरणभय कां चित्त वरितें ? १३

यमाजी ! या हो या ! भय मज नसे आजि तुमचें,
कळे मांगल्याचें स्थळ विमल जें ध्यान विभुचें;
जधीं आनंदानें हृदयकमलीं राम रमला,
दयासिंधु प्रेमें धरिल हृदयीं ईश्वर मला ! १४

म्हणा पाषाणाच्या धवल विमला मूर्ति विभुच्या
वसे सर्वां भूतीं प्रभुवर अशा वृत्ति मनिंच्या;
तुझ्या संगें रंगे हृदय जनपाषाणहृदयीं
तवैश्वर्या चित्तीं स्मरतिल न अज्ञान समयीं. १५

अनर्था भूकंप ज्वॅलनवदनोद्युक्त गिरि हा
करी या विश्वाची स्थिति गमतसे भेसुर महा;

१ ज्वालामुखी पर्वत.

समुद्राच्या लाटांसह झगडुनी शुभ्र शकलें
हिमाद्रीचीं, नौकेसह* बुडविती मानवकुलें. १६

तुझ्या हस्तीं अस्त्रें भयद असती घोर असलीं,
थरारोनी माझ्या विकल हृदयीं भीति वसली.
तुझें तें सामर्थ्य त्रिभुवनिं असे ज्ञात सकलां;
अहा! हा मी क्षुद्र क्षण नच बघूं ये प्रियजना. १७

कुठें मी हा क्षुद्र? प्रकट तव सामर्थ्यहि कुठें?
कथूं जातां पापें भिवविति मला तोंडचि मिटे!
जयाला यःकश्चित् नृपति-पुरुषाशीं न वदवे,
तया मातें कैंचा धृतिनग वदाया तुजसवें? १८

समर्था! विश्वेशा! अहह परि मी दीन दुबळा!
तुला या क्षुद्राचा सदयहृदया! यो कळवळा
अनंत ब्रह्मांडें रचुनि विमला कीर्ति मिळवी,
प्रभो दे! दीनातें प्रथम परि कैवल्यपदवी. १९

स्मरोनि कमलावरा अखिल सृष्टिजन्या क्रिया
खरी सरस वैखरी करिल लोल कर्णेंद्रिया;
रसज्ञ जनरंजनीं परि न येथ ये माधुरी
खरा रसिक तूं विभो! करिं धरीं मला उद्धरीं! २०

---

* टैटॅनिक स्टीमरचा नाश कसा झाला, हें एक उदाहरण आहे.

[ शृंगाररस. ]

# चित्तरंजन.

[ 'भक्तजन सदा०' –या चालीवर. ]

चित्तरंजना । चाल हरी ! कुंजवना ।
नोहे रंजन । माझें त्याविण ।
हृदयमोहना ! ध्रु०

सुरतरुच्या शाखेसी । बांधुनियां दोल्यासी
झोंके घेउन । गाणीं गाउन । रंजवूं मना. १

करिं धरिं तू बांसरितें । तिजला मी वाजवितें
भेदूं गगन । मोहूं भुवन । काढुनी स्वना. २

तूं तोडीं मधुर फलें । वेंचिन मी रुचिर फुलें
अंतीं कवण । पावे जय न । कळुनि घेउंना. ३

गुंफीं तूं मम वेणी । माझियाच सुमनांनीं
डोळे भरुन । घेईं बघुन । रमविं कामना. ४

चिरुनि फळें तव वदनीं । घालिन मी स्वकरांनीं
तूझे वदनिं । माझे नयनिं । गुंतवूं गुणा. ५

एकाही वचनासी । कुणि न वदूं कवणासी
कोपा धरुन । राहूं रुसुन । प्रेमजीवना. ६

मुख मुखासि लावुनियां । कर करांत टाकुनियां
स्नेही जीवन । हेंची, अन्य न । दावुं त्रिभुवना. ७

उकलोनी हृदयांतें । काय दिसे शोधुं तिथें
राधामाधव–। पाहूं ह्या नव–। मधुरमीलना. ८

आनंदराव कृष्णाजी टेकाडे.

# " दर्शनोत्सुका."

नंदनंदना ! जगन्मोहना ! श्रीरंगा ! मजला
दर्शन देई तुला शोधुनी जीव गडे दमला ! १

लतानिकुंजीं तुज हुडकाया गेलें आशेनें
तृप्त न झाले नेत्र परी हे दर्शनलाभानें. २

कुंजवनींही तुला हुडकिलें परि तूं गवससि ना
हृदयाची परि उत्कंठा ती लवही हरपेना. ३

असे कोणती तुझ्याजवळ ती जादू मज न कळे
रूप सांवळें सदैव बघण्या उत्कंठित डोळे. ४

पीतांबर तूं नेसुनि बांधिसि शेला कमरेला
गळां फुलांचा हार हस्तिं तूं धरिशी मुरलीला. ५

श्रवणिं कुंडलें कंठिं विराजे कौस्तुभ तेजें तो
राकापति जणुं नीलकंठशिरिं निजतजें रमतो. ६

तुझ्या शिरीं जो मुगुट झळकतो नील माणकांचा
तो निजतेजें दर्प हरितसे कौस्तुभरत्नाचा. ७

इंदुवदन तव सदा प्रफुल्लित पंकज जणुं हांसे
चरण रक्तमृदु, रूप न ऐसें त्रैलोक्यीं गवसे. ८

नाहीं ऐसें रूप तुझें जर डोळयांनीं बघणें
वसुंधरेवर .तरी कशाला बाई मग जगणें ! ९

गोजिरवाण्या राजस वत्सां घेउनि धेनूंच्या
चारायातें बसला असशिल कांठीं यमुनेच्या— १०

म्हणुनि बघाया तुज मी तेथें गेलें लगबगिनें
परि नच दिसतां तूं भरलें मम हृदय निराशेनें. ११

खिन्न मुखानें जड हृदयानें तीरीं मग बसलें
नयनापुढुनी परी मनोहर मूर्ति न तव हालें. १२

एकाएकीं आशा उपजे मोद मना झाला
वेणुवनीं तूं असशिल किंवा लपुनी गोपाला ! १३

तुझ्या मूर्तिचें दर्शन घेउनि डोळे निववाया
आलें धांवत उत्कंठेनें गेलें परि वांया. १४

नको मला हा जीव तयाचा आला तिटकारा
तुझ्या दर्शनाविना दिवस जो जाई अशुभ खरा. १५

कृष्णनिराशातमीं विश्व हें वाटे जणुं विरलें
एकाकीं परि दिव्य तेज हें कुठुनि बरें आलें ? १६

मुरलीचा हा श्रवणमनोहर येइ ध्वनि कानीं
नसती आशा किंवा हृदया फसवी या विपिनीं ? १७

नव्हे, तोच हा काळा कपटी कृष्ण इथें बसला
छेडित मुरली, भुलवाया मम पंचप्राणांला ! १९

बळवंत ह. फणशीकर.

# ' भृंगा ! हृदय न मम कळलें ! '

( चाल-'सबसे रामभजन०' )

मोहविण्या मज झटसी! भृङ्गा हृदय न मम कळलें ॥ ध्रु. ॥
याच सरोवरिं अन्य सरोजिनि किति फुलल्या आहेत
टाकुनियां त्या कशास धरिसी मज गरिबाचा हेत ! १
देव कदाचित् प्रसन्न होइल प्रदक्षिणा घालोनी
परी अशानें अर्पितहृदया जाते रे कोपोनी ! २
हरिणासम कुणि मानजालिं तव फसेल गुंगून
हृदिंच्या प्रेमा-गाना-विसरुन ऐकिल तुज कधिं कोण ? ३
नील चकाकित जलबिंबित तव रूप पाहुनी का
मोहुनि टाकिन कोणिहि रमणी गर्व उपजला मूर्खा ? ४
सौंदर्याची मीमांसा तुज मुळींच नच कळली
ममत्वाविणें कधीं दिसेना सौंदर्य-कळी फुलली ! ५
अथवा लुटुनी विविध फुलांतिल मकरंद स्वच्छंद
विषयलंपटापरि बघसी मज बनुनि धुंदिनें अंध ! ६
काय म्हणसि तूं-मेघ तयांना दिसूंहि नच देईल
देवो ना रे-कैसा सोडिल दुष्ट वर्तना कुटिल ? ७
भगिनि चक्रवाकी ही माझी रात्रभरी रडते
परंतु हृदयांतिल का तीच्या प्रेमझरी ओसरते ? ८
काय म्हणसि-कीं क्षयी जनाचें प्रेम न हितकारी ?
सुरनर कोणी पूर्ण विश्विं नच, वच हें अवधारीं ! ९

राहुकवलकृत कलंकिततनू रुचला तुज कैसा ?
कुराजपीडित रोषकिणांकित धीर गणिति जन खासा ! १०
काय सांगसी ते माझ्यावरि प्रेमच ना करिती
रोहिणि रजनी रमणी त्याच्यासाठीं निशिदिनिं झुरती ! ११
लहान मोठ्या किती तरंगिणि मिळती म्हणुनी का
टाकी सागर ? विसरे अद्भुत गंगाप्रेमा परि का ? १२
असाच माझा नाथ असे रे उदार जगतांत
सहस्रगोपीमन जो रमवी लोक वर्णितात ! १३
सांगतोसि मज त्यांना इतरीं खास असे भुलवीलें
वेड्या प्रेमपरीक्षा करण्या असेल खुळ पांघरलें !
भृङ्गा हृदय तुज कळलें. १४
हृदयमंदिरीं प्रेमाचा का कुणि मांडी बाजार
प्रेमराज्यही कृत्रिमनयनीं कोण करी बेजार ? १५
अथवा आनंदाचें त्यांना राज्य जरी तेथें
मिळेल तरिही मजसम नाहीं आनंदी बघ कोठें ! १६
त्यांना व्हावें सौख्य म्हणोनी जन्म असे माझा
कोठेंही तो सुखी असों दे मत्प्राणांचा राजा ! १७
जिवाजिवाची नजर एकदां झाली खास खरी
कोठुनि भृङ्गा हृदयतरंगिणि अतां फिरे माघारी ! १८
पुरी खुळी मी रसिका लागूं नको माझिया नादीं
जाइल वेळ फुका हे साधो ! अन्य मार्ग जा साधीं ! १९

**वा. गा. मायदेव.**

# तुझे शब्द.

अफाट जगतीं कानीं पडती दुर्वचनें चहुंकडे
लेश नच प्रेमाचा सांपडे ।
गर्वमदानें धुंद होउनी कोणी झिडकारिती
कुशब्दें तिरस्कार दाविती ।
द्वेषाचें कुणि जहरी जाळें मजभंवतीं टाकिती
मत्सरें मजलागीं पाहती ।
कार्यसाधु हे भोंदू बांधव सारे मज सांडिती
मजला दूर दूर लोटिती ।
दुःखानें ही दुनिया भरली वाटे मज संप्रती
जीवही जड होई मज अती ।
परि श्रवणीं पडतां शब्द तुझे प्रेमळ
वाहतें तयांतुनि मधुरामृत सोज्ज्वळ
तें पार विसरवी जग;—ऐसें त्यां बळ
झिडकारिल मज जग सारें जरि नाहीं त्याची क्षिती
जोंवरी शब्द तुझे वर्षती !

कृष्णाजी रामचंद्र परांजपे.

# बंडवाला.

("THE OUTLAW—" BY *Sir Walter Scott*

" शोभिवंत भीवरातीर गंभीर नीर वाहतें
अफाटचि हिरवें वन भोंवतें !
" फुलें भरुनि ओंचले गुंफुनी स्वकरें त्यांचे सर
पुजावा वाटे गौरीहर."
आलापित बाला हे होती मंजुल गीतस्वर
गडाच्या बसोनि टोंकावर.
" प्रफुल्ल तें भीवरातीर गंभीर नीर वाहतें
अफाटचि हिरवें वन भोंवतें !
" राज्ञीपद, सुखभोग सोहळे नको. डोहळे मनीं—
सख्याच्या संगें वसणें वनीं."

नगर गोपुरें सोडुनि सारें म्हणसी येइन वनीं
अगोदर विचार कर साजणी !
दऱ्या आणि दरकुटींत आम्ही क्रमितों दिनयामिनी
यांतलें मर्म समज कामिनी.
वनविहरण मग मनोहारिणी ! करणें—वदलों तरी
गातसे तेंच गीत सुंदरी.
" प्रफुल्ल तें भीवरातीर गंभीर नीर वाहतें
अफाटचि हिरवें वन भोंवतें.
" राज्ञीपद सुखभोग सोहळे नको. डोहळे मनीं—
सख्याच्या संगें वसणें वनीं.

"वारु पंचकल्याणी अबलख, करीं शिंग, ह्या खुणा
दाविती उघड करुनि आपणा.
"नृपमृगयावनरक्षक आपण स्वामिभक्त 'बनकरी'
दिसोनी ये हें वरच्यावरी!"

बाले! बनकर शिंग मजेनें वाजे अरुणागमीं
आमुचें घोर निशेच्या तमीं.
तरिहि सखी गातसे—"तीर गंभीर नीर वाहतें
अफाटचि हिरवें वन भोंवतें!
"राज्ञापद सुखभोग सोहळे नको. डोहळे मनीं—
सख्याच्या संगें वसणें वनीं.
"फुलें भरुनि ओंचले गुंफुनी स्वकरें त्यांचे सर
पुजावा वाटे गौरीहर.
"अंगिं ऐट. चमकती हत्यारें. रक्त करी रंवरंव
भेरिचे झडतां भैरव रव—
"नित्य असें पाहतें; वाटतें शिलेदार फांकडे
असावे खास हुजुरचे* गडे."

रणभेरी कर्ण्याचा आतां नाद न कर्णीं पडे
किर्रती रात्रींचे वनकिडे—
संकेतध्वनि तो परिसुनि सरसावुनि भाले करीं
सज्ज मन्मित्र होति झडकरी.
खरें, रम्य भीवरातीर तें! खळ खळ जल वाहतें!
खरें तें, प्रमोदवन भोंवतें!

* नृपाचे.

होउनि मम स्वामिनी आपुलें जीवित मज अर्पिणें
कर्म हें अति साहस साजणे !
मत्त यवनकिंकरत्व-चिन्हीं रति तव, मज संप्रती
शहाचा‡ गुन्हेगार बोलती.
नांव गांव ठाव न मुळिं आम्हां, घडीचा न भरवंसा
कळेना अंतहि होइल कसा.
यास्तव अमुचा सुभगसुंदरी ! संग न श्रेयस्कर
अम्हांहुनि पिशाच बरवा वर !
विकटविपिनवाटिकेनिकट विस्तृत विटपांच्या तळीं
मंडळी मिळते टोळींतली—
होतों मागें कोण तदा ते आतां आहों कसे
फिकीर न याची आम्हां असे !

" प्रफुल्ल भिवरातीर–तरिहि–गंभीर नीर वाहतें
अफाटचि हिरवें वन भोंवतें !
" राज्ञीपद सुखभोग सोहळे नको. डोहळे मनीं–
सख्याच्या संगें वसणें वनीं."

"BEE."

‡ बादशहाचा.

[ वीररस. ]

# कृष्णा घोडी.*

( चाल— पोवाडयाची. )

महाराष्ट्राच्या मैदानावर नाच पुन्हां, कृष्णे !
तुझ्या माथिचा चंद्र झळकुंदे झोकदार रत्नें ! १
कडेकपारीं सह्याद्रीच्या वाजूंदे टाप
उतर झिंगल्या महाराष्ट्राच्या दास्याचा कैफ ! २
शिवनेरीच्या शिवरायानें दिल्या दिलासाला—
अमीन टांचा छत्रपतीच्या दे महाराष्ट्राला ! ३
फुरफुरुनी तूं उडीव धुरळा दुर परवशतेचा
ठेंच खुरांनीं बारबार तूं साप फितूरीचा ! ४
पायगुणी तूं रायगडींच्या दौलतिची खाणी,
तुझ्यामुळें गे अम्हां गवसला तो स्वराज्य-सुमणि ! ५
तुझ्या बळावर महाराष्ट्राचा कोट उभा झाला
दौलतजादी! म्हणुनि एकदां वाजिव टापांला ! ६
शिवनेरीच्या करवंदींतुन सुटून वेछूट—
सिंहगडाच्या सिंहा[1] उठवुनि रायगडा भेट ! ७
धनी मिळाला धन्य तुला तो घेउनि ये तेथून
मावळचीं तीं रत्नें काढा महाराष्ट्र मंथून ! ८
घेउनि चंद्रा जगास सुखवी जशी कृष्ण रात्र,
आणुनि कृष्णे ! शिवा भूषवी तसें महाराष्ट्र ! ९
तुझ्या गळ्यांतिल खळाळुंदे ती पुतळ्यांची माळ
त्या नादानें वीरश्रीचे पुतळे हलतील ! १०

---

* हें श्रीशिवाजीच्या आवडत्या घोडीचें नांव. अरेरे ! हें देखील सांगावें लागलें!

१ तानाजी मालसुरे.

हलतां पुतळे परवशतेचें धावें हदरेल
वाजिव टापा !—स्वातंत्र्याचे कान उघडतील ! ११
सह्याद्रीच्या माथ्यावर तव टापांचे नाल
गडस्वरूपें उमटुनि गेले, बुझले ना समुळ ! १२
टाक एकदां टाप तयांवर ठळक ठसठशीत
कडयाकडयांतिल पाउलवाटा फिरून उजळीत ! १३
चतुष्पादिं तव चतुर्वर्ग[1] जणुं होता वसलेला
चतुर्वर्ण[2] तो म्हणून तेव्हां एकदिलें लढला ! १४
ते पुण्यवंत तव पाय । शत्रुनाशाय । दास्यहरणाय ।
लावि तूं महाराष्ट्राला
फिर त्यांवर सह्याद्रीला
जागीव तदात्मा[3] निजला;—
पडतिल त्यांतुनि बाहिर भाले दडले अणिदार:—
हां हां म्हणतां स्वदेशभूची फिरेल तख्दीर ! १५

( २ )

फिरव तुझी ती स्वातंत्र्याची नजर पाणिदार
दास्य-सुदुर्बल देशिं ओत तें पाणि[4] जोमदार ! १६
हजार कोसांवरी कुठें तरि परंता[5] गौरांगी
पूर्वसागरीं टाकुनि जाळें दास्याचें जंगी,— १७
जित्या जिवाचे सदैव पकडी मासे भुललेले—
निज टापांनीं देच झुगारुनि मोहक तें जाळें ! १८
तेजस्वी तव नेत्र तयांतिल तेजोमय झोत
ओत एकदां दास्यलुब्ध-जड[6] स्वदेशनिष्ठेंत ! १९

---

१ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. २ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र. ३ सह्याद्रीचा आत्मा. ४ उत्साह, धमक. ५ परतंत्रता. ६ गुलामगिरीला मोहून जाऊन जड झालेल्या.

गतासु ! निष्ठा–एकी रडते घेउनि शव तीचें,
अन्यायांचे मुकती भालू, दुहि हर्षें नाचे ! २०
दौडत येईं राष्ट्रविरचिनी ?-तव कानोशानें
दडतिल भालू-दुहीहि, राहिल एकीचें रडणें ! २१
नकोच गिळुं तो गळता तुझिया तोंडींचा फेंस,–
मृत निष्ठेला दे, कीं त्यांतचि संजिविनी-वास ! २२
घाबरें न, कीं कठीण येथें कापुस बोंडाचा !
तुडीव तो बिन्धोक ! लाभ तुज होइल सरकीचा !! २३
घाबरें न, कीं पडले असती निखार पर-तेचे
जळतिल तेणें खूर आपुले खालीं सत्तेचे ! २४
भाजतील निज खूर म्हणानी घेइं न माघार:–
रक्तवदन परपुष्ट मत्कुणां[1] हरि नखिचा[2] *धूर ! २५
म्हणशिल मनिं कीं आजि अशी कां केलिस तूं विनती,
केली तशि कीं “स्वदेशभक्ता दुःखांची न क्षिती !” २६
उमगाया असिस समर्थ । यांतला अर्थ । देशकार्यार्थ ।–
तूं दौडत येईं खालीं
विपरीत अशा या कालीं,
जमवीत कांबळी काळी–
शिवनेरीहुनि, खालीं जाईं रायगडावरती,
भगवाझेंडा धरील तेथें लगाम तव हातीं ! २७
दौलतजादी ! महाराष्ट्राचे सुयश-धर्म-खाणी !
अरविंदाची ऐक विनंती उभारल्या कानीं !! २८

“अरविंद”

---

१ ढेकणांना. २ नाहींसें करतो. * घरांत ढेंकूण वगैरे झाल्यास घोडयाच्या नखीचा धूर केल्यानें ते मरतात अशी रूढ कल्पना आहे. ती येथें आधारभूत धरली आहे.

# "धन्य जननि जनकोजीची!"

(चाल–'उद्धवा शांतवन कर जा.•')

आभाळ कोसळुनि पडलें । ज्या दिवशीं भाऊवरती
हाणा ! हाणा ! म्हणतांना । कंठाच्या नाडया फुगती
तोंडाला कोरड पडुनी । शब्द ना उमटती पुढतीं

हातानें खुणवी–मारा
मानेनें खुणवी–मारा
शिंग्यांना भरला वारा !

सारिली भिंत फौजेची । धन्य जननि जनकोजीची ! १

बंदुका कडाबिनि यांच्या फैरीवर फैरी झडती
तोफा जेजाला यांची सरबत्ती होतच होती
मारुनी मुसंडी त्यांत मोर्चावर केली गर्दी !

पाणी ओतुन तोफांत
ठोकिले खिळे कानांत*
ठाके रणमैदानांत

द्याया धडकी जोराची । धन्य जननि जनकोजीची ! २

चरणारे भीमथडीचे ते तुरग पंचकल्याणी
कांहीं प्यालेले होते त्या मुळामुठांचें पाणी
इकडे तर भव्य रिसाला काबुल खोकंद दुराणी

* तोफांच्या कानांत.



५

ते पठाण खैबरघाटी
करिती बहु थाटाथाटी
दावुनि चपळाई मोठी
भिजवी टोकें भाल्याचीं । धन्य जननि जनकोजीची ! ३

वीरांच्या पायाखालीं घोड्यांच्या टापांखालीं
धरणीगत घायाळांची उठली भेदक किंकाळी
त्या निर्वाणीच्या कालीं कोणी न कुणाचा वाली !

दिसतील तयां कापावें
येतील तयां झोडावें
यावीण दुजें ना ठावें
तृप्ति करी चामुंडेची । धन्य जननि जनकोजीची ! ४

वय पुसाल कितिसें होतें विश्वास तरी तो मोठा
जयवंत 'जयाप्पा' त्याचा 'बापसे सवाई बेटा' !
पेटोनी क्रोधाग्नीनें वैऱ्यांचा शिजवी धाटा !

कुमक ना कुणाची पाहीं
कोणी येइल कीं नाहीं
हिमतीनें चालुन जाई
गाळण उडवी गिलच्यांची । धन्य जननि जनकोजीची ! ५

अश्वत्थामा द्रोणाचा कीं अभिमन्यू पार्थाचा
कर्णवीर सूर्याचा वा कार्तिकेय रुद्रेशाचा
मारुती मारुताचा कीं इंद्रजीत लंकेशाचा

तैसा शूरांचा शूर
वैऱ्यांचें दडपित ऊर
हांकून लावि तो दूर
सेवा करि निज राष्ट्राची । धन्य जननि जनकोजीची ! ६

चढुनी अरबांना जोर गेले खवळून पठाण
धारेखालीं कितिकांना घडलें कंठांचें स्नान
कापितात कणसें तैशीं कापिलीं शिरें बेभान
देहाच्या लाह्या फुटल्या
पगडीच्या कंगण्या सुटल्या
घोडयांच्या दुमच्या तुटल्या
हिंमत चढली फौजेची । धन्य जननि जनकोजीची !

" माझ्या अन्नाचे जे जे असतील जिवाचे प्यारे
या माझ्या जखमा बघुनी ज्यांना येतील शहारे
असतिल जरि सेवायाचीं उघडीं स्वर्गाचीं द्वारें
ते लढोत येथें धन्य
जावोत पळोनी अन्य "
—वच वदुनि असें सन्मान्य
गर्जना करी हल्ल्याची । धन्य जननि जनकोजीची ! ७

नेकजात कडवे वीर भरधांव चालुनि गेले
दाटी झाली चहुंकडुनी खाशाला खासे भिडले
भगव्या झेंडयाच्या खालीं योद्धे ढालाइत पडले

बेसुमार कत्तल झाली
भूमी रुधिरानें न्हाली
शिंद्यांची मूर्ति निघाली
काठी घेउन झेंडयाची । धन्य जननि जनकोजीची ! ९

दाढीके रखनेवाले काबुल कंदाहरवाले
खांडेसे लढनेवाले जंगसे न हटनेवाले
सूं सूं सणणण् बाणोंकी बरसात बरसनेवाले
ऐशांचा पडला वेढा
झुंजार वीर तो गाढा
संतोषवि अमित गिधाडां
भागवी तृषा कालीची । धन्य जननि जनकोजीची ! १०

किल्ल्याच्या दरवाज्याला मारावी थडक गजानें
पारधी चिरुन टाकावे जो मत्त वराह तयानें
वृक्षांच्या संमर्दांना टक्कर द्यावी गेंडयानें
सरकुनी जरासा मागें
तोंडानें बोलुनि ‘घे ! घे !’
उधळोनी जाई वेगें
कोंडी फोडी वेढयाची । धन्य जननि जनकोजीची ! ११

बंधारा दगड विटांचा फोडावा जल-ओघानें
विदळावा तट दुर्भेद्य कीं तोफेच्या गोळ्यानें
भेदावी शैलश्रेणी देवेंद्र–तीक्ष्ण-वज्रानें
तैसा आवेश भरुनी
सेनेचे तट पाडोनी
चापल्यें गेला निघुनी
मति गुंग होय शत्रूची । धन्य जननि जनकोजीची ! १२

दोन्हीही हातीं पट्टे चढवोनी 'भाऊ' घुसला
आदित्य प्रलयकालाचा देदीप्यमान तो गमला
कापित उडवित खांडोळी गेला तो पुरता गेला
दरकेना छाती ज्याची
फिरवी न दिशा पायाची
चमके ठिणगी तेजाची
ऐशा त्या नररत्नाची । धन्य जननि जनकोजीची ! १३

धूळीचे लोट उठोनी दिवसाची रजनी झाली
घनघोर गर्जना चाले तोफांची चमके बिजली
सर सर रुधिराच्या धारा वर्षोनी भूमी भिजली
मुंग्यांचें वारुळ फुटलें
तें थांबायाचें कुठलें
उठले ते धांवत सुटले
तनु निश्चल धैर्यगिरीची । धन्य जननि जनकोजीची ! १४

पाठीवर अरब पठाण पेंढारी पुढतीं पळती
दाढीशेंडीची गांठ तोडुन तुटणारी नव्हती
पुण्याइच ज्या साध्वींची तत्पति कहरांतुन सुटती
" पाणी ! पाणी !" मागून
कोरड कंठाला पडुन
कितिकांचे सुटले प्राण
बाजू न सोडि शर्तीची । धन्य जननि जनकोजीची ! १५

राष्ट्राचा शामीयाना चौफेर तणावे तुटले
चीराचा एकच खांब वायूसह झगडुनि डोले
हां ! पडेल, किंवा पडला बसती मोठाले झोले !

एका खड्गाग्रावरती
दख्खनची अब्रू होती
तें खड्ग जयाच्या हातीं
त्या शिंदे-कुलदीपाची । धन्य जननि जनकोजीची ! १६.

बद्रिनाथ नारायण जो लाविले तयानें डोळे
काशीविश्वेश्वर शंभू तोही न जागचा हाले
वनदेवि अष्ट दिक्पाल नाही कोणीही द्रवले
सांगा नशिबाला काय
करितां येईल उपाय
वदतां न मुखानें हाय !
पूर्ति करी कर्तव्याची । धन्य जननि जनकोजीची ! १७

वीत वीत जागेवरती जखमा झाल्या देहाला
जीवाचा होता कोण तैं पट्ट्या बांधायाला
होवोनी शक्तीपात झांपड पडली डोळ्यांना
खानानें धरितां हात
मारी झटका जोरांत
नरडीला देउनि हात
शय्या केली धरणीची । धन्य जननि जनकोजीची ! १८

मृत्यूच्या दरबाराचा शेवटचा साक्षीदार
मातृभूमिसाठीं सोडी नैराश्याचा हुंकार
डोळ्यांतुनि खळखळ वाहे ती उष्णाश्रूंची धार

दिनमणि पाठीला झुकला
संमुख परक्यांना झाला
शेवटचा धीरा पडला
सोडी न मूठ खड्गाची । धन्य जननि जनकोजीची ! १९

तो ग्वाल्हेरीचा वाघ ग्लानीनें मूर्च्छित झाला
रोहिले शिकारी आले गोटांत उचलुनी नेला
नीचांनीं गृहकलहानें तो पंचीप्यारा चिरिला
हर ! हर ! केले हो तुकडे !
हृदयाचे होती तुकडे
पण वदते ऐका तिकडे
रणदेवी पानपताची । धन्य जननि जनकोजीची ! २०

फत्तर हिमशैलेंद्राचे । कारुण्यानें पाझरले
दुःखानें धवलगिरीचें । मुख धूसर होउन गेलें
गौरीशंकरनयनाचे । हिमबाष्पराशि वरघळले
पावन पुरुषांची आई
जान्हवी प्रपातें गाई
जीं स्मृतिचित्रें उत्साही
त्यांतुनी नाद ये ह्याची । "धन्य जननि जनकोजीची!" २१

दु. आ. तिवारी

# 'मर्द हो ! पळतां काय ?'*

( चाल—'मज गमे ऐसा जनक तो०' )

या फिरा कोठें चाललां ? मर्द ! बोला ॥ ध्रु० ॥

जातिवंत हे वीर मराठे
लढवय्ये बहु शूरचि मोठे
जायाचे ते हार न कोठें
हाय ! परी तुम्हि कसे पळालां ? १

भाषण तुमचें त्या वेळेचें
मर्दपणाचें वीरश्रीचें
होतें कां हो वरवर साचें ?
दुटप्पि ऐसे कसे वागलां ? २

" कोंडाणा गड येउं जिंकुनी–"
पैजेचा हा विडा उचलुनी
निघालांत ना तेव्हां घरुनी ?
हाय परि न तो अजुनि जिंकला ! ३

" म्होरक्या कि हो अमुचा गेला !–"
लाज न कां हें सांगायाला
लवही तुमच्या गमे मनाला !
निलाजरे कां इतुके बनलां ? ४

---

* सैरावैरा पळत सुटलेलें आपलें सैन्य पाहून सूर्याजीनें हें वीरश्रीचें भाषण केलें आहे.

तुमच्या विश्वासावरि ज्यानें
गड झुंजविला मर्दपणानें,
पडतां तो रिपु-आघातानें
  अविश्वासु कां त्यासि वागलां ? ५

तान्हाजी तो कोठें गेला?—
पुसतां तुमचा बाप तुम्हांला
द्याल काय तें उत्तर त्याला ?
  याचा कां हो विचार केला ? ६

अपजय घेउनि तुम्ही आलां
कळतां ऐसें शिवरायाला,
जिवंत कां ठेवील तुम्हांला—
  शंका हि न का शिवे मनाला ? ७

" माझे बाबा कां ना आले ?
गड दुसरा कां घ्याया गेले ?—"
रायानें त्या तुम्हां पुसलें
  काय द्याल हो उत्तर त्याला ? ८

रांडुबाइच्या गोष्टी करुनी
भागुबाइसम आलां पळुनी !
'पुरुष न हे बायकाच म्हणुनी—
  हंसतिल पोरें तुमचि तुम्हांला ! ९

ऐका ऐका मागें या हो !
नांव आपुलें गमवुं नका हो !

पळुनी ऐसे जाउं नका हो !
    कलंक कां लावितां कुळाला ? १०

सिंहाचे तुम्हि छावे असतां
कोल्ह्यांना कां ऐसे भीतां ?
टाकुनि द्या ही व्यर्थ भीरुता !
    चढवुं चला या रिपुवरि हल्ला ! ११

कोठें कोठें उदयभानु तो ?
माझ्याशीं कां गमजा करितो ?
ये ये आतां पाहुनि घेतों—
    देतों धाडुनि यमसदनाला ! १२

जातिवंत क्षत्रीय मराठे
लढवय्ये बहु शूरचि मोठे
हार न जायाचे ते कोठें
    ठाउक नव्हतें का हें तुजला ? १३

बोला बोला हर हर बोला !
श्रीशिवरायाचा जय बोला !
झाला झाला हा सर किल्ला—
    भगवा झेंडा पहा फडकला ! १४

**गोपाळ गोविंद अधिकारी ( ' कमलाकर ' ).**

# माता व पुत्रवियोग.*

वर्षें सात! प्रभुवर! असे काय हा काळ थोडा?
दीनार्तेचा मज दुबळिचा पाहणें अंत सोडा!
माझा एक–प्रिय मज किती!–पुत्र तो एकटाच–
वार्ता नाहीं कुठुनि कसली! अश्रु मी ढाळितेंच! १

देवा नाहीं, तुज तरि दया, पुत्रका! येउं देईं!
प्रार्थी तूतें जुळुनि कर हे आज तूझीच आई;
जेथें कोठें असशिल तिथें काम टाकी करींचें,
ये धावोनी त्वरित, पुरवी पारणें लोचनांचें! २

नाहीं आला! कर धुउनियां पाठिसी लागलेली
रुष्टा कोणी कुगति मम कीं वैरिणी आड आली?
सांगा कोणी तरि, मम कुठें लाल आहे जिवाचा?
वार्ता त्याची श्रवण करण्या आकुल प्राण साचा! ३

तूं आहेसी जगिं न च कळे कीं जगा सोडिलेंसी,
कीं व्याघ्राच्या मुखिं, जलिं, रणीं मृत्युतें पावलासी;
शत्रूनें कीं धरुनि सबलें ठेविलें बंदिवासीं?
आपत्तीचेविण न असल्या भेटतां राहतासी. ४

सांगा वार्ता मधुर कटु वा, सोक्षमोक्षा तयार;
पुत्राचें मी निधनहि असें ऐकण्या आज धीर;

---

* ही कविता आंग्ल कवि वर्ड्स्वर्थ याच्या "The affliction of Margaret" या अप्रतिम कवितेच्या आधारें रचिली आहे.

संदेहाचे विलयिं मम हें दुःख जाईल अंता;
दूषायाही मग न च सुता मोह होईल चित्ता. ५

प्रेमानंदें कितिक कुतुकें वाढवीलें त्याला!
शेजाऱ्यांच्या मनिं न गणिलें दूषणा हांसण्याला;
शीतस्वच्छोदक तरुमयी वाळवंटांत राई—
वैधव्याच्या तपनिं मज तो त्यापरी सौख्यदायी! ६

होते डोळे भरुनि बघण्यासारखें रूप त्याचें;
होते त्याचे गुणहि न उणे योग्य वाखाणण्याचे;
होता उच्छृंखल जरि जरा, हूड, धीट-स्वभावी,
न्यून व्यंगें नव्हतिं लवही लाज ज्यांची धरावी. ७

न्यून व्यंग्यें! जननिजवळीं नांव घेणेंच खोटें;
सव्यंग्याचेवरिच अधिक प्रेम मातेसि दाटे;
थोडासाही जरि शिशु रडे, ओरडे,—होइ तेणें
माताचित्तीं खळबळ किती! तो शिशूही न नेणे. ८

मातृप्रेमा क्षय न कधिंही, तें जुमानी न काळा,
कामक्रोधस्वहितबलिंही तें न ये म्लानतेला;
ताजी तूझी स्मृति अझुनिही अंतरात्म्यास दाही
गेहीं दारीं; पथहि भिजती अश्रुंच्या सिंचनांहीं. ९

नाहीं याची तुजसि पुरती कल्पना काय, बाळा?
नाहीं माझ्या स्मृतिस हृदयीं स्थान तेणें, दयाळा!
काळ व्यापी विभवपदिंचें कार्य कीं सर्व थोर?
वेधी सारें मन रमणिचा काय संसारभार? १०

छे ! छे ! ऐशी कधिंहि न शिवो कल्पना मन्मनातें !
प्रेमाचा तो मम सुत खरा, तो नुपेक्षील मातें !
होवो त्याचेवरि मज वृथा आळ घेण्या न मोह !
वाढे तेणें, मज कळनि ये, मन्मनींचाच दाह ! ११

ये, ये ! आतां नच अडचणी कोणत्याही जुमानूं;
अन्यां कार्यां त्यज; न हृदयीं संशया व्यर्थ आणूं.
मानें हीन, व्यसन-हत, वा ग्रस्त दैन्यीं अपार,
—ये जैसा तूं असशिल तसा; स्वागता मी तयार ! १२

श्रेयाश्रेयें गणिति जगिं जीं, मूल्य आतां तयांचें
आलें मातें कळुनि पुरतें लोकवादादिकांचें;
धूर्त, स्वार्थी, सबल, कपटी,—राज्य यांचें जगांत !
सोडूं ये हें जगच, सखया ! जाउं, राहूं वनांत ! १३

पक्षी स्वेच्छें गगनिं फिरती, स्वर्गिं उड्डाण घेती,
पाताळातें जलकण धरा भेदुनी पार जाती;
शक्ती तैशी मजसि असती, विश्व हें आक्रमूनी
तूझ्या शोधाविण विरमतें घ्यावयाही न पाणी ! १४

माझेऐसा असशिल सख्या ! तूं हताश स्थितींत !
इच्छेवीणें नसशि दुसरें कीं कराया समर्थ ?
संसाराची मजसि घटना हीच वाटे विशेषा,
भंगाव्या कीं पदिं, पदिं, मनःप्रेमबंधीच आशा ! १५

मी वेडी कीं, उगिच रडतें, पुत्र नाहीं जिवंत !
मेला,—त्याचें मज तरि पडे कां न दृष्टीस भूत ?

खोटें सारें वदति जन जें,–भेटिला भूत येतें:
किंवा मातें भिउनि, विटुनी भूत ही दूर जातें ? १६

आक्रंदूनी कितिक शिणवूं, कष्टवूं या जिवाला !
मृत्यूही तो मजसि नच दे आसरा दुर्बलेला !
जाऊं कोठें ? लपुनि बसुं कीं ? तोंडही दाखवाया
लज्जा वाटे, चरण गळती, वाहवे ही न काया ! १७

आशादीप क्षण उजळतो, संशयें मंद होई,
नैराश्याचें फिरुनि फिरुनी गाढ अंधत्व येई;
ओढी दोरी धरुनि दुबळी गाय जैसा कसायी,
खेळायाची विधिकरिंचि मी बाहुली दीन होई ! १८

संदेहाच्या शतिं फसविली, घेरिली संशयांनीं,
माझेऐशी भुवनिं न कुणी पीडिली यातनांनीं !
जीवन्मृत्यूहुनि कठिण या दुर्धरा मत्स्थितीचा
आणी अंत, प्रभु ! तुज रुचे त्यापरी, एकदांचा ! १९

कोणी वेडी म्हणति, हंसती, होति कष्टीहि कोणी,
जो दुःखाचा विषय मज तो चित्तिं कोणी न आणी !
ये ! ये ! मातें तुजविण नको एक वस्तू जगींची !
तूझेवीणें असुविरहिता नीरसा सृष्टि साची ! २०

दा. ग. पाध्ये.

# जीवा ! बोल.

बोल जीवा ! सोडून मुका भाव,
बोलल्याविण जगतीं न मिळे ठाव;
अंतरींची गुणगुण व्यक्त होई,
श्रांत हृदया तेधवां शांति येई. १

तुझें मानस माधुर्यपूर्ण आहे
यांत लेशहि संदेह खास नोहे;
परी त्याला व्यक्तत्व पातल्यानें
मधुर घेइल त्यांतून जन्म गाणें ! २

वनीं वेलीच्या मृदुल दलामागें—
लपुनि बसलेला सहज कुतुकयोगें—
जयीं प्रकटे मधुमास कुसुमरूपीं,
तयीं हेलावति मधुरहासवापी ! ३

कोकिलाच्या कंठांत राहिलेला,
अजब जादूनें पुरा भारलेला,
सूर येतां बाहेर गोडसा तो—
समीराच्या मृदु लहरि डोलवीतो ! ४

बोल जीवा ! मुग्धत्व सोडुनीयां,
नको दवडूं काल हा असा वायां !
जगीं जन्मोनी काय करायाचें ?—
दोन घटिका संगीत गावयाचें ! ५

निराशेचा भोंवतीं फिरे फेरा,
विविध दुःखांचा सुटे विषम वारा,

म्हणुनि थकल्या जीवास काय द्यावें?–
त्यास उघड्या हृदयिंचे बोल व्हावे. ६.

विश्व लपलें आधींच गूढतेंत
त्यास शोधाया चित्त सदा श्रांत;
हृदय चोरुनि जरि ठेविसी कपाटीं–
हातिं माझ्या येईल गारगोटी. ७.

प्रपंचाच्या चरकांत पिळुनि गेल्या–
सर्व मनिंच्या मनिं शक्ति शिथिल झाल्या;
तरी जीवा तुज बहुत आळवावें
कसें पूर्वीपरि अतां सुलभ व्हावें? ८.

नको माझा तूं पाहुं अतां अंत–
अंत कसला पाहसी खुळ्या तेथ?
निराशेनें उद्विग्न हृदय माझें,
सदा खंतीनें स्वतांलाहि लाजे. ९.

बोल जीवाच्या जिवा! बोल कांहीं
नको ठेवूं चित्तांत भीड तूं ही;
भिडेमध्यें गुरफटुनि विश्व गेलें,
म्हणुनि कृत्रिम रूप हें तया आलें. १०.

भालिं लिहिला संसार कृत्रिमाचा
ब्रह्मदेवें तो कसा सुटायाचा!
परी क्षणभरिं उघडुनी हृदय, गोड—
बोल बोलूनी पुरवुं गडे! कोड! ११.

पसारा हा क्षणमात्र जीविताचा
नसे प्राणांचा वायु भरंवशाचा;
घडी आहे तों उघडिं अंतरंग!–
खुल्या बोला बोलून आणि रंग! १२.

खुळ्या माझ्या असमर्थ या मनानें
कितिक रचिले प्रासाद कल्पनेनें;
निराशेच्या डोहांत ते बुडाले,
अतां रडगाणें नशीबास आलें. १३
हिरा घेतां हातांत कोळसा ये—
असा सृष्टीचा खेळ चाललाहे;
मानवाचें सामर्थ्य किती थोडें !
मनीं चिंतित तें जिथें तिथें मोडे. १४
हळुच येउनि यमदूत शिखा हातीं
धरुनि खेचुनि नेतसे निज प्रांतीं.
कालवदनीं आम्हांहि असे जाणें—
म्हणुनि सांगें अजि गाच कांहिं गाणें ! १५
निराशेचीं वादळें नित्य येती,
त्यांत दुखाःच्या धुळी मिश्र होती.
झरे फुटती डोळ्यांस आर्ततेचे;
आम्हि दुबळ्यांनीं सदा रडायाचें ! १६
सोड पडदा परि त्यांवरी क्षणैक,
बोल हृदयाचे बोल तूं सुरेख !
जरी राहिल जड तनू मातिमाजी
तरि टिकतिल हीं बोल-फुलें ताजीं ! १७
विमल-सी ते हृदयस्थ शब्दमाला
ठेव जिव्हाग्रीं, लावुं नको काला !
खिन्न आयूंतिल तेवढाच काल
मनीं, झाला मानीन मी, अमोल. १८

—नागेश.

# भवितव्यता.

[ चालः—चंद्रकांत राजाची कन्या० ]

प्रभात झाली, सूर्य उधळितो गुलाल गगनांत;
वृक्षलताही फुलें उधळिती प्रेमें डौलांत.
झुळुझुळु वाहुनि ओहळ सरिता गाति गोड गीत;
गान मधुर बहु पक्षी गाती मस्त लकेरींत.
पुच्छ उभारूनि थवा गुरांचा निघे वनीं जाया,
घुमवुनि पांवा गोड सुरांचा राखि गुराखि तया.
अशा अवसरीं एक कुमारी कटिं घट घेवोनी
मंद पाउलें टाकित आली गात मनीं गाणीं.
वय चवदाची, सरळ मनाची, खाणहि रूपाची,
नाजुक, मोहक बांधा शेंगच जणुं ती चवळीची.
श्वेतवर्ण ती, श्वेतवसनही ल्यालेली रमणी
अवतरली ही पुन्हां जणुं महाश्वेता या भुवनीं!
सरळ नासिका चांफेकळिपरि मोहक तरतरित
डोळे तीचे हृदयविदारक मारक गरगरित.
कुंतल काळेभोर मोकळे स्कंधावरि रुळती,
तरुणांचें मन बद्ध कराया जाळें पसरविती.
कठिण उच्च कुच वक्षीं बसले चकोरपक्षि अहा!
चंचुपुटें तीं सिद्ध कराया हृदया विद्ध पहा!

तनुलतिकेला बहार आला दोन फुलें फुललीं,
उरस्थलीं तीं मुसमुसुनीयां दिसती गरगरलीं.
पोर कुणाची ? ही गरिबाची, रूपीं श्रीमंत,
ठुमकत मुरडत गजगति चालत धुंद यौवनांत.
निर्झरतीरीं जों न पातली काय असें झालें !
घट कटिंचा तो पडला खालीं, मुखही बावरलें.
पदर गळाला उडूं लागला वाऱ्यावर स्वैर,
केंस मोकळे उडूं लागले वदनीं भुरभूर.
काय ऐकतें ? काय पाहतें ? वृत्ती बावरली;
स्वतास विसरुनि दृष्टि हिची ही कुणीकडे खिळली ? २८

तरुण बांड सरदार कोण हा घोड्यावर स्वार ?—
घोडा फेंकित अबलक आला कटितटिं समशेर !
झोंकनोक त्या सरदाराचा बाणा सरदारी,
शिरीं खुलतसे ऐटिंत त्याच्या मंदिल जरतारी.
भव्य भाल तें, भव्य वक्षही, रुबाब भव्य तसा,
हया दावया पाणी आला त्या ठाया सहसा.
दृष्टि मिळाल्या, वृत्ति जुळाल्या, मनें एकवटलीं,
परस्परांचें भान हरपलें, हृदयें हारवलीं.
प्रीतीचें साम्राज्य माजलें, एकजीव झाला,
'मी तूं' 'तूं मी' मुळीं न उरलें, भिन्न भाव गेला. ३८

ढग आकाशीं आले काळे, सुटला तो वात,
पोर परतली घरा, स्वारही गेला धाड्यांत.

तरुणि उसासे टाकी, चिंतन ध्यान करी त्याचें;
तोहि तसा निःश्वास टाकितां मनन करी तीचें.

लौकिक रीती, समाजरीती, उच्चनीच-भाव,
विषम स्थिति ही देइ न परि ती प्रेमाला वाव. ४४.

सरदारानें थोर कुलांतिल अन्य कुमरि वरिली;
मातापितरें तिलाहि दुसऱ्या गरिब वरा दिधली.

राजमहालीं जरी वसतसे मोठा सरदार,
प्रतिक्षणीं परि तिची मूर्ति त्या दिसे सभोंवार.

क्षुद्र झोंपडी तिच्या नशीबीं आली जरि दैवें,
सरदाराचें तरी करितसे ध्यान नित्य भावें.

विधिनिश्चित भवितव्यताहि तिज कोण बदलणार ?
" हें नच होतां तें जर होतें-" मनि जग वदणार. ५२

नरहर शंकर रहाळकर.

# सुहृत्सांत्वन.

"आत्या गेली अहह ! अमुची, त्वत्सखी हाय ! गेली !
हानी झाली बहुत तव ती आमुची तेंवि झाली !
आत्या ! मोठें मन तव तशी पाहुनी प्रीति तूझी
आप्त स्नेही भंवतिं जमले मानुनी माय, आजी ! १

प्रीती अन्यासदृश नव्हती आप्त-पर्याप्त थोडी,
वात्सल्याची तव बहु मिळे मातृहीनांस गोडी;
नाहीं तूझ्यापरि जगिं अजी पाहिली थोर चित्तीं;
स्वार्थी विश्वीं गुण तव न ते संप्रती दृश्य होती. २

तूतें नारी नर निखिलही गाति कीं कौतुकानें;
भावें तूतें स्मरति असकृत् ऐकती स्तोत्र कानें;
स्त्रीरत्नाचा परम सुभग स्वामि होतास जाणीं,
चिंतोनी हें किमपि कमती आपुलें दुःख मानीं !" ३

मित्रा ! सांत्वन केविं मी तव करूं ? घेतों यदा लेखणी,
वाटे भीति सदा तुझें हृदय कीं क्षोभा न पावो झणीं;
साहेना मज अल्पही विरह तो स्निग्धा जनांचा जर
निर्मर्याद सखी-वियोग तव हा प्राणघ्न तूतें तर. ४

नोहे सांत्वन औपचारिक बरें तें रुक्ष कीं शाब्दिक,
स्नेहोद्गार परंतु होति अनलीं तैलापरी क्षोभक;
स्निग्ध क्षुब्ध घडेल चित्त तव रे कांतेचिया वर्णनें—
जैसा आमुख तैलपूर्ण भडके तो दीप कीं वायुनें. ५

त्वत्कांता तव मंत्रि, मित्र, गृहिणी, शिष्या, भुजिष्या निकी;
गेली एक परी अनेकपरिची झाली तुझी हानि कीं !
पंचप्राणचि काय हे तव अजी पंचत्व कीं पावती !
ज्योतिःशून्य दिव्यापरी तुजसि ये जीवन्मृताची स्थिती. ६

मित्रा ! स्निग्धजनार्थ अश्रु गमती शुद्धा निवापांजली,
हें श्रद्धान्वित श्राद्ध होय बरवें, ही सत्क्रिया कीं भली;
अश्रू गाळित शोचित प्रियजना जी शांति वाटे मनीं,
ती न्यूना अजि थोडकीच गमते प्रत्यक्ष भेटीहुनी. ७

शोकीं श्लोकिंहि एकरूप बनतां भार्या-सुयोग-भ्रमीं
गाळीं अश्रु, तिलांजली अमुप दे, हो दुःख कांहीं कमी;
तंद्री लावुनि एकतान म्हणती तीं शोकगीतें निकीं
जीं तंत्रान्वित मंत्रयुक्त विगुणें तीं मासिकें रे फिकीं! ८

राज्ञी जी बहु शोभली तव गड्या ! अल्प स्वराज्यांतली
कोणाला परि राजदंड न करी; सर्वां कृपा-सावली.
प्रेमें पाहि सदा धरूनि समता थोरां लहानांसही;
झाली पूज्य तशी प्रियाहि सकलां बाहेर तैशी गृहीं. ९

सर्वां आधिं उठूनि सुग्रणपणें संसारकार्यें करी,
काढी वेळ सुतादि-शिक्षणिं सदा, आल्या जना सत्करी;
शुश्रूषी वडिलां, बहुश्रुतपणा भर्त्यासवें पावली;
कामें नित्य असंख्य कीं करि, परी केव्हांहि न त्रासली. १०

पत्नी प्रेमळ होय जी तुज, मुलां माता तशी कोमळा,
पोटीं घे शिशुदोष गाय जशि ती वत्साचिया कीं मळा.

आत्या, त्यापरि मावशी, सुभगिनी, आजी कुणाची जरी,
प्रीती शुद्ध परंतु संतत करी तुल्या समस्तांवरी. ११

येती संकटिं धावुनी, विमुख त्या गेल्या न शेजारिणी;
जें ज्या इष्ट, सुखेंहि तें मिळवुनी त्या सर्व झाल्या ऋणी.
जी मानी निज लेंकरांसम सदा प्रेमें परांच्या मुलां.
विद्या अल्प तरी बहुश्रुत; खरी आदर्श नारीकुला; १२

कोणाला हितमंत्र देउनि, कुणा सप्रेम संबोधुनी,
सासू, सून, नणंद, भावजय कीं संतुष्ट ठेवी मनीं;
कोणाचा कलि लागतांच मिटवी, दे न्याय सर्वांप्रती;
सारी वेळ दुपारची पर-हितीं वेंची, न निद्रेंत ती. १३

विद्येचा बहु गर्व ज्यांस असतो, श्रीमंतिचाही तसा,
संसारीं परि मूढ फार असती भृत्यावलंबी स्वसा;
ऐशांलाहि हळूहळू वळवि कीं जी सुस्वभावें भली.
जी कीं आत्मवशा तिला वश नसे ऐशी नसे भूतलीं. १४

मुक्तद्वार जिचें अनाथ अबला दुःखी स्त्रियांला सदा,
दुःशीलांसह दुर्मदांसह सदा जी वागली निर्मदा;
मानी जी बहु भक्तिनें अखिलही देवापरी पाहुणे,
सेवेमाजि झटे कदा न पडुं दे कांहीं कुणाचें उणें. १५

वाग्–गंगा शुचि काय मोर-मकरीं* ओष्ठीं जिच्या क्रीडती,
नांदे नित्य उदारता करिं जिच्या, प्रेमाहि नेत्रीं अती;

---

* जशा काय पवित्र सरस्वती व गंगा अनुक्रमें मोरावर व मकरावर खेळतात, तसे पवित्र शब्द तिच्या ओठांवर सदोदित खेळतात.

चित्तीं ईश्वरभक्ति, निष्कपटता, शांति क्षमा निस्तुला,
एशी सद्गुणमूर्ति ही तुज मिळे भाग्यें सुपत्नी तुला. १६

ती सीतेसम तूंहि रामसम कीं अन्योन्य-सेवारत;
ती आदर्शपतिव्रता जशि तसा तूं एकपत्नीव्रत;
सीता स्वर्णमयी वियोगसमयीं दे सौख्य रामाप्रती,
कांतेची तशि ही तुझ्या प्रतिकृती तूतें सुवर्णाऽकृती! १७

मागें दुःखित राहणें न रुचतें आर्यस्त्रियांला कुठें,
गेली कोमलचित्त कीं तव सखी स्वर्गास तूझ्यापुढें;
गेली होशि विवेकि धीर म्हणुनी, स्वार्थामुळें ना परी;
यासाठीं अजि चिंतनींच सुख घे प्रत्यक्ष भेटीपरी. १८

ईशा चिंतुनि चिंतुनी स्वदयिता पुत्रादिकां प्रत्यहीं
त्यांचा भास घडोनि भेटहि घडो, इच्छा करीं सत्य ही!
भासालागिं समस्त विश्व भुललें, भासींच गोडी खरी;
काव्यीं तेविं जगींहि भास भरला, घे सत्य ही वैखरी. १९

कंटाळोनि भवास ती प्रभुपदीं माहेरिं गेली सती,
भेटायास सुतादिकांस अजि कीं आजोळिं जीं नादती;
कर्तव्यें इथलीं पुरीं कर तदा नेईल तूतें प्रभू,
बा! लाभेल तुला सदा सुत-सुता-पत्नीसवें स्वर्ग-भू! २०

के. वि. फणसे.

# अढळ प्रेम !

प्रेमल होतें एक जोडपें विद्यानगरीमाजी
रसिक जनांनो ! दुःखकहाणी ऐका त्याची आजी. १

दुर्दिन आला, घाला पडला, कोसळलें आकाश !
विधिघटनेचा समय पातला प्रेमा तोडायास ! २

निष्ठुर कृति जो असंख्य करितो, प्रेम विसरला काळ;
प्रेमल पतिची प्रेमल पत्नी न्याया टाकी जाल. ३

त्या समयाला साथ पातली त्या नगराचे ठाईं;
श्रीमंतांनीं शहर सोडिलें, गरिबां थारा नाहीं. ४

परि हा जोडा प्रेमल तैसा परोपकारीं दक्ष,
म्हणुनि तयाचें आत्मरक्षणीं नव्हतें तितुकें लक्ष. ५

रात्रंदिन पतिपत्नी झटती परोपकारासाठीं;
सत्कृत्यामधिं दंग सदा ते, पडति न गांठी भेटी. ६

रोगिशुश्रुषा करि ती युवती, श्रम झाले तिज फार;
शीण ये तयें, शय्या धरिली, दुःखें हो बेजार. ७

असह्य झालें दुखणें तिजला, युवक जाहला खिन्न;
दुःखविचारें त्रस्त होय तो, विचार भ्रमती भिन्न. ८

ज्यांच्यासाठीं जीव कष्टले तेहि विसरले यांना !
कोठें जा हो जगांत आहे स्वार्थवृत्तिचा बाणा. ९

पत्नीचें शिर अंकिं घेतलें, तद्वदना कुरवाळी;
अश्रुजलांनीं स्नान घातलें बालेतें त्या काळीं. १०

युवहृद्मेघा दुःखकंटकें छिद्रें केलीं फार,
त्या मेघांतुनि अक्षतटिनिमधिं पडतें जल अनिवार. ११

अर्धींच तोयें तटिनि फुल्ल त्या वरी अश्रुवर्षाव,
सिंधु सगरजा धांवति कीं या बघण्या सागर-ठाव. १२

कीं मोत्यांची माला तुटली, मोत्यें घे भू उदरीं,
दो नयनांच्या दोन बाजुंनीं टपटप गरदी भारी. १३

शोक–उमाळे युवक आवरुनि युवती नयनाश्रूंतें
वरिवरि पुसुनी, केश विखुरले सारी अपुल्या हातें. १४

रडत बालिका बोले: " नाथा ! अंतरतें या पाया !
निरोप द्या मज आनंदानें, जाते अपुली जाया ! १५

नका नाथ ! मी पदर पसरतें ! शोक आवरा आतां !
दासि जयाची सेव्या हो त्या क्षमस्व पदिं या माथा ! " १६

" नको लाडके ! दुःख कासया ? शोक नको अनिवार !
सेवा करणें उपकृति तुजवरि नाहिं, असे अधिकार ! १७

निष्ठुर काळा ! नेशि कासया वपु ठेवुनि मत्प्राणा ?
पाश जरा तूं शिथिल करुनि मग ने आम्हां दोघांना ! " १८

" हें काय बरं ! आवरायचं नाहीं का दुःखास ?
शपथ गळ्याची, पुरवा नाथा ! शेवटली मम आस ! १९

माझ्यामागें नाहीं कोणी ममतेचें; जीवाचे
हाल न व्हावे म्हणुनि विनवितें दुसरें लगिन कराचें ! २०

एकलकोंडा जीव राहणें घातुक आहे फार !
मच्छोकानें दुःख होउनी, होइल तनु बेजार ! २१

म्हणुनि विनविते दासी अपुली, पुरवा तीचा हेत–
सुगुणी भार्या बघुनि करुनि घ्या येत्या वैशाखांत ! " २२

नयनसागरीं वडवाग्नीनें दुःखें केली मात,
प्रमोदकही युवकनयनिंचें अटलें हातोहात. २३

आसव थिजले, शब्द न उमटे, भ्रम चित्तीं युवकाच्या;
युवति शेवटीं वदली जें तें नव्हतें ध्यानीं त्याच्या. २४

झालें, गेलें, सर्व अटपलें, प्रेमबंध ते तुटले,
कालानें परि सुयश मिळविलें, युवकयत्न ते हटले ! २५

प्रेमाचा तो धागा तुटला, कलिजा त्याचा गेला !
हाय ! कृतांता हेतु आपुला पूर्ण शेवटीं केला ! २६

प्राण निमाले बालेचे त्या, शव अंकीं घेऊन
भ्रमिष्ट चित्तें बघत तिजकडे बसला दुःखी तरुण ! २७

केव्हां आले जन, तें नेलें केव्हां शव श्मशानीं,
पत्नि निजविली,–चिता पेटली–केव्हां त्यांत तयांनीं. २८

कार्य उरकुनी वाहक गेले केव्हां त्या नच ठावें;
स्थिति न उमगली आम्हां त्याची भलतें काय वदावें? २९

तप्ताग्नीच्या ज्वाला जाती गगना भेदायाला,
युवकहृदयिंच्या ज्वाला इकडे जाळिति तद्हृदयाला. ३०

इतुक्यामाजी चितेवरुनि त्या पडला हात गळून,
सव्य बाहु तो होता, त्यातें घेत युवा उचलून. ३१

तप्त अग्निनें झाला होता, अश्रु थंड त्या करिती;
भ्रमित तरुण मग वरि वरि अठवी बाहूची कृति चित्तीं ३२

'तांबुल घ्यावा !' वदत लाडकी कितिदां हांसत आली,
प्रेमानें कर करुनि पुढति हा मम वदनामधिं घाली ! ३३

दूर पाहुनी, हात पालवुनि, 'या या ! नाथा !' वदली;
हाच हात ना मम वक्षस्थलिं ठेवुनि निद्रा केली ? ३४

चुंबन घ्याया प्रेमभरानें कवळी हृदयीं तिजला,
त्या वेळीं स्मित आणी वदनीं विनयवती ती बाला ! ३५

वदन फिरवुनी लाजत मुरकत-'नाहिं गडे ! मी नाहीं !'
ऐसें वदुनी याच करानें नकार दिधला पाहीं ! ३६

एके काळीं काव्य कराया बसलों असतां सदनीं,
'कमल ! कमल ! मज तृषा लागली झडकरि पाणी आणीं.' ३७

ऐसें वदुनी पुनरपि गेलों कवितेठायीं रमुन;
इतुक्यामांजी लगबग आली कांता जल घेऊन. ३८

परि मी पाहुनि गुंग कवनिं मग वदली हांसत बाला:
'सवतीसंगें प्रणय चालला सोडुनियां कायेला ! ३९

मत्प्रेमाच्या आड कशाला सवत बाइ ही आली !
पुरे पुरे हें बघणें आतां नेत्रसफलता झाली !' ४०

लावि तर्जनी अंगुष्ठाशीं भृकुटि अकुंचित केली,
'शर्थ इकुडची झाली बाई !' ऐसें हांसत वदली. ४१

'धर्मपत्नि ही सोडुनि रमतां नाथा कां कुलटेशीं ?
पश्चात्तापा कारण होइल कथितें मी चरणाशीं. ४२

हिनेंच नाथा! वेड लाविलें आजवरी कितिकांला,
जगतामधुनी उठवुनि मग त्या, घालि तयावर घाला ! ४३

कविते-सवती ! धन्य जाहलिस प्रेमातें तोडून !'
ऐसें माझी कांता वदली लटका कोप अणून. ४४
'सोडायाची नाहीं का तिज ? नुरला मग मज थारा !'
चुटकि वाजवुनि वदली हांसत-' जातें तर माहेरा !' ४५
मीही मिथ्या रुष्ट जाहलों; पाहुनि ऐसें बाला
दुःखि होइ, मी सकोप झालों गमलें तच्चित्ताला. ४६
" सहज विनोदें वदलें बाई ! शंका का मनिं यावी ?
अपराधाची क्षमा करावी लीन पदीं मी होई ! " ४७
बघुनि कोवळें मानस सखिचें मोद होत मनिं फार,
तेविं घेतला अंत हृदयिंचा म्हणुनि दुःख अनिवार. ४८
दुःखमोदसंमिश्रण आणी अश्रुबिंदु नयनांत,
परि तिज गमलें प्रणय न रुचला नाथाच्या चित्तांत. ४९
यायोगें तिज दुःख जाहलें, वसनाच्या पदरानें
अश्रु नयनिंचे निकट बसुनि पुशि, खिन्न होत दुःखानें. ५०
अश्रुबिंदु तिज असह्य झाला, तुजकडुनी त्या पुशिलें;
पूर चालती मन्नेत्रांतुनि अझुनि न कां तिज दिसले ? ५१
त्या पूरांना थांबविण्याला, वा मज नेण्यासाठीं
तिनें धाडिलें कीं तुज, मित्रा ! होतिल कां रे भेटी ? ५२
सांग सांग मत्प्राण कुठें बा सौख्यें नांदत आहे ?
कुठुनि लाडकी प्रेमानें मज या या ऐसें बाहे ? ५३
भल्या गडया तूं घेउनि जा रे सत्वरि मजला तेथें,
भेटविं मजशीं मत्प्राणाला, अन्य आस नच मातें. ५४

जेवीं यक्षें मेघासंगें पाठविला संदेश
प्रियकांतेला, तेविं बालिका धाडि सव्य बाहूस ! ५५
चाल झडकरी, ने मज तेथें, जीव अधिर हा झाला,
लडिवाळें मम प्राण बोलवी चेतरहित देहाला: ५६
आलों आलों थांब लवभरी दृष्टिआड नच होईं !
तव विरहें हा अधिर जाहला दास तुझा ने पायीं ! ५७
अग्निजलामधिं शुद्ध न्हाउनी पूत सखे ! झालीस,
परि मज टाकुनि घोर काननीं दूर कुठें जातेस ? ५८
वरि वरि कवळि, चुंबन घेई प्रेमें वदतों त्याला:
" बा हस्ता तूं सांग कासया तिजशीं टाकुनी आला ? ५९
चाल घेउनी मजला तेथें तव धनिणीचे निकट,
जग झालें मज शून्य तियेविण, गमतें जीवित बिकट. " ६०
वदुनि असें मग चोहिंकडे तो बघत भ्रांत चित्तानें,
चितेनिकट झणिं धांव घेतली त्या दुःखी तरुणानें. ६१
आलों सखये ! वदत कळविला बाहू तो प्रेमानें,
भीषण हांसत उडी टाकिली तप्त चितेवरि त्यानें. ६२

परोपकारी अग्नि धडाडे, जळूं लागली काया,
दूत ठेविला मागें गमतें युवतीनें पति न्याया ! ६३
दिव्य शिखांनीं प्रकाश दावुनि वस्तुमात्र तेजांत
तेविं आणिलें युवकहृदयिंचें प्रेम अढळ जगतांत. ६४

पांडुरंग गोपाळ लोहोकरे.

# जाळ्यांत अडकलेल्या हरिणीचे उद्गार.

मृदुल कोमल हें तृण पाहुनी
अहह! जाइ कसें मन मोहुनी!
अडकलें, मुकलें निजबालका!
मजवरी रुसला करुणेश कां? १

त्यजुनि वाट दुजी इकडे कशी
चुकुनि मी वळलें पडलें फशीं?
बघुन दुर्बळ, पाशहि टाकिले,
कपट शूर जनां न असें भलें. २

विकसल्या कुसुमासम पाडसें
हृदयिंच्या न सुखास मिती असे;
अजुनि मास तया नच जाहला,
मम वियोगचि तो अजि त्याजला. ३

जननिपासुन बालक तोडणें
विहित काय असे? मज सांगणें!
मम तनूवर तें रमलें किती,
महिवरी जणुं निर्झर खेळती! ४

बघुनि त्या सुख मानसिं जाहलें;
जननिला सुख केवळ तें कळे.
स्तनिं पहा फुटलें मधु दुग्ध हें!
मम शिशूप्रति देइल कोण हें? ५

कुणिकडे बघुं मी मम पाडसें ?
अजि कसें जग निष्ठुर होतसे !
हृदयभेदक मी रव काढुनी
कळवळें, नच आणिति त्या कुणी. ६

कवण दुग्ध तया अजि पाजिल ?
कवण जीवन त्याप्रति देइल ?
कवण देइल त्या जननीसुख ?
करिल कां कुणि हो कधि कौतुक ? ७

त्यजुन निष्ठुर मी अजि जातसें,
तव करीं, करुणाकर ! देतसें;
तुज पिता जननी वदती जन,
प्रभुवरा, करिं लालनपालन ! ८

मम असू अजि घेतिल पारधी
क्षण सुखास्तव, निर्दय हे कुधी;
जरि मिळे रसनासुख त्यांप्रीत
उचित कां मनुजा असली कृती ? ९

मनुज जो करि ही असली कृती,
अधम राक्षस तो खल दुर्मती;
म्हणति-हे “ करितों अबलावन;
परि निरागस मारिति हे जन! १०

नच पुरे विधिनिर्मित भक्ष्य का ?
हरिति जीवित हें म्हणुनीच का ?
जगतिं भूतदया नच शब्द का ?
मनुजि उन्नतिही असलीच का ? ११

वसति खाद्य असे जरि वेगळें
हरिति जीवित हे अमुचें बळें;
मधुर आमिष हे जरि दाविती,
फसविते नयना मधुराकृति. १२

घळघळां नयनांतुन ये जळ,
त्वरित तों घुसला उदरीं शर;
कठिण तीव्र जरी शरवेदना
परि मनीं शिशुदर्शनकामना. १३

हृदयभेदक काढुनियां रवा
विनवि तीः " मजला शिशु भेटवा !
मज घडो शिशुदर्शन शेवटीं !
चहुंकडे म्हणुनी नयनांप्रती– १४

गरगरां फिरवी, खर तों शिरे
शर दुजा नयनीं, तंव सत्वरें
नयन बाहिर ये, धरणीवरी
उपडि ती पडली मृगि सत्वरी. १५

नयनिं शर शिरे तों लोट बाहेर येई
हर ! हर ! रुधिराचा, प्रेम तें शुद्ध वाही !
त्वरित हरिणि गेली सोडुनी या जगाला,
वदतच वदनीं कीं–'भेटवा मच्छिशूला !' १६

केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर.

# प्रणयमुग्ध तारा.

[ विषयसूत्र--प्रस्तुत वेंचा श्रीमन्माधवकाव्यांतील आहे. प्रौढ प्रतापनिधि श्रीमंत थोरले माधवराव पेशवे व रघुनाथराव दादा या उभयतां चुलत्या-पुतण्यांत हिंगणें मुक्कामीं झालेल्या लढाईंत राघोबादादांस जय मिळाल्या-वरून त्यांच्या धाकानें माधवरावांच्या पक्षाची गोपाळराव पटवर्धनादि मंडळी श्रीमंतांच्याच सल्ल्यानें निजामाचे आश्रयास गेली. पेशव्यांकडच्या या सरदारांना आपल्याकडे ठेवावें कीं न ठेवावें याबद्दल निजामाचे दरबारांत भवति न भवति चालली असतां हंबीररावानें—निजामाचे सेनापतीनें—त्या कामीं आपलें प्रतिकूल मत दिलें. निजामांनीं 'तुझी साठी बुद्धि नाटी झाली' असें बोलून भर दरबारांत हंबीररावांची मानखंडना केली. त्यांनीं पश्चात्तापानें हिरकणी खाऊन आत्महत्या केली. मात्र मरतांना चंद्ररावाला—आपल्या मुलाला—आपल्या मानहानीचें प्रायश्चित्त निजामास द्यावयास सांगितलें. पितृपरायण चंद्ररावानें तें कबूल केलें; इतकेंच नाहीं तर त्यानें आणखी अशी प्रतिज्ञा केली कीं, ' माझे हातून हें कार्य न झाल्यास मी आजन्म लग्न करणार नाहीं.' वडिलांचें उत्तर-कार्य सारून तो तारानामक आपल्या भावी पत्नीस व मामेवहिणीस भेटा-वयास गेला व तिला झालेली सर्व हकीगत सांगून, यापुढें तूं मजकडे बंधु या नात्यानें पहा, असें विनविलें, व आपण तडक पेशव्यांकडे आला. त्याच्या विरहानें व्याकुल झालेल्या तारेनें त्याच दिवशीं गृहत्याग करून ती त्याच्या शोधार्थ निघाली. यापुढील तारेची झालेली स्थिति प्रस्तुत सर्गांत वर्णिली आहे. ]

[ साकी. ]

वसंत येतो हिरवा शालू नेसुनियां वनमाला,
कोकिलकंठें गात विहरते रिझवी प्रिय दयिताला! १
माधव जातो वनमाला मग धूलि मस्तकीं भरते,
हृदयीं जळते देहीं वळते दावीं जाळुनि घेते ! २

वर्षा येतो नीरदमाला उठते गगनीं फिरते,
आनंदानें नाचत सुटते वृत्ती तन्मय होते ! ३

नववर्षरसें मुसमुसणारी तरङ्गिणी ही तटिनी,
ठुमकत मुरडत चाले जैशी मनःस्वैरिणी तरुणी ! ४

वर्षा सरतो विगलितकाया विरहार्ता वनमाला,
दूर कुठें तरि दिक्कोणांतरिं लपवी निजवदनाला ! ५

दयितसुखाची आशा सरतां सरिता चित्तीं झुरते,
रविकिरणांच्या चितेवरी ती प्राण द्यावया चढते! ६

चंद्र उगवतो दिशा उजळती नभिं हांसे उडुमाला,
सृष्टिसुंदरी वसनकौमुदी दावी ज्याला त्याला! ७

सागर कोठें कुठें चंद्रिका परि तो आलिंगाया
वीचिकरांनीं वरी उसळतो धांवे तिज चुंबाया ! ८

चंद्र मावळे दिशातारका होती तिमिरविलीन,
जलधि ओसरे उदास होई सृष्टि टाकिते मान ! ९

हळु हळु येई सूर्य मागुनी वदन तिचें वरि उचली,
तीहि बघे जों मुखा मुख जुळे चढे कपोलीं लाली ! १०

न बघावें तें इतर दिशांनीं म्हणुनी रवि तो स्वकरा
लांबवुनी दिङ्नयन झांकितो, कृति परि होते अपरा! ११

कर लागति जों तया रवीचे एकचि गोंवळ होतो,
सर्व हांसती रवि त्रिरमोनी वर वर धांवत जातो! १२

गुंगत फिरती दंग भृंग ते चुंबित कुसुमें नाना,
सुंदर पक्षी कर्णमधुरशा करिती मंजुल ताना ! १३

पुष्पें हंसती लता हांसती हंसती पक्षी सारे,
मारुत हांसे भरे जगाला हास्यरसाचें वारें ! १४
सूर्य मावळे तिमिर उफाळे विहग मूकता वरिती,
दिशा घालती वदन खालती येते दुःखा भरती ! १५
या सर्वांचें कारण एकचि भासे प्रेम ! प्रेम !
प्रेमाभावीं सर्व पसारे व्यर्थ जगीं हा नेम ! १६
बा प्रेमा तूं कुठें राहसी ? उकल एवढें गूढ,
हात जोडितें मी तरि झालें सखया ! पूर्ण विमूढ ! १७
स्वरूप कैसें तुझें असे तें सांग सांग रे मजला !
कोमल अससी कठोर दिससी केविं ओळखूं तुजला ? १८
नभांत दिससी वनांत हंससी रमसी धरणीवरती,
जिथें न दिससी असें स्थल नसे वृत्ति संभ्रमा वरिती ! १९
परी पुन्हां तुज शोधूं जातां नाहिंस तूं कोठेंही,
फुलांत नाहिंस, जलांत नाहिंस नाहिंस रमणीहृदयीं ! २०
मृदुल सुमांची शेज खुपे तुज कंटकशयनीं निजसी,
पक्वान्नीं रुचि तुला न लागे रमसी परि उपवासीं ! २१
शालदुशाला दुकूल वस्त्रें जरी भरजरी तुजला
मुळीं न पटती, आवडती परि सतरा गांठी ज्यांला ! २२
रत्नभूषणें रम्यें विविधें परि तुज त्यांची अरती,
कांचमणी जरि भरति मनीं तव, तुलाच शोभे रीती ! २३
नंदनवनिंच्या सुरद्रुमाचीं पुष्पें तुजला तुच्छ,
श्मशानसुमनें ओंगळ जरि तुज रुचतो त्यांचा गुच्छ ! २४
स्वरूप अथवा कुरूप यांचें तारतम्य तुज काई ?
यशोयशांची सुखदुःखांची परवा सखया नाहीं ! २५

अपूर्व ऐसा प्रणया! तव मज महिमा दिसतो राया!
क्षम नच कोणी अनंत गोलीं तुजला आकर्षाया! २६
या प्रेमास्तव तारा बाला सोडुनि अपुल्या सदना,
रानोरानीं वणवण फिरते काय कथूं ती दैना! २७
सकाळ नाहीं! दुपार नाहीं! नाहीं सायंकाळ!
पहांट नाहीं! रात्रहि नाहीं! हाय फिरे अळुमाळ! २८
नाहीं थंडी! नाहीं वारा! नाहीं पाउस ऊन!
सोबत संगत बघे न फिरते निर्जन कंटकविपिन! २९
कसलीही भयभीती नाहीं! उजेड ना काळोख,
चंद्र दिसे त्या एक सखीला दुजा न लव उन्मेख! ३०
तृषा न गणते क्षुधा न बघते नाहीं कांहिं पहात,
चंद्रामागें गरगर फिरणें एकचि तिज माहीत! ३१
निबिडांधारीं घनकांतारीं तारा प्रेमासाठीं,
चंद्रापाठीं फिरे, तिमिरही पाही प्रेमकसोटी! ३२
मधेंच थांबे, पुनरपि चाले, बसे बालिका खालीं,
वेडी झाली, वृत्ति बावरे, संशयडोहिं बुडाली! ३३
क्षणांत हांसे रडे क्षणींही क्षणांत होय उदास,
क्षणांत फिरवी गर गर डोळे क्षणांत दृष्टि निराश! ३४
हस्तावरती गाल टेंकुनी दृष्टि लावुनी गगनीं,
अश्रुसराचे मण्यामागुनी मणि ती ओढी रमणी! ३५
नव्हे योषिता मृणालिनी ती भासे मजला पूर्ण,
कर मुख बाष्प न परी मृणालीं पंकज तुहिनविशीर्ण! ३६
कर पद गळले, सांधे खचले, प्रेमरसाचा लोट
नेत्रीं घळघळ वाहूं लागे, झालें दुःख अलोट! ३७

वदनावाटे करुणरसाचीं स्रवूं लागलीं गाणीं,
प्रणयाची मधु मंत्रावलि ती कारुण्याची खाणी ! ३८

"चंद्रा माझ्या प्राणविसाव्या ! हृदयवल्लभा ! सदया !
कंठ दाटला, शब्द आटला, धांव धांव तूं सखया ! ३९
नाथा ! आतां तुझ्यामागुनी धांवधांवुनी दमलें,
नैराश्याच्या पंकीं रुतलें, प्राण लोचनीं आले ! ४०
मोकलुनी मी पूज्य पित्याला तुझ्याच साठीं हाय !
रान घेतलें अबलेनें या एकाकी असहाय ! ४१
कुलस्त्रियांच्या कुमारिकांच्या सविनयलज्जाधर्मा
प्रेमांधेनें पाठ फिरविली हाय हाय रे कर्मा ! ४२
तरी न होसी तृप्त अजूनी प्रणया ! कोठें मातें
नेसी अदया ? सांग सांग रे कशी न करुणा तूतें ? ४३
समोर दिससी अदृश्य होसी काय मांडिला खेळ ?
दमयंतीच्या हंसासम तूं उडसी रानोमाळ ! ४४
जातां तुज मी धरावयाला देसी उंच भरारी,
नभःसागरीं तरल पोहसी सोडुनि मजला दूरी ! ४५
मंजुल सिंजित गुंजनझंकृति तव जों श्रवणीं रिघते,
दग्ध लतेवरि या आशेच्या सुधावृष्टि ती घडते ! ४६
नव मोदानें नव दृष्टीनें पुनरपि जों मी तुजला,
बघतें तों तूं विकट हांसुनी लोटिसि दुःखीं मजला ! ४७
मृगजल धांवे मृगीपुढें कीं छायेपुढती ऊन,
तसा धांवसी माझ्यापुढतीं विडंबिसी हांसून ! ४८
नाहीं गणिली खिंड दरी कीं नाहीं डोंगर म्हटला,
सुळक्यावरिही चढून गेलें कडा न म्हटला तुटला ! ४९

क्षितिजापरि मज त्रिलोभुनी रे किती आणिसी दूर,
फसलें फसलें सर्व मनोरथ मनींच झाले चूर ! ५०
प्रेमा ! वणवा हृदयीं पेटे बघसी काय चिरून ?
किती पाहसी अंत राजसा ! ये मागें परतून ! ५१
किती आळवूं द्रवे सृष्टि ही द्रव न लेश परि तुजला !
असती प्रेमा नससी कीं तूं संशय चित्तिं उदेला ! ५२
अस्तित्वचि तुज नाहीं अथवा गमतें मजला आतां !
काव्यकल्पनेमधेंच केवळ दिससी तूं वावरता ! ५३
प्रणय लोपला ! गगनीं गेला ! कोणीं कोणाकरितां
रुदन करावें ? गाढ गूढ हें ! बरी मुग्धता आतां ! ५४
अहा पाखरा ! मम सुकुमारा ! सकरुण मंजुल बोल
हृदयपंजरामधुनि काढिसी इथें न त्यांना मोल ! ५५
सुंदर लतिके अशीच हलवीं संतत अपुली मान,
नको विश्वसूं वंचक भृंगीं गेल्या तव ही प्राण ! ५६
अदय लाघवी चाटुमिषानें तुजशीं करितो लीला,
जसा वरोनी तसा अंतरीं जणूं कोळसा काळा ! ५७
कपट्यांचा बाजार भरे हा नको राहणें येथें,
वणव्यामध्यें उडी घेउनी राहूं गगनीं तेथें. ५८
मृणालिनी तूं, जलांतुनी वर काढुं नको हें वदन,
सौजन्याचा इथें उन्हाळा अनुभव आला पूर्ण ! ५९
त्यांतचि राहीं जिरून जाईं नको घेउं हा वारा,
अननुभूत तूं म्हणुनि सांगते अनुभववृद्धा तारा ! ६०
तुझ्याच सन्मुख गिरी पहा हा काय म्हणावें याला !
सेवावी जी हृदयात्तरि ती ठेवि पदीं वनमाला ! ६१

कुसुमाश्रूंनीं न्हाणी त्याचे पुसे पल्लवीं चरण,
तरी न येई दया निर्दया कसलें अंतःकरण ! ६२
भो गिरिराजा ! विमल सतीचा प्रभाव तुजला गमतें
ठावा नाहीं ! सोड हट्ट हा तापद तो उभयांतें ! ६३
हाय ! हाय ! हा ! नैराश्याची परिणति झाली कोपीं,
किसलयपाणी चोळुनि साध्वी स्वतांसि गमते शापी ! ६४
विटपकरांचें मंथन करुनी भूमिरुहा ! वनमाला
अग्निनिवेशन करी पहा कीं तुजला सुखवायाला ! ६५
अयि वनमाले ! शिरीं धरोनी गिरि तुज जरि हा नाचे,
गर्व न मानीं पहा खालती अंतर गूढ नरांचें ! ६६
अथवा बाई तशीच नाचुनि मोड तयाची खोड,
वनमालेस्तव या अदयाचा घेई अंशतां सूड ! ६७
चंद्रा ! माझ्या जीवितनाथा ! अससी काय असाच ?
नव्हे नव्हे तो सुंदर नरवर फूल फूल कीं साच ! ६८
चुकलें चुकलें काय बोललें ! चंद्रहि पूर्ण कठोर !
ठेवुनि मजला फुलांत येथें वाही दुःख अघोर ! ६९
तोही कपटी, मीही कपटी, तूंही कपटी, सारें-
जगही कपटी, स्वैर वाहतें कपटाचें हें वारें ! ७०
शरीर सुंदर नाटकगृह हें, रंगभूमि ही हृदय,
चित्तविकारप्रदीप जळती सूत्रधार हा प्रणय ! ७१
नटनायक मम चंद्र मनोहर नटीनायिका तारा
नवरसपात्रें पूर्ण कुशल जीं नाट्याभिनया थारा ! ७२
प्रणयविलोभन सुरस मनोरम अभिनवनाटकरचना,
चतुर विदूषक संभ्रम रचितो अद्भुत नूतन घटना ! ७३

प्रेक्षक येथें ज्ञानेंद्रियगण नाट्य बघाया जमला,
जरी विचक्षण आतुरतेनें अंतर्मुख तो झाला ! ७४
शुद्धभाव ही सतार तिजवर पडदे सुखदु:खाचे,
त्रिविधवृत्तिच्या तारा पिळिल्या गोड वाद्य हें साचें ! ७५
नखी-कल्पना करीं घालुनी सतार छेडायाला
जों मी बसलें सर्व लागले गुंगुनि डोलायाला ! ७६
स्वरतंतूंची-मिळणी झाली नादब्रह्म उदेलें,
अवकाशीं तें घुमूं लागलें स्वर्गीभूतळीं भरलें ! ७७
चंद्रासंगें तारेचा जों संगम ऐसा घडला,
तोंच संभ्रमें विदूषकानें भंग सुखाचा केला ! ७८
सतार गळली, फुटली, तुटली, तारा तुटल्या, झालें !
दीप भडकले, पूर्वस्थलिं ते प्रेक्षक सारे गेले ! ७९
सूत्रधार तो नभीं उडाला, नायक कोठें दडला,
पात्रें गेलीं एक राहिलें सहाय द्याया मजला ! ८०
दुष्ट विदूषक रंगभूवरी परी फिरे हा अजुनी,
शोकरसाचा विशाल पेला सन्मुख माझ्या धरुनी ! ८१
हा हा चंद्रा ! हा हा प्रणया ! कैसें नाटक केलें !
कैसे माझे सर्व मनोरथ भग्न राजसा झाले !" ८२

वदे बहुपरी असें विरहविद्ध बाला मनीं,
रडे ढळढळां सवें हृदय ती करीं ताडुनी;
हंसे पुनरपी म्हणे 'गिवसला मला चंद्र हा !'
फिरे सतत बोलुनी प्रणयमुग्ध तारा पहा ! ८३

'अनंततनय.'

# शिवकालीन एक संस्मरणीय प्रसंग.

[ आर्या. ]

क्षत्रियकुलावतंस श्रीशिव घेउनि भवानिला अंकीं,
निद्रासौख्यीं होता रत एक दिनीं सुवर्णपर्यंकीं. १
एकाएकीं दचकुनि पाहे, तों एक युवक तरवार
घेउनि करांत येतो आहे शीर्षीं करावया वार. २
भयभीत लेश होय न, राहे स्थिर शांत कीं जसा जलधी;
मणिबंधीं दृढ धरुनी बोले तरुणासि–"कोण तूं खलधी ? ३
बा ! सांग किमर्थ तुवां वरिली ही आंततायिता मोठी–
जेणें झाली अधमा! तुजला मद्धननबुद्धि बहु खोटी ! ४
किंवा इतरें कोणीं केलें तुजला प्रवृत्त या कामीं,
तेणें मद्वध योजुनि आलासि कृपाणपाणि या धामीं ? ५
मच्छत्रु तूं न ! मीहि त्वच्छत्रु नसें; तरीहि सांग मला–
केंवि नृशंस, अमानुष तुजलागिं सुसेव्य मार्ग हा गमला ? ६
उगवो स्वराज्यसूर्य क्षितिजीं या आर्यभूमिच्या पूर्ण,
साच तदर्थ श्रमलों; गमलों तुज म्हणुनि वध्य का तूर्ण ? ७
अपराध थोर किति हा याची तुज कल्पना नसे काय ?
कां सिद्ध होसि मूढा! घालाया संकटांत निजकाय ? ८
या कामीं लोभविलें नामें त्यांचीं जरीहि कथिशील,
पात्र क्षमेसि होउनि मम करिं अपराधमुक्त होशील. ९
नाहीं तरी भवानी असि ही वधिल क्षणांत तुज परिस !
वद सकल सत्यवृत्ता ! 'धर्म नसे सत्यभाषणापरिस.' " १०

बोले युवा "नरपते! असिधारीं मृत्यु मी वरिन वहिला;
'फोडूं नये रहस्या, शूराचा धर्म हा असे पहिला.' ११

ना मी नृशंस, खलधि न, नृपसत्तम! ना च मी दुराचार;
केलें प्रवृत्त मज परि दारिद्र्यें येथ जाण साचार. १२

मज्जनक शूर, युद्धीं तुझिया, स्वर्गासि असमयीं जाय;
तद्विरहें मज्जननी मत्संगीं नित्य मोकली धाय. १३

त्यांतहि दारिद्र्यानें शीर्षीं चिर ठेविला कृपापाणी;
मध्याह्नसमय अमुच्या नेत्रांतुनि अश्रु नित्यशा आणी. १४

तें मातृदुःख देखुनि होय न मच्चित्त केंवि कळवळलें?
आपत्प्रशमार्थ तुझ्या शत्रुंकडे सहजचपल तें वळलें. १५

तोफेतोंडीं उडवीं! वा असिधारेकरीं चिरीं मान!
नामें इतर कशाला? मालोजी हाच दण्डय कीं मान!" १६

तें वीर्यधैर्यसूचक वच परिसुनियां नृपाल गहिंवरला;
आलिंगुनि त्यासि म्हणे "बाळा! गेलाच रोष तुजवरला. १७

द्रवलें त्वदीय मन निजमातेचें दुःख थोर पाहूनी,
निजभूमाता दुःखाकुल पाहुनि तें द्रवोच याहूनी. १८

मातेप्रीत्यर्थ जसें गमलें तुजलागिं असुंसि अर्पावें,
तेंवीच देशकार्यीं झिजवुनि तनु देव पितर तर्पावे. १९

त्या देशसेवनीं तुज वाटो बा! केधवां 'न धालों जी!'
सरदारमालिकेमधिं होवो सुख्यात नाम मालोजी!" २०

भा. शं. देवस्थळी.

# "नाहक तुरुंगांत जातांना पत्नीस—"

मज सोड, जाउं दे मजला, या भणंग बैराग्याला। जिवलगे!
मी असा अभागी म्हणुनी, आकाश कोसळे वरुनी। जिवलगे!
माझाच दोष परि तुजला बुडविण्यास कारण झाला। जिवलगे!
लाडके हौस मीं नाहीं पुरविली तुझी गे! कांहीं। जिवलगे!
हीं अजाण पोरें अजुनी, सांभाळ प्रेमले! जपुनी। जिवलगे!
संग्रहा ठेविली कांहीं फुटकीही कवडी नाहीं। जिवलगे!
तो देव जगाचा वाली, काळजी तयाला अपुली। जिवलगे!
पुनरपी सुटोनी, लीले! जा—लवकर येइन विमले। जिवलगे
जा कशी। उगिच कां अशी। उभी राहशी।
जाउं दे मजला। तो तुरुंग भोगायाला॥ जिवलगे!
त्या भयाण देखाव्याची, त्या गुडूप अंधाराची। जिवलगे!
वाटते काय तुज भीती, करुं नको कल्पना चित्तीं। जिवलगे!
मायभूमिसाठीं माना, अर्पिल्या सांग आम्ही ना। जिवलगे!
जग नाहीं साधें भोळें, हें अंधाराहुन काळें। जिवलगे!
चल आटप गंगायमुना, जा घेउन सदनीं यांना। जिवलगे!
जा बाळा! घेउनि हिजला, वदण्याला शक्ति न मजला। जिवलगे!
जातील दिवस हे काळे, सोन्याचे येतिल अपुले। जिवलगे!
जा कशी। उगिच कां अशी। उभी राहशी।
जाउं दे मजला। वाहिला देह कार्याला॥ जिवलगे!

'अज्ञातवासी.'

# विरहकटुता.

विहर हा कडू किति आहे । हें युवतीलाच पुसावें ॥ ध्रु० ॥
दुर्दैवें ज्या सुंदरिचा । प्रिय भर्ता तिज सोडुनियां
दूर देशिं जातो जेव्हां । ममतेला झिडकारुनियां
भडभडुनी त्याविण येतें । तिजला मग राहोनीयां
पांडुरता गालीं आली ।
अंगें कृश सकल जहालीं ।
अधराची कांति निमाली ।
पाहुनि हें जवळी जावें । विरह हा० १
स्मृति तिजला पतिची होतां । गृहकृत्यीं मन लागेना
गुरुजनाजवळि जरि असली । तेथें मग तिज बसवेना
कांहींहि न तिजला रुचतें । एकान्ता वरिते ललना
राहते उभी ती बाला ।
उजवा कर लावी गाला ।
मागुनी काढि पदराला ।
जाउनि हें अवलोकावें । विरह हा० २
मग ललाट तीचें होई । अति आच्छादित आंठ्यांनीं
भृकुटिही वक्र होवोनी । डोळ्यांतुनि वाहे पाणी
नासिकाग्र लालहि भडके । विरहानल बहु पेटोनी
मग हुंदक्यामागुनि हुंदका ।
हालवी कनकजा लतिका ।
पुष्पांच्या गुच्छीं मग कां ।
तेव्हांहि न कंपित व्हावें । विरह हा० ३

प्रियपतिची मूर्ति समोरी । दिसते मग तंव तिज तेथें
रात्रींची सकल तयारी । खोलित त्या परिचित होते
विस्तीर्ण तसा मंचकही । शय्याही त्यावर दिसते

लखलखाट तो दीपांचा ।
घमघमाट सुनव सुमांचा ।
वाराही शीतल साचा ।

येई हें दुरुनि बघावें । विरह हा० ४

शीघ्रच मग भिंतीवरती । चित्रें तीं सुंदर बघण्या
हस्ताचीं वाद्यें तेथें । मंजुळ रव राहे वीणा
प्रेमानें दंपत्यानें । ज्या केली केल्या नाना

त्या मूकपणें जो पाहे ।
साक्षी परि सदैव राहे ।
दोघांही प्रिय जो आहे ।

आरसा तया लक्षावें । विरह हा० ५

कडकडुनी भेटुनि पतिला । मृदु शब्दां काढायाला
जों लागे प्रेमभरानें । कंठहि तो दाटुनि आला
एकान्तीं शिरण्याकरितां । शब्दांसहि विचार पडला

प्रीतींत अपरिमित शक्ती ।
पाषाणां सहृदय करिती ।
तारेही स्वपथीं फिरती ।

आकाशीं तिच्या प्रभावें । विरह हा० ६

वेढा घालुनियां पतिच्या । कटिला मग वागी बोले:
" निष्ठुर होउनि ममतेला । अगदिंच कां पातळ केलें !

बाई जें वाटत नव्हतें । मजला..." तंव कर्णी आले

शब्दांवरि शब्द दुरोनी ।
तिज बोलविताहे कोणी ।
हें येई तिजला कळुनी ।

तेव्हां मग काय वदावें । विरह हा० ७

स्वप्नापरि सगळें होई । तेथें तिज कांहिं न दिसतें
मूर्ति ती पतीची गेली । तिजजवळुनि आतां कोठें
मंचक नाहींसा झाला । शय्याही तेथलि लपते

कोठुनियां कोठें आली ।
विस्मित ती लज्जित झाली ।
अश्रूंतें पदराखालीं ।

लपवी तों निघुनी यावें । विरह हा० ८

कृ. ल. पा.

[ प्रेम आणि आनंद. ]

## २ 'आईचें संगीत.'

[ राग—सारंग. ]

[ प्रेमळ माता आपल्या तान्हुल्यास एक अर्थहीन गाणें म्हणत असतां,त्यांत विलक्षण नादमाधुर्य आढळून आलें.तें ऐकून सुचलेले विचार खालीं दिले आहेत.]

प्रेमळता माते! सांठविली। तुझिया गायनतालीं॥
ऐकुनि तें गाणें। मोदानें। चित्त उचंबळलें हें॥
अर्थ जरी नाहीं। तरि पाहीं। नादमधुरता गे! ही॥–
देते चित्ताला। मोदाला। गमतें हेंच मनाला॥
गायन जगताचें। तव साचें। ना वर्णवतें वाचे॥
जगताला जरि तें। ना कळतें। ममहृत्फलकीं ठसतें॥
काव्य असें यांत। अज्ञात। दिव्यत्वाची जोत॥
लहरी प्रेमाच्या। हृदयाच्या। येति मुखांतुनि साच्या॥
शब्दांच्या रूपें। प्रगटून। टाकिति जगता भरुन॥
वातावरणांत। लडिवाळ। नांदतसे हें बाळ॥
ऐकविं संतत गे!। तव गाणें। तुझिया बाळा प्रेमें॥
श्रवणेच्छू रसिक। ह्यासम कीं। मिळणें दुसरा लोकीं॥–
कठिण असे आर्यें!। प्रेमानें। गात रहा तव गाणें॥
माझे पद खिळले। अडखळले–। शब्द मुखींचे नुरले॥
चित्त तुझ्या गानीं। हें रमुनी। गेलें; नच ये श्रवणीं॥–
दुसरें कांहींही;। गानच तें। येतें ऐकायातें॥
विसरुनि जगताच्या। जडतेला। भुललों प्रेमळतेला॥
सुन्दर गायन तें। हृदयांत। जडदेहातुनि नेत॥
सुस्वर—आस्वाद। तें घेत। मिळतें तद्रूपांत॥
गायन हें बनतें। मग डुलतें। जगता विसरुन जातें॥

**गोपाळ ना. महाजन.**

# बारसें-समस्या.

( राजहंस माझा निजला० या चालीवर. )

पाळण्यांत बालक बसला । राजहंस राजस हंसला ॥ ध्रु० ॥

बारसं मुलाचें होई । नव-प्रसूत माता पाही
मातेच्या वत्सलतेचा । महिमा नच वदवे साचा
तें हृदय कसें आईचें । वदणें न सुलभ जड वाचे
हें कुणीं कुणा सांगावें ।
आईच्या बाळा ठावें ।
मायेच्या गांवा जावें ।
मग ऐकावें या बोला । राजहंस राजस हंसला. १

पतिवैभवगिरिशिखरीं हे । लक्ष्मीशी राजत आहे
वृद्धीनें वैभव साजे । शुक्लपक्षि रजनि विराजे
हा उदधी सौभाग्याचा । हेलावत राहु सदाची
वैभवरवि माध्यान्हींचा ।
हा अखंड तळपो साचा ।
सर्वांमुखिं हीच सुवाचा ।
बोलती कुलवधू बोला । राजहंस राजस हंसला. २

नारीजन भोंवतिं जमला । लाडक्यास पाहायाला
खण-नारळ घेउनि सजले । सजवाया बाळास बळें
प्रसववेष देउनि एका-। स्त्रीस माय अर्पी लेका
ओटि भरुनि मागति तनया ।
पतिनामाविण दे न तया ।
नाम घेति रमणी उभया ।

* गोवर्धन यातें वदला । राजहंस राजस हंसला. ३

नाचविती गोपा आधीं । पाळण्यांत घालुनि गादी
वरवंटा गोपा केला । गुंडाळुनि वसनीं त्याला
बाळाचें लेणें त्याला । नाचविती त्याला अबला

कुणि गोविंदा घ्या म्हणती ।
कुणि गोपाळा घ्या म्हणती ।
याच पदा असकृत् वदती ।

दोलीं गोपा नाचविला । राजहंस राजस हंसला.

काश्मीरजमिश्रित पाणी । शिंपुनियां ऐसी वाणी
सखि वदती गोपा मुतला । पाण्यानें शेला भिजला
परिहास करूनी ललना । हर्षविती सगळ्या सदना

मातेची ओटी भरिती ।
तनयासी मागुनि घेती ।
आनंदें पुलकित होती ।

नाचविण्या सजल्या अबला । राजहंस राजस हंसला.

पायथ्याशिं ठेविति गोपा । तनयाचा घेउनि पापा
भीरुकरीं नाचविण्याला । मातेनें दिधलें बाळा
प्रमदांहीं अभिन्न नेमें । नाचविलें बाळा प्रेमें

कुणि सहदेवा घ्या म्हणती ।
कुणि महादेव घ्या म्हणती ।
याच पदा असकृत् वदती ।

बालक दोलीं ठेवियला । राजहंस राजस हंसला.

* चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंत ही चाल आहे.

पाळण्यांत निजलें मूल । प्रेमानें पडली भूल
होउनी कळस प्रेमाचा । श्रम हरी देह जीवाचा
पतिपत्नी-प्रेम-तरूचें । अतिमधुर पुत्रफळ साचें
तनय हें जिवाचें फूल ।
उद्धरितें उभयहि कूल ।
प्रत्यक्ष सुखाचें मूळ ।
गाणें गाती त्या अबला । राजहंस राजस हंसला. ७

निज सतेज मोहक नयनें । लाजवि शिशु उडुपतिकिरणें
आपुल्या बोबडया वचनें । शिशु हिणवी गीष्पति-वचनें
" अर्थ या अशा हंसण्याचा । माझा मज कळतो साचा
हें हंसें मुखावर नाचे ।
जणुं बोल दुग्धपानाचे ।
कीं मुक्या समाधानाचे ।
इतुकेंहि कळे न कुणाला । राजहंस राजस हंसला. ८

मातेच्या मानस-सरसीं । सारखें प्रेमपय वाहे
त्या तरंगलहरींवरती । राजहंस पोहत राहे
सारखा पोहुनी दमला । मग तिला भुकेला वाटे
हृदयाच्या गंडामधुनी ।
दुग्धाचे मौक्तिक-सुमणी ।
ती देइ तयां काढोनी ।
मोत्यांचा चारा असला । राजहंस खाउनि निजला. " ९

पतिदैवत आर्यस्त्रीला । जीवाहुनि जीव सतीला

ही अखंड या प्रेमाची । वैजयंति मोहनमाळा
ती करित असे केव्हांची । धरुनियां उराशीं बाळा
कौस्तुभ हा माळेमधला ।
हृदयाचें कोंदण याला ।
करुनियां जिवाचा दोला ।
दिनराती रिझविल याला । राजहंस राजस हंसला. १०

“ हे काळे कुरळे केश । खेळतात डोक्यावरती
ही दृष्टि पहा मम वदनीं । नेहमीं अशी ही राही
हें तेज अशा रत्नांचें । दुर्लभ या लोकीं साचें
कानांत नाचती डूल ।
तोंडावर हंसरें फूल ।
घालुनी जिवाची झूल ।
मी असाच झांकिन याला । राजहंस राजस हंसला. ” ११

“ हें कोण बोललें बोला—। राजहंस माझा निजला ! ”
या गोविंदाग्रज कविच्या । काव्याच्या करुणरसाच्या
सुकृतीची विकृती केली । तज्ज्ञमतें कपिता, केली
शोकगीत कोणि न गाती ।
शोच्या त्या जाणुनि मुकती ।
अवलोकुनि हे काव्यगती ।
करितिल क्षमा बुध मजला । राजहंस राजस हंसला. १२

वि. स. वाकसकर.

# हृदयदेवता.

*A more rare than gold thrice purified by fire.*
*A good wife satisfies my heart's desire.*

नक्षत्रद्युति मी तुझ्यावरुनियां ओंवाळुनी टाकितों
विश्वांतील समस्त वस्तु दयिते मी तुच्छ गे लेखितों
रत्नांचा जरि तो अकल्पित निधी दैवें मला लाभला
नाहीं तोषद तो परी किमपिही केंव्हांहि होई मला. १

तूं प्रेमास्पद जाहलीस मजला संसारिं या प्रेमले !
यत्नेंही जरि धुंडिलें तरि असें स्त्रीरत्न कोठें मिळे ?
दारा अप्रतिमा खरी विलससी प्रेमाच्चिया वैभवें
कष्टप्राय जगांत सौख्य दुसरें तें काय कोणा हवें ? २

तारुण्यांत उणें तुझ्या न किमपी सौंदर्यबुद्धींतही
राजातें सुख जें कधीं न मिळतें प्रासादभागांतही
ईशें तें मजला दिलें म्हणुनियां कीं स्वर्ग वाटे मही
वर्णी लेखनि काय मानसिं वसे ? ना शक्त ती अल्पही. ३

भावें नित्य तुझें सखे करितसें गे प्रेमळे चिंतन
मुग्धे प्रेमरसाप्रती पिउनियां मी धन्य कीं होइन
तत्प्राणविघातकारक कधीं होई सुधा काय ती
लेखीं चित्र कसें निघेल वद तूं, प्रेमा नसे आकृती. ४

वल्ली वृक्षवरावलंबित परी तूं दूर कां राहसी ?
या जन्मीं अपुला वियोग सखये व्हावा न इच्छा अशी
दे आश्लेष तरी विलोलनयने रुष्टे मनोहारिणी!
सर्वस्वीं मम तूंच, अन्त तरि कां गे पाहसी भामिनी ? ५

कल्याणी तुझिया विणें न दुसरी वस्तू मला गे प्रिय
जन्मे प्रेम तुझ्यासवें मम घडो हा जीव तेजोमय
रम्या मूर्ति तुझी सदोदित सखे ठेवूनियां अन्तरीं
गीतें त्वद्गुणगायनार्थ रचितां आनंद होतो तरी. ६

'कृष्णतनय.'

# इंद्रधनुष्य.

दिव्य सत्तोरणा ! व्योम व्यापूनियां
राहसी तूं, जई मेघ जाई लया;
शास्त्रवेत्त्यांस जाणूनि मी ना पुसें
'काय आहेस तूं मजसि सांगा' असें. १

जेंवि मीं पाहिलें बाल होतों जई,
पाहतों मध्यम-स्थान हें आजही—
निर्जरांच्या सुखाकारणें निर्मिलें
स्वर्गभूच्या सुदीर्घ प्रवासांतलें. २

'काय शास्त्रज्ञ तो, सर्व तच्छास्त्र तें
सांग देईल का माझिया दृष्टितें
मोद तैसा मला दावुनी संप्रती
रम्य भव्या तुझी, कार्मुका ! आकृती. ३

शैशवीं मी जई स्वर्णरत्नावली
लोपलेली तुझ्या दीप्तचापांतरीं
पाहिली, केवढा मोद तैं जाहला
स्वप्नसृष्टींतही तो नसे लाभला. ४

दूर दर्पें सुखापासुनी सृष्टिच्या
शास्त्र सारी जई गुंठना जादुच्या,
लोपुनीयां तिची पूर्व ती चारुता
अश्मरूपा दिसों लागली सर्वतां. ५

'शुभ्ररश्मीवरी भानुच्या अंबरीं

'मघवारी पडे, त्यामुळें सत्वरी
'ती धरोनी पृथग्भाव शुभ्रच्छवी
'सप्तरंगांस दावी; धनू भासवी. ६

'ना धनू सत्य, तें इंद्र ना वागवी,
'ती कवीची असे वैखरी लाघवी.
'जो प्रकाशांगवैचित्र्य उत्पादितो,
'पारदर्शी अशा वस्तुचा धर्म तो.' ७

शास्त्र बोले असें; काय औद्धत्य तें ?
सांग तें जाहलें काय संपादितें ?
भौतिक स्थूलही सर्व त्याचे विधी,
स्वीकृती ते करी आमुची काय धी ? ८

वस्तु सौंदर्य-वृद्धीस जी लागते
अंगसंसक्ति; भंगावया शास्त्र तें
होइ उद्युक्त, त्यांतील लोपूनियां
पूर्व आनंद, ना ये नवा प्रत्यया. ९

'तूं जडात्मा' वदो शास्त्र तूतें सुखें,
पाहतों मी तुला नित्यशा कौतुकें,
सांग तूझ्यामधें काय जादू असे ?
वृत्ति-चांचल्य का दर्शनें होतसे ? १०
साध्य आम्हां न तूं, मात्र देवादिकां,
हें कथायास होशील तूं शक्त का ?:-
'हेतु तो कोणता, इंद्रचापा ! तुला
'धाडियेलें सुराधीश्वरें भूतला ?' ११

दृश्य होती अम्हां रंगरूपादि जे,
ना तयें जाणतों सत्स्वरूपा तुझे;
गुप्तरूपें कुणी भाससी देवता
ठाकलीसे कृपादानपुण्यव्रता. १२

ज्या अजस्रास्त्रयोगें सुरांनीं रणीं
दानवां ढाकिलें पूर्ण निर्दाळुनी,
तें द्विलोकीं दिसावें; तुला कां तरी
ठेविलें सांग भू-स्वर्ग-संधीवरी? १३

आपुल्या अर्भक-क्रीडना-कारणें
वासवें कीं तुला निर्मिलें खेळणें?
खेळतां खेळतां बाल-हस्तांतुनी
विस्मृतीनें पडे, शोभतें तेथुनी? १४

अंतरालीं धरा उक्त मार्गांतुनी
चालवीतो गृहस्वामि आकर्षुनी,
स्थूलरूपास पावूनि ती तत्त्वतां
त्वत्स्वरूपें दिसे सूक्ष्म आकर्षता? १५

भानु[1] जाया सजे, भू वियोगामुळें
तापली, शेवटीं चुंबियेलें बळें—
प्रेमभारें तयें स्वीय कांतानन;
भाससी तूंचि कां व्यक्त तें चुंबन? १६

रक्तिमा आपुल्या जी कपोलावरी
प्रौढतेनें उषा प्रत्यहीं आदरी,

१ सूर्य.

घेतलीसे तुझ्यापासुनी कार्मुका !
ती म्हणोनी जनीं काय आकर्षका ? १७
विश्वरूपास पार्थास योगेश्वरें
दावितां भीतिनें त्या भरे कांपरें;
बोलला–' ही मला ना सहे उग्रता,
यादवा ! पाहुं दे मूळरूपा अतां.' १८
अव्ययात्माचि तो सौम्य होऊनियां
ठाकलासे, तदस्तित्व ये प्रत्यया
नित्य आम्हांस ज्या येथ नेत्रामुळें
तोचि सुव्यक्त का त्वत्स्वरूपें खुले ? १९
मातृ-शिक्षेस वा भीउनीयां बळें
' आ ' करूनी यशोदात्मजें आपुलें
ज्यांत सामावलें विश्व ऐशा मुखा
दाविलें, सांग तूं तेंच आहेस का ? २०
साच सृष्टींतलें काव्य आरंभिचें
वाटतें कीं तुझा होय संबंधिचें;
नातरी त्वद्विना स्फूर्तिसंजीवनी
उद्भवे कोठुनी सत्कवींच्या मनीं ? २१
कारणावांचुनी बालकांचें हसें,
प्रेमही विस्फुरे कामिनीचें कसें ?
योगि-निद्रा कशी ? सूरि[1] तंद्रा वरी ?
तूंचि वा जीवन-स्थान त्यांचें तरी. २२
आस कोणीहि तूं, वंद्य होशी मला,
मन्मुदाचें सदा स्थान तूं एकला;

१ कवि.

काय आनंद तो, काय आमाद तो,
नित्यशा जो तुझ्या दर्शनें वाटतो! २३
तूं कुठें! हे अम्ही क्षुद्रसे पामर
माजवीतों वृथा प्रज्ञता-डंबर!
काय वर्णूं तुला मी, अतर्क्या! बरें?
मूलतत्त्वास तूं शाश्वताधार रे! २४

बाल्य माझें जसें वेधिलें कौतुकें
प्रौढताही तशी तूं करीं त्या सुखें;
याचितों प्रेरका होउ हें साजरें.
आयु नैसर्गिक-प्रेम-भक्त्यादरें. २५

विश्वविस्ताररूपा! अमर्याद तूं,
आद्य हेतूहि तूं, अंत्य हेतूहि तूं;
लोकिं निःसंग तूं; अव्यया! अंतरीं
भूतमात्राचिया प्रेरणा तूं खरी! २६

सविनय तुला माझी, चापा! असो प्रणती सदा
प्रगट करिशी आम्हां गूढें निगूढ गुणास्पदा!
बहुत झटती अव्यक्ताच्या रहस्यसुशोधनीं,
परि न धरिती प्रीती कां ते तुझ्या शुभदर्शनीं? २७

नारायण महादेव भिडे.

# मेघाची दर्पोक्ती.

[ या काव्याचें वृत्त एकच आहे. गानवैचित्र्याकरितां निरनिराळ्या चाली दाखविल्या आहेत. ]

( १. भल्या माणसा दस लाखांची– )

विहंगाहुनी उडें उंच मी विहंगनामा असें न मी ।
विरविरीत मी फिकट पांढरा क्षयरोगी तरि नसेंचि मी. १
धम्‌धमाट करिं धमारतालें मृदंग मी नोहें ।
ज्ञात मला किति काळीं कृत्यें, साधु न मी पाहें. २
नसें जळीं तरि जळेंचि जनहित सतत साधिताहें ।
विजेची छडि खेळविं फिरवीं छडिदार न पाहें. ३
स्तावक माझे द्विज जरि असती भूपति मी नोहें ।
रमत गुप्त करिं तारक तरणी जादुगार नोहें. ४

( २. नीरक्षीरालिंगनरूपी– )

गगन-रंगपटिं तांडव माझें बघुनि पळे पवन ।
उगाच राहे नौकानयनीं नाविक होऊन. ५
सायंकालीं लाल नेत्र मम ! अग्नि दिपुनि गेला ।
उगाच कां तो नर–रथ ओढी बैलासम झाला. ६
खारें पाणी गोड करीं मी ! पाहुनि जल विरलें ।
उगाच कां तें चक्कि फिरवुनी पीठ दळूं धजलें ? ७
मत्त गजासम विलासलीला ! सौदामिनि भ्याली ।
उगाच कां ती क्षुद्र मानवां बनुनि दासि गेली. ८

( ३. दों दिवसाची तनु– )

डोंगर डोले ! हत्ती झोले ! औदुंबर चाले ।
समुद्र हाले ! धूळी उधळे ! ज्वालामुखि बोले ! ९

कापुस पिंजत तारतारटप ! कोंदितसे गगना ।
वाफ सळसळे सुन्‌सणाणसण ! धुंदी दिग्वधुंना. १०
दिव्य मनोरम देखावे हे अगणित रूपें हीं ।
माझ्यावांचुनि नाट्यपटू नट कोण जगा दावी ? ११

( ४. हिंदुस्थानी दोहऱ्याची चाल–)

रंगकला बघ माझ्यापासुनि चोरिलि पक्ष्यांनीं ।
अति सहवासें मान न राही शिकलों चंच-जनीं. १२
रंग पोपटी पोपट चोरी ! शुभ्र रंग बगळा !
हरिति तास मम नीलरंगही ! काक नेति काळा ! १३
मैने ! तूं तव चोंच कोठुनी पिवळिधमक केली ?
चंडोला तुम्हि पुसा कुठोनी अंगिं अणिली लाली ! १४

( ५. वर्षाकालाचा । गमतो थाट विवाहाचा–)

दिसतों मी नयनां । परि कधीं गवसें नच कोणा ॥ ध्रु० ॥
विरहिं पोळली तप्त जहाली मेदिनि तळमळली ।
विद्युद्वार्ता तिजला कळतां टवटवीत झाली ॥ दिसतों. १५
सुरगंगेचें सुगंध पाणी भरुनी पिचकारी ।
हळुच उडवितां नवपल्लव–सुखरोमांचित झाली ॥ दिसतों. १६

( ६. नाहिं सुभद्रा या वार्तेतें–)

तेज धूम जल शीत-समीरण चारपंखि रथ हा ।
बर्फाचें वरि आसन मांडुनि धडकत नेत पहा ! १७
पंखांतुनि या प्रबलशक्तिची वीज घेइ भरुनी ।
थय्‌थयाट करि केंवि आवरूं ? वृद्धपती तरुणी ! १८

गड्गडाटगड ! धुम्धडाडधड रथ हा कडकडला ।
गिरिवर तरुवर मत्तमहीधर ! होती नम्र मला ! १९
धग्धगीत ते अग्नीगोलक ! फेकुनि जाळि कुणा ।
जाइजुईसम हिमकणवृष्टी गोठुनि टाकि कुणा. २०
विचित्र माझा चंड पराक्रम इंद्र भितो स्वमनीं ।
निशाण रंगित चंगफवारा ! मम रथिं दे करुनी. २१

( ७. परम सुवासिक पुष्पें– )

थाटमाट हा नीट पहाया धीटपणें चढती ।
गच्चीवरि किति पांथविरहिणी चकित-हरिणि दिसती. २२
पयोधारिं मी पयोधरांचा ताठा मोडियतों ।
चिंब भिजवितां, काय म्हणावें ? प्रबल मदन होतो. २३
मानिनि माना मजनिं मुरडत मधुर मोहमाला ।
अंगअंग नित रेखांकित तनु सुंदर चित्रकला. २४
उत्कंठेनें बघती मजला अलसभराक्रांता ।
पीनजघनपरि लीन दीन करि जलधारीं धरितां ॥ २५
धांवत धांवत कंकण किणिकिणि वाजवि जणुं मुरली ।
मयूर नाचे ! हंस सारिका धिमि धिमि ताल धरी. २६

( ८. साकी– )

दिसतों मी नयनां । परि कधिं गवसें नच कोणा ॥ ध्रु० ॥
मदीय ऐशा अगाध लीला सांगूं कवण रिती ।
पृथ्वीला किति प्रदक्षिणा करि पृथ्वीहुनि सुगती ॥ दिसतों. २७
शेतकऱ्यांना बापासम मी नाचति मज बघतां ।
रोग्यांना मी सावकार जणुं शापिति मज बघतां ॥ दिसतों. २८
उंच उंच गिरिशिरावरी मी सुखविश्रांति धरीं ।
नव निर्मळ नैसर्गिक निर्झरनीरनिहार वरीं ॥ दिसतों. २९

स. ना. ढोसर.

# आकाशांतून पडणारा तारा.

( चाल-चंद्रकांत राजाची कन्या० )

नभांतुनी तारका जवानें येई भूवरती,
अद्भुत वेगें अद्भुत ऐशी पसरित निजदीप्ती.
कुसुमित अंबरतरुचें सुम हें गळलें जणुं पाहीं,
गगनांतुनि दिव्यास्त्र सोडि कीं मन्मथ लवलाहीं !
गंधर्वाचे विमानि किंवा सुरांगना कोणी
सुशांतशा या निशीथसमयीं येत असे भुवनीं !
अंबरपट विधि चित्रित करितां तदीय कुंचलिंचा
कीं आला हा रेळ चकाकत वरुनी रंगाचा !
गगनवितानीं कशिदा भरितां कोमलशा करिंची
सुरदुहितेच्या फिरकी सुटली काय कलाबतुची !
शशिसंगमसुखिं निशारमणि ही क्रीडत काय अमूप,
शिथिल जाहल्या तिच्या वेणितुन कीं गळलें पुष्प !
घर्मबिंदु हा तद्वदनावरुनी कीं पाझरला,
प्रणयकलहिं तन्नयनींचा कीं अश्रुबिंदु गळला !
विविध मण्यांचा तिच्या गळ्यांतिल कंठा वाढविला,
रत्न तयांतिल पडे भूवरी दिपवित जगताला !
नभमंडप ईशें भूषविला अगणित दीपांनीं,
जळति काजळी दीपाची ही सुटली कां तिथुनी ?
अनंत करिं जणुं शशितान्यांच्या झारि सुधासेकीं
ईशें धरिल्या, त्यांतुन निसट कीं ही एकाकी ?
निजभक्तास्तव भक्तकामकल्पद्रुम सर्वेश

अर्पी प्रेमें सुधारसानें भरुनी हा कलश ?
लोकजनार्दनभजनिं दंग कीं साधुजनां बघुन
आदिदेविची उडे दुग्धधारा पान्हा फुटुन ?
गोजिरिं अपुलीं बाळें मंचकिं घेउनि शेजारीं
गगनसुंदरी प्रेमें खेळवि; परिवारहि भारी !
निजमातेची दृष्टि चकवुनी हें सुंदर बाळ
धांवत भूतलिं खेळाया कीं येई लडिवाळ ?
जमुनि तारका लपंडाव कीं खेळति आकाशीं ?
झिपटाया बघ चंद्र लागला त्यांच्या पाठीशीं !
आकाशाच्या मैदानांतुनि कधीं लपत छपत
तसा ढगांच्या गर्द झाडितुनि काढितसे वाट !
विरल घनांच्या कुंजामधुनी ह्या तारा पळती,
ढगाढगांच्या आड दडुनियां किती जणी बसती.
डोळे मिचकावुनि वेडाविती कितीक धीटपणें,
तशाच दडती, येती पुढती, पळती द्रुतगतिनें.
खेळ भरामधिं आला असतांना तुमचा गगनीं
तूंच तारके ! कां गे आलिस एकटीच तिथुनी ?
मूर्तिमंत ही चिच्छक्ती किंवा त्रिदिवांतून
सत्य देवता मानवलोकीं येई धांवून ?
दिव्य पुरुष तारका ! तुम्हांपासुनि निपजति वदती,
स्वर्गसौख्य त्यागुनि जनकार्यीं येसी कां जगतीं ?
उच्च नभांतुनि निपातन तुझें जगतीं पाहून
नयन झांकुनी सद्भावें जन वदति ' कृष्ण ! कृष्ण ! '
निजसौख्यास्तव अधःपतन जरि घडेहि कवणातें,

भाविक हळवें प्रेमानें मन सहजचि हळहळतें.
उच्च नीच भावना न मानी पुण्यात्मा किमपी,
परोपकारीं दक्ष समयिं निज जीवितास अर्पी.
जन्मुनि भूतलिं दाखविसी अपुली अद्भुत करणी
कीर्तीनें जनिं, रूपें चमके दिव्यात्मा गगनीं.
अवतरले गोकुळीं श्रीपती जगदुद्धरण्याला;
धरुनि रूप सांवळेंच केल्या मग अघटित लीला.
निजकर्तव्यें प्रकटविती जे अपुल्या तेजासी.
तत्कीर्तीसम मूर्ति भासते दिव्यचि सकलांसी.
दिव्यात्म्यांनो ! या तर उतरा या आर्यावर्ती !
निपज करा तेजस्वि जनांची होऊं द्या गर्दी !
निजप्रभावें विभूषित करा आर्यमही तूर्ण !
स्वर्गतुल्य डोळुंद्या आपुल्या ऐश्वर्यीं पूर्ण !

पां. वा. दिवे.

# कमलबद्ध भ्रमरास–

( अंजनीगीत. )

धवल चंद्रिका विलसे छान । काय करी जग दुग्धस्नान !
शुभ्र शालु कीं क्षिति नेसून । रमते बहु हर्षें ! १

एकवटे कीं रमणीस्मित हें । सज्जनयश कीं जमुनी राहे !
सुधासेक कीं सुखकर वाहे । चोज मना गमतें ! २

फुलें चहुंकडे फुलली सुंदर । दरवळला तद्गंध मनोहर
सुटला शीतल समीर सुखकर । कुसुमगंध पसरी. ३

अशा सुखप्रद शुचि प्रसंगीं । दंग असे जो तो निज रंगीं !
कैसें भ्रमरा ! बनुनि विरागी । कमलोदरिं बससी ? ४

तव कांता ही भ्रमरी सुंदर । धुंडाळित तुज भ्रमे विश्वभर
तिज तूं कंटाळला ससि जर । सांग तसें स्पष्ट ! ५

करूं नको तूं तिची वंचना । पात्र न रीतिस अशा अंगना
म्हणुनी त्यजुनी तूं या सुमना । भेट हिला वेगें. ६

उत्सुक बहु मी ऐकायाला । असें अंतरीं तव गानाला
म्हणुनि सोडुनी तूं मौनाला । गा मंजुळ गाणीं. ७

चल आपण जाऊंया हिंडत । जगास सुखवूं गाणीं गात
सफल करूंया अपुलें जीवित । धन्य जगीं होऊं ! ८

काष्ठभेदनीं शक्त असुनि तूं । कमल कोरण्या धरिसी किंतू
यांतिल भ्रमरा ! वद रे हेतू । मजलागीं शीघ्र. ९

मंजुल गाणीं गाउनि गाउनी । किंवा इकडे तिकडे फिरुनी
गेलासी तूं काय थकूनी । म्हणुनी स्वस्थ असा ? १०

किंवा कांहीं व्याधी जडला । बुद्धीला तव भ्रंश जाहला ?
एकाकी असणें कीं तुजला । रुचतें काय वद ! ११

भेदुनि काष्ठें कां ये शीण । किंवा तुज वार्द्धक्यें बल न ?
अथवा हतमति अति मधुपान । काय करी तूतें ? १२

किंवा निंदकदुर्वच ऐकुनी । गेलासी तूं काय त्रासुनी ?
म्हणुनी त्यांना तूं सोडूनी । वससी एकांतीं ? १३

काय म्हणसि ?–"हें कांहीं नाहीं । प्रेमबंधनीं पडलों पाहीं !
काष्ठभेदनीं शक्त असुनिही । हत-बल मी कमलीं ! १४

मत्सत्प्रेमस्थान असे हें । कसें कोरुं सरसीरुह पाहें
म्हणुनि बंधनीं या मी राहें । बहु आनंदानें !" १५

खरें असे हें भृंगा खास । प्रेमबंधनें तोडायास
कठिण; येइ हें अनुभूतीस । पदोपदीं जगतीं. १६

रहा स्वस्थ तूं असाच येथें । स्वकरीं उघडिल रवि तो यातें
मार्ग खुला मग होइल तूतें । बा आपोआप ! १७

कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी.

# धुकें.

थंडीनें अगदीं कमाल करुनी रात्रीमधें सोडिली;
जो तो हेंच म्हणे 'अशी स्थिति कुणीं नाहीं कधीं पाहिली."
येऊनी अरुणोदयीं सहज मीं बाहेर जों पाहिलें—
ब्रह्माचेपरि वेढुनी दशदिशा होतें धुकें राहिलें. १

काळाच्या पडद्यामधून दिसती दृष्टीस बाल्यांतले
वार्धक्यीं दिन सर्व अंधुक जसे, आतां तसें जाहलें.
राहो सर्वहि लांबचें, जवळचेंही जें दिसे थोडकें—
तेंही दृष्टिस अंधअंधुक दिसे, तें दाट ऐसें धुकें ! २

तें झाडांझुडुपांस वेष्टित धुकें होतें भुतासारखें,
होतीं ढाळित अश्रु तीं टपटपां ज्याचामुळें बापडीं;
ज्या कोणाजवळीं उगीच सहजीं ही मूर्ति होई खडी—
येई घाम तयास; भीति इतुकी दावी प्रतापी धुकें! ३

होतें आज वसुंधरेप्रति धुकें आच्छादुनी राहिलें,
यानें उंचवटे व खांचखळगे येती दिसूं तींतले;
मोहानें मतिला स्वकृष्णपटलें आच्छादुनी टाकितां—
चित्तींचे गुणदोष ते तरि कुठें येती बरें पाहतां ? ४

थोरांचीं हृदयें कठोर मृदुही, वज्रासुमांसारखीं,
पाणी ज्यापरि फोडतें दगडही, नेत्रीं खुपेना परी,
तैसें हें गमतें धुकें; न दिसतें याच्यांतुनी, पार कीं—
जातां त्यामधुनी मुळीं अडथळा कोणास ना हें करी. ५

यानें सांठवलें असेल हृदयीं तें काय कोणा कळे ?
काळाच्या उदरांत काय असतें कोणीं कधीं पाहिलें ?

रूपें तेंवि गुणें विचित्र असलें हें काय आहे धुकें ?
थंडीचें दिसतें अपत्य मजला हें गोजिरें लाडकें. ६

थंडीच्या कहरास दूर करण्या अंगासभोंतीं बरा
आहे लेप लपेटला धरणिनें कीं आज हा पांढरा ?
“ मी आलें बघतांक्षणींच इतुकी झाली कशी दुर्दशा
सर्वांची !” म्हणुनी नसेल तर हा थंडीबयाचा हंशा ? ७

किंवा, जर्जर थेरडी अवदसा थंडी तिचें पांढरें
डोकावे शिर, आणि शुभ्र पिकल्या त्याच्या जटा ह्या बरें ?
किंवा, सर्वहि पावल्या तरुलता थंडीमुळें मूर्छना ?–
त्यांच्या त्या दुबळ्या नसेल तर हा तोंडांतला फेंस ना ? ८

किंवा, दूर कुठेंतरी प्रबलसा ज्वालामुखी पेटला–
राखेचा भपका मुखांतुनि तयें वाऱ्यावरी लोटला ?
वाऱ्याला तरि घाण काय खपते? त्यानें त्वरें झाडुनी–
ती टाकून दिली; तिचे थर इथें हे राहिले सांचुनी ? ९

किंवा, शुभ्र हिमालयास किसुनी त्याचा चुरा काढला
आणी वाळत तो उन्हांत इकडे आणूनियां घातला ?
चंद्रालाच कुटून पूड सगळी कीं ती इथें टाकली ?
थोरांचें यश आणि कीर्ति अमला किंवा इथें सांठली ? १०

किंवा, आज रवीस त्या उगवत्या ओंवाळते ही मही ?
किंवा वाहुनि भूवरी पसरिली आकाश-गंगाच ही ?
वाती वा करण्यास कीं जमविला हा कापसाचा खुडा ?
आकाशांतुनि जाहला महिवरी कीं चांदण्यांचा सडा ? ११

किंवा, नित्य नभीं सहस्त्रनयना सूर्याकडे पाहुनी
हा सारा चढला नसेल तर ना पृथ्वीचिया लोचनीं ?
किंवा चाळुनि मेघ चाळ तितका व्योमांगणीं फेंकला ?—
होता उत्तम चूर्णभाग तितका पृथ्वींत हा टाकला ? १२

किंवा, या जगतामधील सगळी जाळूनियां कृष्णता
सारी राख तिची इथें पसरिली आहे निसर्गें स्वतां ?
काळोखास सफेत रंग अथवा कोणीं असे हा दिला ?
किंवा सांठवली असेल शशिनें ज्योत्स्ना इथें निर्मला ! १३
किंवा, "भास्कर-मंडलास दिन हा ओंवाळतो नेहमीं,
त्या आधीं करणार आज तरि तो सारा समारंभ मी !"—
हा वेडा अविचार पूर्ण रजनी गेली करूं; यांतची
झाली दग्ध पळांत काय तनु ही भस्मावशेषा तिची ? १४

पाण्याला शिवतांच बीज मग तें होतें जसें नाहिंसें,
सूर्याचे कर लागतांक्षणिं धुकें गेलें लयाला तसें;
सूर्यानें स्वकरें तया गुदगुल्या केल्या, धुकें तत्क्षणीं—
हांसें नावरुनी नभांत दडलें कोठेंतरी जाउनी ! १५
चोराला बसल्यास चोप मग तो एकेक वस्तू जशी
देतो काढुनि नाइलाज म्हणुनी, झाली मजा ही तशी :
सूर्यानें स्वकरप्रहार करितां डोक्यावरी सारखे—
वस्तू दृष्टिस एक एक हलकें दावी बिचारें धुकें ! १६
किंवा ज्यापरि नाटकांत पडदा जेव्हां वरी ओढिती
तेव्हां तत्क्षणिं रंगभूमिवरचीं पात्रें दिसूं लागती,

तैसा बाजुस ओढतांच पडदा सूर्यें धुक्याचा, मही-
पृष्ठींचे दिसले पदार्थ; दडला नाहीं कुठें एकही! १७

कोणी चित्रकलाविशारद जसा काढूनि रेषा करें
एकामागुन एक चित्र करतो हातांतलें तो पुरें,
ओढोनी स्वकरें धुक्यावरि तसें रेषा, महाचातुरें
सृष्टीचें रमणीय चित्र पुरतें रेखाटलें भास्करें! १८

........................................

येतें तें अगदीं अचानक असें येतें धुकें भेटण्या;
येतांना हृदयांत काय करते प्रीती कधीं सूचना?
जातांना कळतें, रवी उगवला कीं हें धुकें चाललें;
आला किंतु मनांत कीं समजतें कीं प्रेमही संपलें! १९

आलें कोठुनि, आणखी कुणिकडे गेलें असावें धुकें,
येण्याचा तरि हेतु काय इकडे, कोणास हें ठाउकें?
"आलों कोठुनि मी? कशास? अथवा जाणार कोठें असें?"
ज्याचें त्यासचि हें कळे न; मग तें त्याला कळावें कसें? २०

नरहर रामचंद्र परांजपे.

# वसंतरजनी.

[चाल--आन बान जियानुलागि०]

चैत्रमास ऋतु वसंत सुखद रात्रिकालीं ।
अमृतबिन्दु स्रवत इंदु अवनि निखिल न्हाली. १
तुंगशैलश्रृंगवृन्द कीं शकुंत शोभती ।
विविध वेलि पल्लवांहिं नृत्य चारु दाविती. २
प्रसरशालि गगनभेदि वृक्ष सौख्यकारी ।
विहगवृन्द गीतविरत सुरतनिरत हारी. ३
रुचिरनीर गभिर विशद खुलत सुन्हद भारी ।
अध्वखेदतृषितपान्थसकलश्रांतिहारी. ४
मृदुलहरितपर्णपिहित गमत तल्पभूमी ।
विततविभव ऋक्षमाल कीं वितान व्योमीं. ५
क्रीडशील कुसुमचाप छळित मिथुनस्वांता ।
ललितलील मुदित कांत बघत मुग्ध कांता. ६
दयितदत्त विमल वसन रात्रि रुचिर ल्याली ।
प्रथिततिमिरकिरणकेश स्वैर करित केली. ७
हृष्टचेत चतुर इंदु स्वकरकुसुम ढाळी ।
प्रणयपुष्प हृदयकंद धरित खचित भाळीं. ८
हैमकांत मौक्तहारिं सजवि सखि विलासीं ।
अधिर उभय होत तयीं मग्न प्रीतिपाशीं. ९
मत्तमनुजयुगुलसुरसरम्यचरितपानीं ।
कुतुकपूर्ण करित गमन बसुनि गगनयानीं. १०
दिव्य दृश्य भुवनिं नयनिं बघुनि ठाइंठाईं ।
त्वरित चित्त मदिय सकल निपट हरुनि जाई. ११
श्रवणरुचिर हृद्य गानिं डुलत विश्व मोहीं ।
चित्रचरित विविधरंगिं रचित सृष्टि पाही ! १२

गो. ब. माकोडे.

# महापूर.

[ साकी. ]

रवि न बघितला कोणीं नयनीं तीन दिवसपर्यंत,
जिकडे तिकडे कृष्ण ढगांनीं व्याप्त नभाचा प्रांत! १
गर्जति पयोद घोर रवानें होतें गडगड भारी,
कडकडताती उग्र विजा तैं बहु भीती नरनारी. २
तम भरलें हो विश्वीं सारें, नभास लागे धार,
पडेल गळुनी ऐसें वाटे; सुटला वायू गार. ३
जीव सकलही हृष्ट जाहले प्रफुल्ल तरुवर दिसती,
भीत लता कीं भुजा पसरुनी त्यांतें आलिंगीती. ४
मुसलासमान आकाशांतुनि धारा पडती घोर,
संतत वर्षे मेघ भयंकर येति नद्यांना पूर. ५
संतत धारा अभिषेकाची वर्षुनि गिरिशिवशीर्षीं
मघवा पूजी जणुं हर्षानें, नाचति नभि नाकर्षी ! ६
कोश गिरीचा रविनें हरिला निदाघदुर्दिनकाळीं,
दयार्द्र होउनि जाणों इंद्रें भरिला वर्षुनि खालीं ! ७
निर्धनता निज पतिपितयांची पाहुनि कृश नदि झाली,
अंग दिसेशी बारिक मलमल नेसे निदाघकाळीं. ८
गिरिश्वशुर तो जामाताची निशिदिनिं करितो भरती,
रुष्ट जहाला निजपति पाहुनि पतिव्रता जणुं झुरती. ९
निजकरिं येतां जलधन सारें अर्पी गिरि तनयेला;
कन्ये घेउनि जा गे आतां तोषविं अपुले पतिला ! १०

प्रफुल्ल होउनि निरोप घेउनि नेसुनि रंगित शालू,
निज पितयाचें वैभव घेउनि झरझर लागे चालूं. ११

गिरिपितयाच्या ऐश्वर्यातें दाउनियां निजपतिला,
लाजविन कधीं म्हणुनी धांवे होय उतावळ सतिला. १२

उडया धडाधड गिरितलिं टाकुनि सगर्व चाले युवती;
पुढें न पाहे रोध येत तैं क्रोधोग्र बने पुरती. १३

पट्टमहिषि ही जाते बघुनी निजपतिच्या सदनातें,
सवती अपार आणुनि देती जनकाच्या विभवातें. १४

जिकडे तिकडे पाणी पाणी ! अन्य दिसे नच कांहीं,
फों फों वाहत सूं सूं वायू शैत्य जाहलें पाहीं. १५

तीरापासुनि दशकोशावधि पाणी भरलें भरलें,
रानें गांवें नाले ओढे जलमय झाले सगळे. १६

मोठेमोठे तरुगण वेगें वाहत नदींत येती,
गांवें कितीक वाहुनि गेलीं कोणिं करावी गणती ! १७

मोठ्या अपार लाटा तीरीं वेगानें आदळती,
कोठें कोठें वळसे होउनि तरि मनुजां बुडवीती. १८

जिकडे तिकडे फेंस दिसतसे जाणों सरिता दमली !
बुद्बुदपंक्ती लहानमोठी होउनि विलया गेली. १९

गांवांमध्यें नावा फिरती, घाबरले तैं लोक;
धान्यगृहें पशु वाहुनि गेलीं अपार झाला शोक ! २०

पां. रा. नंदुरबारकर.

# पुष्पाचें जीवित.

वसंतकालीं वृक्षलतादिक पालवती ।
सुंदर मोहक पुष्पांनीं तनु शोभविती. १
मालतिकुसुमें एक दिनीं प्रातःकाळीं ।
नेत्र उघडुनी ही सृष्टी अवलोकियली. २
गीत गात तैं भ्रमर वदे 'मधु दे, मधु दे !' ।
गुंजारव हा श्रवणीं पडतां डुले मुदें. ३
तल्लिन होउनि प्रशांत वृत्तीमाजि रिघे ।
पुष्प प्रफुल्लित तया वदे–'हा घे, हा घे !' ४
शीतल वायू येतां करवी नृत्यातें ।
'सुगंध देई' पृच्छा करि ही कर्णपथें ५
सुमंद वातें जणुं रोमांचित नीरतटीं ।
'घे हा सकलहि' पुष्प वदे 'आनंद लुटीं !' ६

हर ! हर ! देखा सुपुष्प भूवरि पडलेलें ।
वृक्षतलीं तें देठापासुनि खुडलेलें ! ७
मधुप पुनरपी गानें स्तवि त्या मधु द्याया ।
पुष्प वदे–'जीवित मम गेलें रे वायां !' ८
वायू त्यापरि सुगंध मागे त्याजवळी ।
पुष्प वदे–'मम जीवित नष्टचि हें समुळीं !' ९

ह्या पुष्पापरि मानवजीवित क्षणिक असे ।
मिळे काल तो घालवुं या सत्कर्मि कसे ! १०

**शंकर नारायण माडीवाले.**

[ वैराग्यपर. ]

# भावनात्रय.

## १. सुख आणि दुःख.

सुख हवें, दुःख तर मित्र मान तूं आधीं;
रुचि मिष्ट रसें हो नष्ट, दुष्ट ये व्याधि.
सुखदुःख अर्भकें दोन कालपुरुषाचीं;
सुख गोरें, काळें दुःख, अशा वर्णांचीं.
सुख तेज पाडितें, सदा दुःख तम सोडी;
जरि भिन्न दिसाया, दिन रात्र तरी जोडी.
दुःखास टाकुनी सुख न कधींही राहे;
ज्या दुःख नको तो मुख न सुखाचें पाहे.
हासतें निरंतर दुःख सुखाच्या ठायीं,
काढुनी करुणरव दुःखाचा सुख गाई.
सुख गोड न हो तर कडू दुःख तें नाहीं;
सुखदुःखमाधुरी असे वेगळी कांहीं.
सुखदुःखकषायें रोगरहितता साधीं.
रुचि मिष्ट रसें हो नष्ट, दुष्ट ये व्याधी.

## २. मातृमहती.

तूं माय, तुजविणें कोण जन्म हा दावी?
या जगीं खरोखर तुझीच महती गावी.
सुख दुःखीं कसलें दुःख सुखीं तुज ठावें,
मजसाठीं घेसी श्रम ते कोणिं कथावे!

स्मृति तुझी धैर्यबल दे मज संकटकालीं;
तव आशीर्वाद सदैव मी श्रमशाली.
हा स्वभाव माझा तुझी देणगी आहे;
किति रुचिर काव्यमय जीवनगंगा वाहे!
मम मनोधर्म तुज कळती, नच इतरांतें,
हा मुख्य तुजमधें विशेष दिसतो मातें.
त्वत्प्रेमचिन्ह! रवि जणों झळाळे व्योमीं!
त्या द्युतिविण कांहीं पाहूनी न खुलें मी.
भवपथीं तुझा कर चालाया मज लावी,
या जगीं खरोखर तुझीच महती गावी.

---

## ३. आत्मनिवास.

जोंवरी घडेना तव सहवास जराही,
तोंवरी मला निज विश्रांतिस्थल नाहीं.
स्वस्थान सोडुनी कारागृह जग सारें
स्वातंत्र्यसुखाचें शांत शिवेना वारें.
जी सगेह लागे गोगलगाय फिराया
तिज मिळे कुठेंही सहज विरामिं शिराया.
अजि येथें, तेथें उद्यां भ्रमुनि मी श्रमलों;
मुळिं नसे विसावा, तुझ्यासवें नच रमलों.
जे मित्र मानिले ते मम वैरी झाले!
स्नेहास विसरुनी टोचुं लागले भाले!
संसार करावा कसा, कुठें या लोकीं?
सर्वत्र पसरले कंटक हे अत्रलोकीं!
उचलुनी उराशीं धरिसी तूं न कांहीं
तोंवरी मला निज विश्रांतिस्थल नाहीं.— 'सुमंत.'

# " बाळें तीं खेळत होतीं. "

(कै० बालकवि–ठोमरे.)

[ ही कविता कवीनें गीतेंतील " क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति " याचें स्पष्टीकरणार्थ केली आहे. जीव देहधारी नसतांना ज्या वेळीं मूळस्वरूपांत—म्हणजे स्वर्गाच्या तेजोमय गर्भात—असतो, त्या वेळीं प्रभुरायाची वत्सलता त्याची जोपासना करीत असते. परंतु पुण्याचा भोग संपेपर्यंतच जीवाची ही दशा कायम असते. नंतर प्रकृतिधर्माप्रमाणें पुण्यक्षय झाल्यावर तो जीव ( महात्मा ) निसर्गात दृग्गोचर होतो; म्हणजेच या महात्म्यांना मृत्युलोकांत यावें लागतें. अशा प्रकारें महात्म्यांना पुण्यबलावर स्वर्ग प्राप्त झाल्यावर पुण्यक्षयानंतर मृत्युलोकांत येई तोंपावेतों मध्यंतरीं जी विकारदशा प्राप्त होते, तिचें वर्णन कवीनें आपल्या कवितेंत दिलें आहे. **अमृत बापूजी ठोमरे.** ]

स्वर्गाच्या तेजोगर्भीं । बाळें तीं खेळत होतीं
वत्सलता प्रभुरायाची । जोजवी तया निजहातीं
झुलवी त्या पाळणियांत । छायामय मधुरजनी ती
संध्येची सुंदर तारा
करि त्यावर विंझणवारा
लडिवाळे परमोदारा—
देवास बहू आवडती । बाळें तीं खेळत होतीं. १

बैसूनि सूर्यकिरणांत । सोन्याच्या कारंजांनीं
कधिं जलदजाल झुलवावें । स्वर्गीय सुधेनें त्यांनीं
कधिं चंद्रकला सजवावी । नवरंगी हार विणोनी

शांतीचा करुनी पावा
अवकाशीं सूर भरावा
नक्षत्रलोक झुलवावा
सौंदर्यें उधळित हातीं । बाळें तीं खेळत होतीं. २

एकदां सडा संध्येचा । शिंपूनि महोत्सव केला
बनविलें बीन बाळांनीं । ओढूनि सूर्यकिरणाला
तें वाद्य वाजवायाला । अनिवार हर्ष हृदयाला
ते सांध्यगिरी बहुवर्णी
छायामय त्या निर्झरिणी
गजबजल्या सुरललनांनीं
परिसाया देवहि येती । बाळें तीं खेळत होतीं. ३

वाद्यांचा ये झंकार । एकेक जसा उदयाला
एकेक सृष्टिचें फूल । लागे मग उमलायाला
निस्तब्ध मूक गगनाला । निमिषांतचि मोहर आला
आनंद गडे आनंद
गाण्याचा एकच छंद
स्थिर भरला परमानंद
ये रंगनाथ संगीतीं । बाळें तीं खेळत होतीं. ४

परि हाय कुठुनि वरि आला । अति तीव्र विषारी वारा
कंपित हो एकाएकीं । मधु दिव्य देश तो सारा
बाळांचे गळले हात । बीनाच्या तुटल्या तारा
ती स्वप्नसृष्टि जळाली
गाण्याची तार गळाली
काजळी चढे वर खालीं
झाली हो माती माती । बाळें तीं खेळत होतीं. ५

या खोल भूमिगर्तेंत । अंधार खळाळत होते
मोहाचें वीख विखारी । बेभान करी सकलांतें
वाऱ्यावर भेसुर भारी । अंधुकता पसरित येते
वाफारा तो लागोनी
तीं रम्य बालकें ताऱ्हीं
कळमळुनी पंचप्राणीं
कोसळुनि खालीं येती । बाळें तीं खेळत होतीं. ६

मग भयद कालडोहांत । भोवंडुनि गिरके खाता
फणि डंख विखारी मारी । वर लाट चपेटा देता
अंगार-तडकते लाही । जंजाळ जिवाचे होती
तडफडती माशावाणी
आक्रंदति करुणागानीं
हा हा ते हाल बघोनी
पाषाणहि भंगुनि जाती । बाळें तीं खेळत होतीं. ७

कळवळुनि शेवटीं आला । यमधर्म सुमस्नेहाळ
जर्जरित बाळ गाळांत । निश्चेष्ट दृष्टि तेजाळ
मालवती जीवज्योत । लवली ती किंचित्काळ
अप्सरसा निर्भय चित्तीं
गंधर्व गायनें गाती
स्वर्गांत दिवाळी होती
जाती न परंतू वरती । बाळें तीं खेळत होतीं. ८

# मायेचा बाजार.

देवा ! मायेचा बाजार, करितो जीवा बहु बेजार ॥ ध्रु० ॥

( १ )

श्रमुनी गृहिं जरि विश्रांतीसी, वरण्या पळभर हो ! जावें ।
अबला ती ना? स्त्रीजातीसी सवत कशी रुचणार ! देवा०

( २ )

"अमुक संपलें तमुक उद्यां हो आणायाचें आहे ना ?"
खळ न कधीं या मंत्रालागीं नाहीं हो पडणार ॥ देवा०

( ३ )

आज उद्भवे लग्न कुणाचें, मुंज राहिली उद्यां उभी ।
खर्चाच्या ह्या ऐशा बाबी नित्य नव्या येणार ॥ देवा०

( ४ )

धन असतांना मिळतिल सारीं शिताभोंवतीं भुतें जशीं ।
दैन्यावस्थीं पळति, तयांचा विश्वास कसा धरणार ॥ देवा०

( ५ )

जोंवरि आहे देह चालता तोंवरि पुसती जन सगळे ।
खिळतां शयनीं हाल तयाचे कुत्राहि न खाणार ॥ देवा०

( ६ )

स्त्रीजातीचा स्वभाव गर्वी, टेंभा पाजळण्याची ती ।
हौस म्हणुनियां घरिं अबलांचे तंटे हे होणार ॥ देवा०

( ७ )

मामा, काका, बंधू, भगिनी, भार्या जरि पुत्र ।
रोधायातें मार्ग यमाचा, कोणि नसे येणार ॥ देवा०

(८)

सौख्य पाहतां राइएवढें, नग परि असती दुःखाचे ।
यांच्या भाराखालीं हिंमत, कुठवर ती टिकणार ॥ देवा०

(९)

देवा! तुझिया पदकमलावरि माथाही ठेवायाला।
अवसर कधि हा दुष्ट न देई मायेचा बाजार ॥ देवा०

(१०)

सर्वसाक्षि तूं म्हणवुनि घेशी, परि न दिसें मी तुज कैसा?।
जगन्नियंत्या! हाच तुझा कां न्याय जगीं दिसणार?॥ देवा०

(११)

तूंचि एकला मम जीवाच्या आशेचा आधार खरा।
तुजविण नाहीं जगदीशा! रे! यांतुनि सोडविणार ॥ देवा०

(१२)

येई लवकरि माझा तोडीं सारा हा व्यापार अतां।
बहुत कष्टलों दीनानाथा! अंत न पाहीं फार ॥ देवा०

(१३)

मायेच्या या बहुविध तापें, जीव रंजला दयानिधे।
विश्रांतीच्या जळपानाची आस वसे अनिवार ॥ देवा०

य. म. गद्रे.

# जय हिंदभूमिचा बोला !

[ चाल—इतिहासपुराणीं लिहिला । कीं भरतखंड हा पहिला. ]

या, चला, उठा, जय बोला । जय हिंदभूमिचा बोला ।
ही ऐका नौबद झडली । भीरूंच्या उरिं धडधडली ।
रणघोष तिचा हा भिववी स्वार्थपटूंला ॥ ध्रु० ॥
हा जनसत्तेचा डंका । व्यापुनी मर्त्य या लोका ।
तेथोनी फोडित हांका । देवांच्या भिडला अंका ।
' सम करील रावां रंकां । हा ' अशा धरिति ते धाका ।
ते ' जनीं जनार्दन ' भ्याले या घोषाला ॥ या चला उठा० ॥ १ ॥
या पुरेत आतां झोंपा । आलस्या होमीं ओपा ।
दौर्बल्यावरती कोपा । नैराश्या धरुनी चोपा ।
नच मार्ग यशाचा सोपा । ऐक्यसाध्य तो निष्पापा ।
मर्दसे जगा, वा मरुनी जा स्वर्गाला ॥ या चला उठा० ॥ २ ॥
जो दुसऱ्यावरि विश्वासे । कार्यभाग त्याचा नासे ।
जगिं होय तयाचें हांसें । तो मरेल रिपुनिःश्वासें ।
स्वावलंबनाच्या कांसे । यश धांवत ये उल्हासें ।
तत्त्व हें ठसवुनी मनीं, झटा कार्याला ॥ या चला उठा० ॥ ३ ॥
मायभूमिच्या अभिमानें । गा तिच्या गुणांचीं गानें ।
यश तिचेंच ऐका कानें । व्हा मत्त तिच्या स्तुतिपानें ।
दुमदुमोत जयघोषानें । उद्यानें नगरें विपिनें ।
बंधु हो, धरा या धर्माच्या मार्गाला ।
या, चला उठा, जय बोला । जय हिंदभूमिचा बोला ॥ ४ ॥

श्रीराम गोविंद बेडेकर.

# अढळ पद अथवा अंत्यजाष्टक.

जगीं जें जें ऊर्जस्वल नियत त्या त्या अवनति ।
तशी नीचावस्थेंतिल अणुसिही उन्नत गति ॥
परी या सिद्धांताप्रतिहि अपवाद स्थिर वसे ।
**जनीं या एकाकी अचलपद तो अंत्यज असे ॥ १ ॥**

धराकंपें नम्रा अचलतति भूमीवरि पडे ।
सरिन्नाथाचें तज्जनकिं चिर रूपांतर घडे ॥
पुराचें कांतार क्षणिं घन वनाचें पुर दिसे ।
**जनीं या एकाकी अचलपद तो अंत्यज असे ॥ २ ॥**

पुरा ब्राह्मण्यातें नृप मिळविती ते कितिकदा ।
तयाचे स्वामीही निजगुणबलें क्षत्रियपदा ॥
समाजाची ऐशी बदलत घडी शाश्वत नसे ।
**जनीं या एकाकी अचलपद तो अंत्यज असे ॥ ३ ॥**

शकां म्लेच्छां हूणां इतरहि असंख्यात रिपुंना ।
उदारें ज्या धर्में उदरिं दिधला ठाव विगुणां ॥
स्वनिष्ठां दासां तो उचलि न वरी वत्सलरसें ।
**जनीं या एकाकी अचलपद तो अंत्यज असे ॥ ४ ॥**

त्यजी मर्यादेतें गरजत जधीं क्षुब्ध जलधी ।
तशी आर्यस्त्रीही हरुं बघति जैं सत्वचि कुधी ॥
वदे ज्योतिःशास्त्र ध्रुवहि चल मिथ्या म्हणुं कसें ।
**जनीं या एकाकी अचलपद तो अंत्यज असे ॥ ५ ॥**

तुका, एका, ऐसे सुजन पतितोद्धारिं झटले ।
समाजीं ते त्यांचे परि नच मुळीं बोल ठसले ॥
महात्मा गांधीही अविरत झटो उन्नतिमिषें ।
जनीं या एकाकी अचलपद तो अंत्यज असे ॥ ६ ॥

करीं व्हावी सत्ता स्वजनिं तरि लत्ता न वितरीं ।
समत्वाची कांक्षा पतित जनिं वर्तें सम तरी ॥
वृथा हो हा बोध, त्यजुं उभयही दुर्दिनवशें ।
जनीं या एकाकी अचलपद तो अंत्यज असे ॥ ७ ॥

कशी देशाची हो प्रगति सकलांगी द्रुतपदा ।
जरी त्याचा राहे चरण खिळला कर्दमिं सदा ॥
अधःपाता सीमा नच न मनिं हें जोंवरि ठसे ।
जनीं या एकाकी अचलपद तो अंत्यज असे ॥ ८ ॥

श्री. कृ. कोल्हटकर.

# नूतनाभिषिक्त राजास.

गादीवरी बघुनियां तुज पूर्वजांच्या
माझ्या मनांत उठती लहरी सुखाच्या;
आहेत काव्यकुसुमें दिसण्यांत साधीं,
पाहीं तयांत वसतें रज का सुगंधी. १

"विष्णुस्वरूप नृप या जगतांत माना."—
हें सूत्र धर्म शिकवी मुळचें अम्हांना.
माझी नसे रुचिर, संस्कृत, गोड वाणी;
लागेल ती कटु असें भय चित्त मानी. २

आहे क्षमा परम सद्गुण त्या प्रभूचा—
भूपा! विचार हरि हा दर मानसाचा.
ही सुज्ञसम्मत जरी दिसली न भाषा,
निर्लोभ-चित्त मम सर्व हरील दोषां. ३

देवें तुला नृपपदावर बैसवीलें,
याचें न कारण नृपा! तव दैव झालें.
कांहीं विशिष्ट शुभ हेतु असे प्रभूचा
एकास थोर करण्यांत बुधाग्रणीचा. ४

तो सूर्य थोर परि दे जगता प्रकाश;
तो मेघ थोर परि शांतवितो धरेस;
भूपाल थोर गमतो जरि तो जनांस,
त्याचा असे जनहितास्तव जन्म खास. ५

वित्तास नित्य उधळून विलास केले,
रत्नावली मिळवुनी वपु भूषविलें,
रानीं करून मृगया वधिलें पशूंला
होई न जन्म परि धन्य जगीं नृपाला ! ६

राज्यीं सुरक्षित सदा जनवित्त व्हावें,
स्वातंत्र्य पूर्ण सकलां सुजनां असावें,
उद्योगवृद्धि करुनी धन वाढवावें,
—हें ध्येय तूं निशिदिनीं पुढतीं धरावें. ७

आहे शिरावर तुझ्या किति थोर भार
याचा मनांत कर तूं बसुनी विचार.
साह्यार्थ योग्य जन सन्निध रे असावे;
ढोंगी बकांस बघुनी नच तूं फसावें. ८

जे हांसती उमटतां तव हास्य गालीं,
जे कष्टती निरखुनी तव घर्म भालीं,
ज्यांच्या हृदास सुखदुःख परी शिवेना,
देईं न थार तव सन्निध तूं अशांना. ९

न्यायप्रदानसमयीं समदृष्टि ठेवीं,
सर्वांस संधि वरती सरण्या मिळावी;
देऊं नको लघुजनां तव लुब्ध कर्णा,
राखीं तनूस करुनी सुफल श्रमांना. १०

ज्यांच्या विषास उपमा जगतांत नाहीं—
ऐशा रसाळ चुगल्या असतात पाहीं !
त्यांच्यामुळें बहु अनर्थ जगांत झाला;
कर्णीं पडोत न कधीं तव त्या नृपाला ! ११

राज्यांत ज्या भरभराट न उद्यमाचा,
उत्कर्ष दृष्टि न बघे कधिं शेतकीचा,
विद्याप्रसार मुळिं जेथ घडे न कांहीं,
तें राज्य घोर नरकासम येथ होई. १२

भूम्यंतरस्थ अमुच्या करिं वित्त देई,
आधार जी अमित दीन जनांस होई–
ती शेतकी दडपतां समयीं करांनीं
दुष्काळ रोग भरती नगरें शवांनीं. १३

शेती जनां सुखद तूं करण्या झटावें !
व्यापारवृद्धिपथ रुंद तुवां करावे !
संपत्तिवाढ करुनी अपुल्या प्रजेची
भूपा ! स्पृहा धर धनार्जन साधण्याची ! १४

विद्येविणें खचित उन्नति होत नाहीं:
लक्ष्मीसरस्वति अतां मिळतात पाहीं !
त्यांचा खरेंच मिटला अनभीष्ट वाद;
विद्याप्रसार करण्यास धरीं उमेद ! १५

राज्यांत जेथ जन निर्बळ रे ! तयाचा
कोणी न आदर करी, वदतों त्रिवाचा.
मर्दानि जे असति खेळ तयांस द्यावें
उत्तेजना,–वचन हें मम आदरावें ! १६

पक्ष्यां नखें, वनपशूंसहि दंतमाला
देवें दिल्या सहज रक्षण व्हावयाला;
शस्त्रेंच योग्य असती जनरक्षणास,
तीं लाभण्या सवलती बहु दे प्रजेस ! १७

लोकस्थिती न बघतां निज लोचनांनीं
अन्यांचिया सतत पाहति ईक्षणांनीं,
ते भूप नाश करिती अपुल्या प्रजेचा;
शापार्जनास्तव गमे मज जन्म त्यांचा. १८
गादीवरी सरळ हक्क तुझा म्हणून
ती प्राप्त आज तुज होय मनांत आण.
तेव्हां प्रजाजन पुरातन हक्क सारे
प्राणांपरी जपति, हें विसरूं नको रे ! १९
राज्यांत रोगवश जे असतील लोक,
निर्द्रव्य जे म्हणुनि भोगिति फार दुःख,
रुग्णालयीं फुकट औषध त्यां मिळावें,
ऐसें सुकृत्य करण्यास न तूं चुकावें. २०
पांचा मुखीं म्हणति ईश्वर नित्य राहे—
ही उक्ति लोकमतशक्ति पुकारताहे.
केव्हांहि लोकमत तूं बहु आदरावें,
तेणें सुराज्यतट घट्ट तुवां करावें ! २१
टीका कुणीं तुजवरी प्रतिकूल केली,
मानूं नको तव नृपा ! बलहानि झाली.
सत्यापरि प्रबल वस्तु जगांत नाहीं,
सत्यास सोडुन कधीं क्षण तूं न राहीं ! २२
बालेन्दुतेज चढतें शुभ अंबरांत,
वाढो तुझें यश तसें सगळ्या धरेंत !
तूं दीर्घकाल कर वास सुखें धरेचा
होऊन जीव निज तुष्ट सुखी प्रजेचा ! २३

पां. बा. दडकर.

# पद्ममृणाल.

संध्या शांत मनोहरा बघुनि मी मोतीतलावावरी–
जेवोनी बसलों, बघोनि सुषमा आनंदलों अंतरीं;
वाहे मारुत मंद येति लहरी पाण्यामधें नाचत,
होता पद्ममृणाल एक लहरींसंगें सुखें क्रीडत. १

केव्हां मस्तक तो जलीं बुडवुनी, केव्हां वरी काढुनी
दावी; नाच असा मनोहर करी लाटांसवें झुंजुनी.
माझें मानस वेधलें बघुनियां तन्नृत्य चेतोहर,
पानें स्वच्छ, शिरीं निमीलित दिसे अंभोज तें सुंदर. २

येती थोर उचंबळोनि लहरी त्याच्यावरोनी किती,
झोंके पद्ममृणाल घेइ कुतुकें नाहीं तयांना मिती.
ती त्याची स्थिति पाहतां स्वनयनीं, एकाग्र होतां क्षणीं–
मच्चित्ताब्धिमधें विवेकलहरी येती किती दाटुनी ! ३

गेलों पद्ममृणाल तो विसरुनी, दुःखार्त झालें मन;
दैवाचें जगतावरी पसरलें दुर्लंघ्य हें बंधन.
मोठे बादशहा, असंख्य नृपती, तन्मंत्रिलीला तशा,
ह्या नालासम कालसागरिं बहू घेतात झोके कशा ? ४

शौर्यें जिंकुनियां समग्र धरणी ज्यांनीं प्रतीपाळिली,
मोठे निर्मुनियां पिरामिड[1] जनां शक्ती जिहीं दाविली,
गेले ते दडुनी कुठें मिसरचे राजे प्रतापी जन ?
आतां कोण करावया प्रकटले राजे महीपालन ? ५
ज्यांनीं शोभविली धरा निजगुणीं, शौर्यें जिहीं जाळिला
लोकीं उन्नतिदीप, थोर महिमा ज्यांचा जनीं गायिला.
होती जी रणभू, स्मशानपुरि ती थर्मापिली[2] कां दिसे ?
गेले ग्रीक कुठें ? अथेन्स नगरी अंधारमग्ना दिसे ! ६
ज्यांच्या बाहुबलें समुद्र, धरणी, कांपे नभोमंडळ,
ज्यांनीं वर्षसहस्र राज्य करुनी केले रिपू दुर्बळ;
ज्यांचें साहस अद्भुत त्रिभुवनीं ऐश्वर्य इंद्रापरी—
कोठें रोमन लोक ते ? दडपले कीं काय कालोदरीं ? ७
ज्यांनीं "दीन" म्हणोनि दीन धरणी केली कुठें लोक ते—
गेले आरबवीर, शूर गिलचे ज्यांतें मही कांपते ?
ते उल्कांसम नाचले क्षितिवरी, गेले लयातें दुरी—
त्यांच्या सर्व कथा मना रमविती कादंबरीच्या परी. ८
'शौर्यें सर्व धरा करीन अपुली दासी' असें आणिलें
चित्तीं जर्मनिनें—नृशंसपशुनें जें युद्ध आरंभिलें;
त्यामाजी जित होउनी खल कुठें गेले, पळाले दुरी !
सत्पक्षा जयलाभ होउनि फिरे शांती मुदें भूवरी ! ९

१ ईजिप्तमधील जुनीं भव्यतम कबरें.

२ येथें ल्हानशा खिंडींत उभें राहून थोड्या स्पार्टन लोकांनीं प्रचंड पर्शियन सैन्य अडवून धरलें.

कां ही भारतभूमि आजि करिते आक्रोश ? कां जाहली
ही दासी परक्यांचिया पदतलीं ? ही कां दशा लाभली ?
धी-श्री-बाहुबलें समग्र वसुधा-चित्तास आकर्षिलें-
ऐशा भारतभूमिला विधिबलें हें दास्य कां लाभलें ? १०

कोठें इंद्रपुरी, कुबेरनगरी, कैलास आहे कुठें ?
वेदाभ्यासनिमग्न ते ऋषि कुठें, त्यांचीं ठिकाणें कुठें ?
कां नालासम जाहलीं प्रणत हीं या कालसिंधूदरीं ?
आतां भारतभूमि ही निजमुखीं काढील कां हो वरी ? ११

आशा, ऐक्य, परिश्रमें पुनरपी पावेल ही मुक्तता,
दास्याचा पुरता कलंक झडुनी होईल कीं शुद्धता,
यासाठीं तिजला दिलें प्रभुवरें हस्तांत जॉर्जाचिया;
तीतें दास्यविमुक्त तो करुनियां, ठेवील सारी दया ! १२

यशवंत महादेव केणी.

# आकाशांतील चंडोलास—!

( चालः—दिनमपि रजनी–)

सोड सोड चंडोला लहरी । स्वैरपणाच्या आतां भूवरि ॥ ध्रु० ॥
निद्रेनें विश्वास पीडिलें । स्थिरचर अवघें प्रशांत झालें ॥
अव्यक्ताचे बोल निमाले । तेजाचें साम्राज्य बुडालें
अंधारी अंधुकता आली । अंतर्दृष्टी अंध जहाली
हृदयामध्यें हीं संचरलीं । स्वार्थपिशाचें वेळोवेळीं
खेळ तयांचे सुरू जहाले । विश्व त्याच जाळीं सांपडलें
नव्याजुन्याची फुगडी झाली । उघडी झाली मूठ झांकली
"जुनेंचि सोनें"–"नवें हवें तें" । सोडिति ऐशा फुक्यां हवेतें
तेजोऽभावीं बडबड उरली । कृतिची अमुच्या सीमा झाली
" आपण मेलों जगत बुडालें " । हेंच नांव जगतीं गाजविलें
भगवा झेंडा हाच फडकला । शौर्याचा हा दिवा लागला
अकलेचा खंदक सर केला । अपकीर्तीचा ध्वज फडकविला
दुष्टभावना पिशाच्चिका ते । घालिति आतां थैमानातें
ही विश्वातें गुंगी आली । पूर्वस्मृतिची ओळख गेली
तेज ओतुनी निजगानीं, तरि । जागृति देईं सकलां अंतरिं ॥१५॥
सोड सोड चंडोला लहरी० ॥ ध्रु० ॥

अवनतिची ही चिता पेटली । हृदयांची या रक्षा झाली
नवगानाची दे संजीवनि । जिवंत करिं ती सुधासिंचनीं
बोल आपुले सुरेल गाईं । करिं चंडोला वेळीं घाई
तव गानाची मधुर बासुरी । मृतहृदयें हीं उठविल सारीं
नजरबंद मग खेळ करोनी । भूत पिशाचें टाकिल मारुनि
अव्यक्ताचे दिव्य सूर ते । नादुनि जातिल दिशादिशांतें
संसारांतिल चिंता होतिल–। दूर; दिव्यता हृदयें झरतिल
कर्तव्याची–नच शब्दांची–। नौबत वाजेलचि शौर्याची
मृत आशांच्या लतातरूंना । कृतिचीं सुफलें येतिल नाना
रवि पुष्पांजलि मग किरणांची । प्रेमें उधळिल मधु हास्याची
चूर घेउनी त्या किरणांचा । सोनेरी ध्वज करुं विजयाचा
पुण्यात्म्यांचा संघचि सारा–। पुण्यवंत ज्या नभिंच्या तारा–
गुंफुनि त्या मग दोरा दोरा । जरिपटक्याचा सोडु भरारा
बंधुत्वाचे जमवुनि दोरे । एकीचा पट विणतिल सारे–
स्वातंत्र्याचें सुटतां वारें । फडकतील मग हेच फरारे
निःस्वार्थाचें भरतां वारें । काळ भीतिनें मनीं थरारे
कृतीच केवळ स्वर्ग-द्वारें । बोल मुखींचे फोल फवारे
नुरेल म्हणुनी बडबड साची । कारण वेळा तीच कृतीची
हृदयें जळुनी आंतचि उलती । मूकपणें मग कामें करिती
स्फुलिंग परि तो रक्तामधला । अतां पाहिजे त्वां चेतविला
निसर्गांतला चेतविणारा– । पुरेल कणही अशा अंतरा
चित्रें तरि हीं चेतोहारी । रंगविं रे ! तूं विश्वचितारी! ३७

सोड सोड चंडोला लहरी० ॥ध्रु०॥

नव्या मताचे जुने शहाणे । त्यजितिल जें जें लाजिरवाणें
उत्साहाचे नव्या मताचे । वाली कोणी मानवतेचे
सद्भावांचे खड्ग घेउनी । टाकितील कालाही चिरुनी
दिव्य तुझ्या या गानस्फुरणें । जाइल अमुचें जिवंत मरणें
कर्तव्याची रीत तुझी ही । पाहुनि कोणी रमतिल हृदयीं
विश्व सांठवी जो निज हृदयीं । विश्व तयातें ठेवी हृदयीं
हाच मोक्ष दे आज अम्हांतें । गाउनि अपुल्या संगीतातें
बोल विहंगा! बोल अतां तरि । वाणी अपुली जग जितणारी.४५
सोड सोड चंडोला लहरी० ॥ ध्रु० ॥

गिरीश.

# मोडकी खाट.

मज आवडते, आवडते ही खाट, ती जरी मोडकी असत. ॥ध्रु०॥

प्रेमें तिज मी जपुनी राखियलेंसे
अजवेरीं प्राणाऐसें.
तिज अश्रूंनीं कितिदां मीं भिजवीलें,
निःश्वासीं पावन केलें.
निगडित बहु ती झाली या हृदयाशीं
अगणितशा प्रेमळ पाशीं.
एकहि ना बंध सुटेल,
एकही दुवा न तुटेल,
कोसळला खालिं खगोल,
संतत तरि ही अभंग राहायाची
सांखळी दृढ प्रेमाची. १

म्हणुनीच हिला आली हो स्वर्गाची,
दिव्यता, शुद्धता साची.
किति बाळपणीं बसलों मी जवळीं तिचिया
सानंद गोष्टि ऐकाया.
मृदु शब्दांनीं जननी जें शिकवीत,
घटघटां कान हे पीत.
त्या बोलां नाहीं मोल,
हृदिं रिघती खोलच खोल,
तद्वर्णन करणें फोल.

अमृताचे ते मेघ जणों पाझरले,
मच्चित्त त्यांमधें विरलें. २
खाटेवर या कितिदां हृदयीं धरुनी,
शिकवी मजला प्रिय जननी.
बहु जीवींचें हितगुज तिजशीं केलें
प्रेमाचें हृद्गत कळलें.
सन्नीतीचे पाठ तिनें मज दिधले,
अंतरिं जे मुरले, भिनले.
धर्म नसे सत्यापरता,
ईश हाच अपुला नेता,
भाव हा धरावा पुरता;
मग केव्हांही लज्जित खालीं माना
लागेल न करणें कोणा. ३
या गोष्टींना कितीक वरुषें झालीं,
स्मृति त्यांची परि हृदिं ठेली;
जरि जादू ती अतां न पहिली उरली,
दिव्य भा सर्व मावळली;
जरि दृष्टी ती, भक्ती ती, अनुरक्ती,
ती सर्व मनोरथसृष्टी;
जरि आतां कांहीं नुरलें,
स्वप्नासम सर्व जहालें,
भौतिकें सर्व आक्रमिलें;
ही खाट जुनी पाहतां आठवे पूर्व,
हांसतें हृदयराजीव. ४

गोविंद पांडुरंग देवधर.

# मृत्युपत्र.

मी नामा कवि साधुदास, वसती हल्लीं तनू-पाटणीं,
जाती निर्गुण, गोत्र निर्मल, वयें निर्मेय, धंदा जनीं
साधूपासन; पाहुनी हळुहळू आयुष्यरेषा उणी,
मत्तेची मम मृत्युपत्र-कथनीं ही योजितों वांटणी. १
भूतांचे लघु अंश पांच, मन हें, ही बुद्धि तेणेंपरी
आत्मा आणि अहंकृती मिळुनियां मत्पिंड ये भूवरी.
देवाच्या दरबारचा अधन मी जासूद, मत्ता अशी
जैशी मेळविली तिला खरचुनी सोडूं पहातों तशी. २
धर्माच्या उदयार्थ जे झगडती घेऊनि हातीं शिरें,
जे राष्ट्रास्तव सोशितात शतधा आघात तेजें हिरे,
मद्देहांतिल भूमिरेणु असल्या निष्काम योग्यांचिया
पायांखालिं मऊमऊ पटघडया मी योजितों व्हावया. ३
नारींना प्रगतींत विघ्न करिते शूद्रादिकांना तथा
जी कां रूढि निशाचरी, कर तिचे छेदावया सर्वथा
पुण्यश्लोक विशेष यत्न करिती जे लोक रात्रंदिन
बाष्पीभूत जलांश मत्तनुंतला त्यांना करो मार्जन! ४
वक्तृत्वांत जयांस शब्द पडती भाषेंतले तोकडे,
येतांना कृतिचा प्रसंग पळतें यद्धैर्य कोणीकडे!
मद्देहांतिल तैजसांश हृदयीं ऐशा जनांच्या लुल्या
धैर्याचें कलम व्यवस्थित करो शक्तीपरी आपुल्या! ५
कोणाची कृति ही विचित्र नटली सृष्टी? कदा? कासया?
मिथ्या सत्यचि वा? असें न कळतें भांबावलेल्या जयां,

अव्यक्तांतुनि जो प्रतिक्षण! कळे मन्मानसालागुनी
मत्प्राणानिल त्यांचिया गुणगुणो कानांत तोच ध्वनि ! ६

दैवानें वधिली, जनें तुडविली, आप्तादिकीं गांजिली,
बंधूंनीं झिडकारिली, बहुपरी शेखीं शठें नाडिली,
एखादी अबला अशी नरक-सें वाटे जिला भू-तळ
आकाशांश तनूंतला मम तिला होवो लपाया स्थळ ! ७

आकाशासहि भेदुनी उसळती ज्यांच्या मतींच्या उडया,
ज्यांमध्यें मत-भेद घालुनि तिडे पाडून ठेवी कडया,
त्या साऱ्या जुळुनी सुसंगत-पणें सूत्रांत एका भली
माझे जोड-दुवे-पणें मन पडो सांधावया सांखळी ! ८

शास्त्राचा सदसद्विवेकमतिशीं येतां विरोध, क्षणीं
काळेंकुट्ट तमिस्त्र संचरतसे ज्यांच्या मनो-लोचनीं;
तद्वी-दीपशिखेपरि स्फुरुनियां ओसाड अभ्यंतरीं
होवो मार्गनिदर्शिका मम मती गाढांधसाभीतरीं ! ९

ध्येयाचा पथ लंघितां उचित जी अत्यंत सेवावया,
जी योग्या परि साध्य-सिद्धि-समयीं लोटूनियां द्यावया,
उंचीला चढत्या शिडीपरि अशी माझी अहंभावना
ही देऊनि महाजनांस करितों मी शिष्ट-संभावना ! १०

संकल्पात्मक-फोडुनी बुडबुडा जो जाहला शेवटीं
ब्रह्माकार, करूनि पंच मम त्या आत्म्यास कृष्णा-तटीं
मत्तेची निरवूनियां सकलही ऐशी व्यवस्था भली
सत्तेचा अनुरागरूप करितों शिक्का तयाच्या तळीं ! ११

साधुदास.

# क्रोध.

क्रोधा ज्ञानी पुरुष म्हणती अल्पकालीन वेड,
ह्या क्रोधाची लहर विझवी बुद्धिरूपी उजेड;
जीं कृत्यें जो मनुज करितो शांतचित्तें कधीं न,
तीं क्रोधाच्या सहज करितो होउनी तो अधीन. १

झाला क्रोधें विवश नर जो हारवी तो विवेक,
सभ्यत्वाचा त्यजुनि पथ तो दावि मौर्ख्यातिरेक;
होतां क्रोधाकुल नर करी दुष्ट कृत्यें अशंक,
तेणें लागे परिणतिवशें तद्यशाला कलंक. २

झाला क्रोधाकुल न गणितो पाप वा पुण्य वा हें,
युक्तत्वाच्या पळहि न उभा तो विवेकार्थ राहे;
झंझावातें जलिं ढकलिजे होडकें क्षुद्र जैसें,
तैसा क्रोधें पुरुषहि; तया राहवे स्तब्ध कैसें ? ३

बोले क्रोधें वच, गुरुस जें बोलतां ये न कामा;
सभ्यांसंगें कलह सजतो तो कराया रिकामा;
होतो क्रोधाकुल नर पिसा, क्रूर, निर्लज्ज, दुष्ट,
बोधाचें तो वच परिसतां होतसे फार रुष्ट. ४

कामक्रोधप्रभृति रिपु जे पीडिती मानवास,
त्यांतें धैर्यें हृदयिं चिरडा, द्या न वाढों तयांस;
रोधी जो हे नर रिपु सहा तोच शांतीस लाहे.
मान-द्रव्याहुनि शतगुणें शांतिचें मूल्य आहे. ५

विद्याधर वामन भिडे.

# स्वप्नभाषा.

भाषेचा अपुल्या विचार करितां, निद्रा सखी वेंघली;
स्वप्नानें मग लीन वृत्ति चळली, सृष्टी नवी रेंखली.
स्वप्न स्पष्ट विचित्र गारुड करी, घाली मनाला भुली,
युक्तायुक्त–शुभाशुभादि गुण ती भासूं न देई मुळीं. १
नाना खेदविनोदबोधक पट स्वप्नें तदा काढिले;
केंव्हां चित्त खुले प्रसन्न, अथवा केंव्हां पडे तें ढिलें.
ऐशा चंचलतेंत एक दिसली कोणी मला सुंदरी,
ती म्यां ओळखिली, प्रयत्न करुनी, कीं जन्मभाषा खरी. २

बोलें मी तिजला: "अगे जननि, कां चर्या तुझी पालटे ?
होवोनी सरलत्वलोप, चढले कां चोचल्यांचे छटे ?
पूर्वीचे नग भारदस्त सगळे कां झाकुनी टाकले ?
कां वैदेशिक अश्मकाचमणि हे अंगावरी फांकले ? ३
झाली अंधुक शुद्धभक्तिसरिता ती ऊर्ध्वदृष्टी पुरी,
दावोनी नखरा नवीन जडली कां ही पदीं नूपुरीं ?
आकाशामधुनी स्खलून कवळी आकाशगंगा क्षिती,
तेंवी तूं परमार्थहीन दिससी या भूतला लक्षिती. ४
त्वां वेदान्तरते ! यथेष्ट वरिलें जें एकमार्गीपण,
पौराणीक कथांतही स्थिरविलें तें सर्वदा धोरण;
आतां कां मग ऐहिकांत गुतशी, संसार विस्तारशी ?
कां बाई ! विषयांत तूज जखडी ही मायिकांची रशी ? ५

ज्ञानेशें शुभ अक्षरांत लिहिला जो एक कित्ता पुरा,
जो नाथादि कवीश्वरीं गिरवितां वे वज्रलेपा पुरा,
जो सातीं शतकीं ढळे न, गमला जो उत्तरेचा ध्रुव,
ज्याला संतत संत, सुज्ञ, नमले तैसेच योगिब्रुव; ६

तो त्वां बाजुस टाकिला, दडपिला, घालून त्याची घडी,
थाटानें वळणें नवीं गिरविशी, जीं वांकडीं रांगडीं;
पेशा हा न तुझा, न पूर्वजपथा सांडून शोभा दिसे,
नेई खास अधोगतीस असलें हें आत्मघाती पिसें. ७

ज्ञाना झांकुनि अर्थशास्त्र भंवतीं पेरी तुझ्या साखर;
लावी वेधहि राजकारण तुला, जें दुर्विकाराकर;
लोभाची मकरी गिळंकृत करी वैराग्यरत्ना खरी;
डोळे झांकुनि चाटिशी खर शिला, मानोनियां भाकरी. ८

वाटे तो तुकया कयास चुकला, भंगे अभंगी कवी;
सामर्थ्यास समर्थ निस्पृहपणें आतां न वा दाखवी;
मोराचा न कला-कलाप रसिकां विद्यारतां वा रुचे;
घेती आज कवी नवीन पदवी, तेजें सखे वारुचे ! ९

वेडाचें कविकाव्यबीज अधुना बाई ! जनीं गाजतें;
वेडाचे बहुत प्रकार दिसती हे भोंवतीं माजते;
केव्हां भ्रांति पडे, न कोण निवडे वेडा-शहाणा नवा;
बाई ! हा भ्रम मानवे परि तुला, नाहीं मुळीं वानवा. १०

ओंवी ओस पडे, अभंग मुरडे, दिंडीस थंडी जडे,
वृत्तें धिंडवडे सहाति निधडे, धाकून साकी दडे;

हा संगीत नवीन रंग चढला, झालीस तूं नाचरी,
थै थै थै नटसी, पटापट पदें घोंटाळुनी चांचरी ! ११

शृंगारास अपूर्व पूर चढला, त्याला नसे आवर,
शांतीच्या मुखचंद्रम्यावर जडे पंकप्रदोषें थर;
ग्राम्यत्वांत विनोद हा फुगतसे, जैसा घृतीं घीवर;
नीती भीतिस घे, मुखास बुरखा लावी, न पाही वर ! १२

दावी प्रस्तुत हें भविष्य, भरवी अंगांत जें कांपरें;
दोषांचीं गळकीं शिरीं मिरविशी कां हीं बये ! खापरें ?
लज्जा-दुःख-विषाद हे भडकुनी मी अंतरीं कालवें,
दाटे कंठ, लुली पडोन रसना गे ! वैखरी मालवे." १३

हे बोल श्रवुनी, सखोल करुनी ती नेत्र एक क्षणा,
हांसोनी दुसऱ्या क्षणा, मज शिरीं स्पर्शे जणों रक्षणा;
बोले वेधक, चित्तभेदक, परी सौम्य स्वरानें मला,
" बापा ! प्रस्तुतचा प्रसंग विधिनें प्रेमें गमे नेमला. १४

मिथ्या कल्पुनियां विकल्प नुसते तूं अंतरीं शीणशी;
शांती चेतिवितां विवेक, विकृती जाळील तो हीणशी;
तूं, कोंटाळुनि दुर्ग्रहास, म्हणसी, सत्यास संपादिन;
सूर्या रात्रि नसे, कदापि न दिसे अंधास बापा ! दिन. १५

' जैसा देश, तसाच वेश–' म्हणती, नाहीं परी तें खरें;
' जैसा काल, तशीच चाल–' समजें हें तूं त्वरें तत्त्व रे !
जो राहील कुढा जुना नवयुगीं, निर्जीवसा तो ठरे;
घे चित्तांत विचार सार, न करीं हा वांकडा ओंठ, रे ! १६

वेडया ! जें गत, तें मृतांत गणतें; मी का असें त्यापरी ?
मी प्राप्तव्यवहारसाधनकरी जीवंत वाहें झरी.
' जीवद्योतक हालचाल असते–' बापा ! धडा हा पढें !
सारें विश्व पुढें पुढें वर चढे, मी काय होऊं मढें ? १७

पूर्वीचे गुण, आजचे अवगुण, प्रेमें मनीं घोळशी,
तेणें तूं चकुनी, कुतर्क भकुनी, या गुंतलाशी फशीं.
संकोचा वरितां, कलंक नयना भासे, न भासे शशी;
पेटो उज्ज्वळ दीप, चक्षु मिटितां वांध्यास येते मशी. १८

तत्त्वें पूर्विल तीं जशीं, नव तशीं आहेत रे ! आणिकें;
ज्यां संबोधिसि अश्मकाचमणि, तीं रत्नें, हिरे, माणिकें.
नाहीं मी परिपूर्ण, दोष बहुधा माझ्यांत आहेत, गा !
' कालौघांत विशुद्ध होइन,' अशी आशाच जीवा लगा. १९

जें माझें कथिलें, गणून गुणसें, त्वां एकमार्गीपण,
एकांगीपण तेंच, दोष असला डोळीं खुपावा कण.
एकांगीपण तें झुगारुनि दिलें म्यां, हें गमे सौरस;
हा लोकव्यवहार चौरस दिसे, मी कां नको चौरस ? २०

वेदान्त व्यवहार यांत बघसी तूं बे-बनावास कां ?
सांडी जो जगतास, शून्य कवळी, वेदान्त तो नासका.
न्यायार्थीं झटणें झिजूनहि, नसे जो ग्रासिलें अन्तकीं,
शीलानें व्यवहार पार करणें, हा सत्य वेदान्त कीं. २१

रे ! वेदान्त खरा भरारत नसे सोडोनियां भू-तला;
मोठया युक्तिकरीं परी उकलितो दिव्यांश तो भूतला.

मिथ्या देह असो, अनर्थखनि हा बाधो अजा अन्यथा,
वेदान्त्यासहि पाहिजेच तरि तो वेदान्त जाणावया ! २२

साजे देह अनेकधा अवयवीं, जे सर्व आवश्यक;
आत्म्याला किरणें तशींच असती, जीं दिव्यता-पोषक.
सांधा हीं किरणें ह्मणें बसविती स्वर्लोक–भूमीतलां,
यात्रा ऐहिक या प्रकाशकिरणीं होते शर्मे शीतला. २३

जैसें घर्षण–ताप–ताडण-बळें हेमत्व घे व्यक्तता,
जीवा घर्षण–ताप–ताडन तसें आत्मत्व दे तत्त्वतां.
जें तूं कल्पिसि निष्क्रियेंत सुख, तो आहे नकारभ्रम;
साकारांत नकारता मज दिसे बाळा ! चुकारासम. २४

' अर्थीं थोर अनर्थ वागत असे,' वाटो खरें हें वच;
'अर्थावांचुनि राष्ट्र नष्टत असे,' हेंही मनीं ठेवच.
लोकीं स्पष्ट दिसोनि येत असतो राजा–प्रजा भेद हा,
सांडूं मी मग राजकारण कसें ? सुज्ञां विचारीं दहा. २५

शास्त्रीं भौतिक सौख्य सोय वसते, नाहीं मुळीं वानवा;
शास्त्रें सृष्टिरहस्यही उघडिती ज्ञानप्रिया मानवा;
आश्चर्यें बघतां निसर्गरचना नम्रत्व येतें तया;
नम्रत्वें शुचिभक्तिहेतु कळते सर्वेश्वराची दया. २६

प्रेमानें भरला, दयेंत मुरला, विद्यासुखीं गुंगला,
कीं शास्त्री निज भानही विसरला, तत्त्वामधें दंगला,
तो साध्या नयनांस भासत असे विक्षिप्त वेडा जन,
वेडे हे परि गा ! कृति प्रसविती जी होय दिव्यांजन. २७

कांहीं मत्सुत हे विनोद करिती केंव्हां जरी फाजिल,
मानीं तीं क्षणिकें विवेकसलिलें झालीं मुला ! पंकिल.
जातां वादळ, शांत डोह विलसे, जो काकडोळ्यासम,
त्यामाजी गुणही अपूर्व दिसती, ते राहती कायम. २८

पृष्ठीं मात्र तरंगणार कचरा तूं आजला पाहसी,
रत्नांना दडल्या सखोल बघतो ज्ञानें श्रमें साहसी.
माझी आंग्लसखी अखिन्नवदना, ती मत्प्रिया आचरी,
तीसंगें नव रंग मी वरितसें, वृत्ती न ही नाचरी." २९

ऐसे बोलुनि बोल, होय सहसा, अंतर्हिता माय ती;
गेली ती, पण तत्क्षणींच मजला ये जागृती आयती;
निद्रा मुद्रण विस्कटून घडवी ती चक्षुरुन्मीलन,
तों त्यांना दिपवी सतेज बनलें हिंदाङ्ग्लसंमीलन. ३०

बा. अ. भिडे.

# संसाराचें सप्तांकी नाटक.

विश्वाची विधि कौतुकें करितसे ही नाटयशाला महा,
ताराचित्रनभःपटीं रविशशी लावी दिवे हे पहा;
पात्रें स्त्री नर आणितो सजवुनी भूरंगभूमीवरी,
दावी संसृतिनाटय हें करवुनी देवांप्रती श्रीहरी. १

नाटयाच्या **प्रथमांकि** येइ जननी बाळा करीं घेउनीः
प्रेमें हांसवि, खेळवी, रडविही त्यातें बळें चुंबुनी;
अंकीं घेउनि पाजुनी समजवी हर्षाब्धिमध्यें बुडे,
होतां बाळ सुशांत सस्मित बघे त्या वीरमातेकडे. २

राष्ट्रोद्धारक बाळ हा चिमुकला अत्यंत चाळे करी,
या हेतूस्तव ठेवि वीरजननी त्या पाळण्याभीतरीं;
झोंके देइ वदे मुखें मधुरशीं गीतेंहि निद्रेस्तव,
राहे तो परि मग्न राष्ट्रमननीं त्या ये न निद्रा लव. ३

..........................................

पाटी पुस्तक घेउनी झरझरा जाई **द्वितीयांकि** हा,
शाळेमाजि शिकावया तळमळे जो एकपाठी पहा;
आज्ञा पाळितसे स्तवार्ह गुरुची मातापित्यांची सदा,
खेळे खेळ मुलांसवें समपणें प्रेमें, न कोपे कदा. ४

..........................................

तो अंकीं तिसऱ्या पुरें करि महाविद्यालयीं शिक्षण;
झाला पण्डितमान्य सुंदर सभेमाजी करी भाषण.

संपादी बहु लेखनीं चतुरता, काव्यांतही पोहला,
ऐसा सुंदर हा युवा गुणवती भार्येसवें रंगला. ५

..................................................

लाडें झोंबति तत्तनूसि चवथ्या अंकीं तयाचीं मुलें;
मातेसन्निध घोळती मधुरशीं ओच्यांत जैशीं फुलें.
ओच्यामाजि दडे, कडेवरि रडे, धांवोनि कोणी पडे,
वाढे शुक्लकलेपरी शरदिंच्या संसार चोंहीकडे. ६

..................................................

स्वार्थत्याग करी, स्वदेह झिजवी तो पंचमांकामधीं,
राष्ट्राचे हितसाधनार्थ अपुलें आयुष्य खर्ची सुधी;
वाग्युद्धांत पडे, यथाबल लढे, तें अंतिं जिंकीतसे;
राष्ट्रामाजि अहर्निशीं झटुनियां चैतन्य आणीतसे. ७

..................................................

तत्त्वग्रंथ रची कुशाग्रमति तो षष्ठांकिं विख्यातसे,
ज्यायोगें विचरे सुकीर्ति भुवनीं, लोकीं चहा होतसे;
तो बांधी सुरमंदिरें सुरुचिरें, धर्मार्थ धर्मालयें,
विद्येचीं बहु मंदिरें सुबकशीं, विस्तीर्ण रुग्णालयें. ८

..................................................

नेत्रीं अल्पहि सप्तमांकिं न दिसे, कानींहि ऐकूं न ये,
काठी टेंकित चालतां हळु हळू गात्रांप्रती कंप ये;
घोळे राष्ट्रविचार तन्मनिं जराजीर्णांग झाला तरी,
संसारान्तिं शिरे सुखें यमपुरीनेपथ्यिं हा केसरी. ९

गंगाधर गोविंद दामले.

# मृत्यूस ! *

जाती तीव्र दवानलांत जळुनी बालद्रुमांच्या तति,
संशुष्क प्रखरांशुभैरवकरीं होते प्रसूनावलि;
मेघाचे नवमौक्तिकाभ सुकती व्योमींच बिंदुव्रज,
होतो शून्यविलीन तारकगण स्निग्ध, प्रभातीं क्षणें ! १

झाला जन्म न तोंच तापवलिता संसारदावस्थला
सोडोनी सहसा विलीनच परंज्योतींत जो होतसे
तो लोकीं बहुभाग्यवंत; मज कां तें भाग्य नाहीं प्रभो ?
या दीनास सदैव दुर्वह मनस्तापांत कां जाळिसी ? २

वांछा अल्पहि पूर्ण होत न कदा, नैराश्य वाढे सदा,
नाहीं सौख्यलव क्षणैकहि कधीं या दुर्भगा लाधला !
चिंताविव्हल तीव्रदुःखगरलव्यामूढ होऊनि मी
मृत्यो ! शांतिनिकेतना ! करिं तुझें सोत्कंठ मार्गेक्षण ! ३

—रेंदाळकर.

*रेंदाळकरांची बहुतेक ही अखेरची कविता असावी. अनेक औषधोपचार वगैरे करूनही कांहीं गुण येत नाहीं, तेव्हां मृत्यु लौकर येऊन हे हाल चुकतील तर बरें, अशा मनःस्थितींत त्यांनीं ही कविता लिहिली आहे.

रेंदाळकर हे मराठींतील निर्यमक कवितेचे आद्यप्रवर्तक आणि पुरस्कर्ते होते. तेव्हां त्यांची ही निर्यमक कविता अर्वाचीन कवींच्या काव्यसंग्रहांत प्रसिद्ध होणें युक्तच होय.—संपादक.

# वनवासाचीं सुखें.

( चाल-'दो दिवसांची तनु०' इ. फटक्याची. )

( १ )

अहो, तयाला मनुजसुखाचें अवघड कोडें उलगडलें,
त्याचें जीवित इतरांहुनि अति सुखमय जयवंतचि घडलें;
इहलोकांतिल सुखरत्नांच्या त्यास मिळाल्या जणुं खाणी,
जीवनचरित तया धन्याचें मी अभिलाषें वाखाणीं.
ठेलाठेली, प्रचंड कलकल, घडामोड ती शहराची,
दूर राहिली जेथुनि भीती खल-सर्पांच्या जहराची;
अशा ठिकाणीं–निसर्गहृदयीं–जिथें उपाधी नहि कसला,
जाउनि तेथें निवृत्त निवडक रसिकांसंगें जो वसला;
वनवासांतिल शुद्ध सुखांच्या अमृताचे जो घे घुटके,
नागरिकांचें जीवित, वैभव, सौख्यहि त्याजपुढें लटकें.

( २ )

तिथें बंगला त्यास नको तो शिल्पकलेचा जरि नमुना,
कीं, तद्द्वारें शठौघ-रूपी लोटति वमनें पुन्हां पुन्हां.
येती, साखर पेरिति, नाडुनि जगांत निंदाया जाती,
उपकारांची फेड म्हणोनी देती अपकारचि हातीं.
ही मैत्री, हा शिष्टाचारहि नको तयाला नगरांचा,
समदुःखाचा अश्रुपातही नको तयांतिल मगरांचा,
नको तयाला कलाबतूच्या वेलबुट्यांचा झुपक्यांचा
झगझगणारा झगा तनूवर शरत्प्रभेच्या भपक्याचा.

अवजड असतां झगाझोक तो मूर्खचि वाहो बहुमानें;
शतमूर्ख-सभा सभोंवतींची बघो झगा तो अवधानें !
चिंता नाहीं त्यास न आला दिगंतराहुनि नजराणा
बहुविध उंची मेवा, हलवा, आणि मिठाई व किराणा.
नकोत त्याला सुपदार्थांनीं उताटलेलीं तीं ताटें,
मरण आणिलें खा-खा-खाउनि तरिहि समाधान न वाटे !
नकोत त्याला ते पेले बहु-मोल मधूनें भरलेले,
पितां पितां जे अगणित मेले तरिहि राहिले तान्हेले !
नको तयाला तारामंचक, शेज पिसांची मखमाली,
त्या शय्येमधिं गडले त्यांना झोंप सुखाची नहि आली.
नसती-चिंता-विवंचना-ही तींत इंगळी जणुं शिरली,
न सुचे, तळमळ करितां त्यांची निशा प्रभातांतुनि विरली !
विषयरतांचीं स्वप्न-सुखें हीं जरि वरकान्ती रंजविती,
तरि तीं चकवुनि त्या सकलांना सत्य सुखाला अंचविती.
सुमुख सुखाचें दिसतां असतें हृदय वेदनाकुल दुखरें !
वेळ तयांचा सर्व रिता तो उल्हास न दे वा न सरे.
हें दुःखित सुख, खिन्न हर्ष हा, बहुजनतेला जरि झुलवी,
नको तयाची बेचव चव ती पारख्यास त्या नच भुलवी.

( ३ )

विपिनविहारी रसिक ! खरोखर शांति जयाची वश-दासी;
सत्त्वपूर्ण तें जीवित, त्याचें मूल्य कळेना इतरांसी.
सर्व निराशा आणि दुराशा यांपासुनि तें दुरावलें,
समाधानधन-वंत अहो, तें पर्णकुटींतुनि विसांवलें.
निसर्ग अपुल्या औदार्याची करितो चंगळ ज्या सदनीं,

सहजचि उमटे विमल मनाचा विशद हर्ष तो ज्या वदनीं;
परोपरीचा भाजीपाला, कंद, मूल, फल आणि फुलें,
ज्या समयीं जीं निघती, दिसती तया आश्रमीं तीं विपुलें.
वसंतकालीं सभोंवतालीं कुसुमित होउनि आश्रम तो
वासंतीचा निवासकुंजचि रसिक जनाला त्या गमतो.
ग्रीष्मार्काचें लाल भडक तें तेज तळपतां भंवतालीं,
संतसमागमसम सुखशीतल त्यास झोंपडी ती झाली.
वर्षाकालीं इंद्र उतरतां भूवरि जलधाराकरवीं[1]
इंद्रभुवनसें उटज नटे तें शचीवनश्री ती हिरवी.
शारदसमयीं दिन कनकानें रजनी सजतां रजतानें,
देखावा त्या वनाश्रमाचा न वानवे कवि-कवनानें.
त्या वनवासी जनास सुखवी शीतकालही नहि बाधे,
लागति अतिशय रुचिकर सारे पदार्थ त्याचे जरि साधे.
पर्णकुटींतुनि धगधग करिते, अंतर देई न शेगडी,
तेणें भासे निवास साचा हाच जिवाचा परम गडी.
सतत वनश्री करि नयनांचें आणि मनाचें रंजन कीं,
जनरंजनकर भरला तींतुनि आत्मा-राम निरंजन कीं!
जंगल रंगी, चित्र फुलेले, अमृतझऱ्यांनीं न्हालेले,
ते गिरि दिनभरि अज मेषांच्या शब्दें नादित झालेले,
दुधाळ, तुंदिल तीं खिल्लारें लवणांमधुनी जीं फिरती,
यथेष्ट चरती, रवंथ करीती, वत्सलतेनें हंबरती,
फुल्ल कण्हेरी आणि लव्हाळे यांनीं जीचे तट सजले,
ती वनगंगा समंत जीच्या संतत घोषें गजबजले,

---

१ जलधारांच्या रूपानें.

गंध-तृणांच्या[1] शय्येवरि, वा बकुलाम्रांच्या छायेला
पडतां सालस जन अजगरसा लांबवुनीयां कायेला,
हां हां म्हणतां तयास आणी निज जादूनें जी गुंगी,
भृंगततींची गुङ्गुङ्नादें गुंगविणारी ती पुंगी,
नयनमनोरम ते देखावे, घुमटाकृति त्या तरुराजी,
टिपेवरी ते कोकिल गाती कुंजकूजनहि ज्यांमाजीं,
अंधुक गुंफा, दिव्य–बिलोरी–कमलाकर, वा सरोवरें,
संगीतासह घेउनि येती अमृतचि भूवरि असे झरे,
केवल मौजा या रमवाया तत्पर असती वनवासीं,
यास्तव होती खरे रसिक जन येथें सुचिरंतन वासी.
याच ठिकाणीं साधें भोळें सत्य निरंतर तें वसतें,
याच ठिकाणीं निरुपाधिकसें जें सालसपण तें असतें,
अकलंकितशा सौंदर्याचें दर्शन तेंहि इथें घडतें,
मोडकळीला न आणिलेलें इथें तरुणपण बागडतें,
इथेंच दिसती अल्पानंदी सहनशीलसे कामकरी,
चढाओढ कीं चुरस वसेना वनवाशांच्या श्रमान्तरीं,
आरोग्यानें सदा प्रफुल्लित वदनें दिसती या ठायीं,
अचिन्त्य-चिंतन घडतें येथें प्रशांततेच्या अनपायीं.
किंबहुना जें सुख कवि कल्पिति, जेंहि विराजे तत्कवनीं,
अवनीवरि तें वनींच मिळतें, नलगे जाया माघवनीं[2] !

( ४ )

तीं राष्ट्रांचीं तुंबळ समरें, तीं चटणी संस्थानांची,
हीं खटली तों अभिमानाचीं सुकुटिल कारस्थानांचीं.

१ रोशेल नांवाचें सुगंधी गवत. २ नंदनवनांत.

ह्यांनीं व्यग्र न होई जो जन दूर पळाला जगांतुनी,
आणि राहिला प्रशांत कुसुमित एकांताच्या नगांतुनी;
दिनानुदिन तो महिनोमहिने अशा क्रमें बहु वर्षभरी
वसोनि तेथें सृष्टिसंगतीं तिचीं प्रवचनें श्रवण करी.
प्रतिरूप तिचें कुतूहलानें निरखुनि तें तो गौरवितो,
सुमधुर उत्कट भाव तिचे तो अंतर्यामीं अनुभवितो;
उदार हस्तें ती जें देते तें संतोषें ग्रहण करी,
आणि न केव्हां अधिकासाठीं लोभी होउनि हांव धरी.
पहिला मोहर, पहिली कलिका वसंत ऋतुच्या आगमनीं
रत्नापरि झळकतां बघे तो उपजुनियां अनुराग मनीं.
सीत्कारांनीं प्राशन करितो हितकर झुरके पवनाचे,
तेणें अभिनव आनंदानें त्याचा आत्मा जणुं नाचे;
नैसर्गिक जे समय हितावह पूर्णपणें ते उपभोगी,
भोगी असतां निसर्गरामीं रमला योगी तो योगी!
त्या रामाच्या सुंदरतेनें जें जें सुंदर–खुलणारें,
त्याच्या प्रेमें घमघमणारें गमे रामसें तें प्यारें.
जागोजागीं तटस्थ राही, विमूढ नयनीं तो पाही,
जीवात्म्याचें जगदात्म्याशीं हें संभाषण कां नाहीं?
निदाघकालीं संजीवनकर सांवलींत तो विसांवतो,
आणि वाचितो प्रभुमहिमा शत-कोटि पदीं जो न मावतो.
वाल्मीकीच्या अमृत-मानसीं ज्याची पडछाया पडते,
श्याममूर्तिचें दर्शन त्याला त्या घन छायेमधिं घडतें.
लिहितो जें ती मूर्ती सुचवी, जें तो होई अनुभविता,
तेंच होतसे प्रेमरसानें थबथबणाऱ्या तत्कविता!

सभोंवतींच्या वनस्थलांतुनि जातो केंव्हां विहराया,
नित्योत्साहचि, तन्नयनीं नव हर्ष लागतो झळकाया.
जेंव्हां शारद रवी जगांतुनि तो सोनेरी रंग भरी,
आणि कापणी-करितां निघती विळे घेउनि शेतकरी,
तेंव्हां पाहुनि महोत्साह त्या सर्वांच्याही मुखकमळीं,
त्याच्या हृदयीं येते बहुविध सात्विक भावांना उकळी;
दिनावसानीं मंद उन्हांतुनि मौज तयांची तो बघतो,
हर्ष-तरंगीं रंगुनि सुमधुर गुंजगानही तो गातो;
त्याला वर्षा, शीतकाळही मवाळ, देती दिव्य सुखें;
त्यांचीं वाचन, चिंतन, लेखन, असति साधनें हीं प्रमुखें;
प्रचंड वादळ, विजा, गर्जना, गारा, मुसळासम धारा,
हिमपतनावधि थंडी, अथवा खारा गार असा वारा,
हे नैसर्गिक पालट जेंव्हां प्रलय मांडिती बाहेरी,
तेंव्हां बसतो निजाश्रमीं तो गभीरतेच्या माहेरीं.

( ५ )

विश्वरूप तें जगदीशाचें महा भयंकर दिसणारें,
शक्ति अतुल ती जिच्यापुढें हो लीन मानवी बळ सारें;
प्रकोप दारुण, परी तयांतुनि सुमधुर ममता आणि दया
समरस होउनि तुडुंबलेली, अमृतमिषें जी ये उदया;
महौदार्य तें तत्त्व.जयाला एकचि 'समता' हें कळतें,
करोनि सगळें सुपीक भूतल जें जयघोषें खळखळतें,
जी कर्कशता पिंपळपानां-सम सकलांना थरकविते,
तीच तयांना किती सत्त्वमय पदार्थ देउनि हरखविते !
अज्ञेयाचे अगम्य हेतू, ती नियमांची सुयंत्रता,

जगतें, दुनिया वश ठेवुनियां स्वयें तयाची स्वतंत्रता,
किति रीतींनीं सु-सेविलेला, किति नामांनीं जपलेला,
सु-चिंतिलेला, आळविलेला, जिथें तिथें तो लपलेला,
अज्ञानाला दूर, परी तो ज्ञानाला किति किति जवळीं !
योग तयाला होउनि विलगे, परि भक्तीला तो कवळी,
भिन्न धर्म वा पंथ, मतें तरि सर्वांच्या अनुयायांचें
अनन्य अंतिम तोचि. जलांचे ओध जलधिला जायाचे.
ज्याचा महिमा गातां गातां दुर्बल वाणी ही हरते,
परंतु त्याचें गुणसंकीर्तन अनंत कीं तें ! नहि सरतें.

( ६ )

वादळ संपुनि जंव तारागण चमके सुविमल गगनांत,
तंव विलसोनी अशेष त्याची चमक तदुन्नत नयनांत,
विचार ऐसे प्रगल्भ येती तदन्तरालीं त्या समयीं,
वृत्ति तयाची होउनि राहे केवळ सात्विक तत्त्वमयी.
जिवलग मित्र, ग्रंथ तयाचा वेळ न जाऊं दे वायां,
ज्ञानार्जन तो करोनि लागे प्रगति मनाची सेवाया.
विमुक्त होउनि काव्य-कल्पना त्याची विश्वांतुनि विहरे,
अथवा प्रगटे पुढें तयाच्या दिव्य सत्य जें खरें खरें.
समुन्नतीच्या शिखरावरि तो-तो जीवात्मा करि वसती,
अंतर्हित जे प्रभाव त्याचे दृष्टिपुढें ते मग दिसती.

( ७ )

यापरि केवळ आत्मसुखोन्नति यांच्या लागुनि फांसेला,
तो स्वजनांच्या स्वबांधवांच्या तिलांजलि न दे आसेला;
अझुनि वसे त्या गृहस्थ-हृदयीं प्रीति तयांची कळकळ ती,
तदाऽश्रमांतुनि सुखावलेलीं मुखें तयांचीं आढळती.

प्रौढ जोडपें परस्परांना सविनय नयनीं तें निरखी,
तत्प्रेमाला हिमकाळांतील गोड उन्हाची ये सुरखी.
पडती दृढतर गळ्यास त्याच्या बालकरांचे ते वळसे,
प्रसन्न करिती चिमणे वक्ते बोलुनि भाटचि केवळसे;
अध्यक्षांना त्यांच्या दिसऊँ भाषण सर्व दिखाऊ तें
तरि वक्त्यांना पारितोषिकें म्हणुनि वांटिती खाऊ ते.
आनंदाच्या परिपोषास्तव मधुनि मंडळी जमवितसे,
आणि रमुनि तो लघूत्सवांनीं सहवाशांना रमवितसे.
प्रेमळ कीर्तन, कधीं पुराणचि, भजन कधीं वनभोजन दे,
केंव्हां रुचिकर पानक बनवुनि मनें मिळाया तो जन दे.
कारण, सत्सुख तत्त्वज्ञानहि ज्यांची आवड, चाड जनीं,
न तीं विदेही दर्शेत मिळती समाधिमाजि न तीं विजनीं.
तीं शांताचीं, जनप्रियाचीं, रंगेलाचीं भावंडें
असुनि तयासह अखंड वसती. हें न वदें मी पाखंडें.*
वदन सदन जें प्रसन्नतेचें, हृदय सदय जें वचन सुधा,
कार जयाचा परोपकारचि कवण न मानी त्या विबुधा ?
हें तज्जीवन-चरित अहो ! जे अन्यायांनीं पिडलेले,
कसलें त्यांना ! जे अन्यायी तापद नगरीं गडलेले ?
सुविमल जीवन भोगित होते हेंच पुरातन आर्य-मुनी,
जेंव्हां श्रीहरि त्यांसह वसले सीताराम-मिषें रमुनी.

चंद्रशेखर.

* " संपूर्णं जगदेव नंदनवनं सर्वेऽपि कल्पद्रुमा
गांगं वारि समस्तवारिनिवहः पुण्याः समस्ताः क्रियाः ।
वाचः प्राकृतसंस्कृताः श्रुतिशिरो वाराणसी मेदिनी
सर्वावस्थितिरस्य वस्तुविषया दृष्टे परे ब्रह्मणि ॥ " आचार्याः.

# मातेस्तव व्हा सिद्ध मराया.

मरणांत खरोखर जग जगतें !
अधि मरण, अमरपण ये मग तें ! ॥ ध्रु० ॥
अनंत मरणें अधीं मरावीं,
स्वातंत्र्याची आस धरावी,
मारिल मरणचि मरणा भावी,
मग चिरंजीवपण ये बघ तें ! मरणांत खरोखर जग जगतें ! १
सर्वस्वाचें दान अधीं करिं,
सर्वस्वचि ये स्वयें तुझ्या घरिं,
सर्वस्वाचा यज्ञ करीं तरि,
रे स्वयें सैल बंधन पडतें ! मरणांत खरोखर जग जगतें ! २
स्वातंत्र्याचा एकच ठावा
केवळ यज्ञच मजला ठावा !
बद्ध जनाचा यज्ञ विसावा !
यज्ञाविण कांहीं का मिळतें ! मरणांत खरोखर जग जगतें ! ३
सीतासति यज्ञीं दे निज बळी
उजळुनि ये सोन्याची पुतळी !
बळी देउनी बळी हो बळी !
यज्ञांत विश्व बघ धगधगतें ! मरणांत खरोखर जग जगतें ! ४
यज्ञ करा स्वातंत्र्य मिळाया,
सर्वस्वाचें दान करा, या,
मातेस्तव व्हा सिद्ध मराया !
बडबडुनि मागुनी का मिळतें ? मरणांत खरोखर जग जगतें ! ५

भास्कर रामचंद्र तांबे.

# पंचप्राणांची पूर्णाहुति.

( संपन्नतेच्या रामराज्यांत सुद्धां दुष्काळाचा वनवास घडतो. )

उत्कंठेची सीमा झाली आतां यापुढती,
आशेचाही अंत जाहला या दुर्बल चित्तीं !
आनंदाचें वारें कुठलें आतां या नशिबीं !
परिचित झाली या हृदयाला सौख्याची गरिबी !
ओळख नाहीं मुळिं हास्याची पूर निराशेचा
आला, झाला हार गुंफुनी तयार अश्रूंचा !
आयुष्याच्या खडतरतेचा कडेलोट झाला,
दीन मनाच्या शून्य दृष्टिला विषयहि मुळिं नुरला !
पहावयाचें आतां कांहीं नुरलें या जगतीं,
'मनोहरा'च्या मना मस्तकीं लाव्रि मृत्यु-विभुती !

❦ ❦ ❦

नैराश्याच्या भेसुर असल्या जळत्या आगींत
प्रभुराया ! दे एक तरी चिर शांतीचा स्रोत !
विषण्णतेच्या भयाण भीषण या अंधारांत
अंधुकशी तरि, देवा ! दे रे समाधान-ज्योत !
सर्वस्वाची आहुतीहि घे दुर्दैवा आतां !
पंचप्राणांची पूर्णाहुति घ्या जीवन-नाथा !

'मनोहर.'

# जुळे भाऊ.

[ चाल०—" धन्य शिवाजी०"]

( पुष्पसृष्टीकडे खालील दृष्टीनें पाहणें अरसिकतेचें असेल कदाचित्; पण अशी वस्तुस्थिति पुष्कळ वेळां पहावयास सांपडते मात्र. )

निशिगंधाचा कंद बहरला उपवनकोनांत,
सुगंध सुटला अणुरेणूंतुनि शीतल पवनांत;
मनमोहन नव मुग्ध कळ्यांच्या प्रभावळीमाजी
उठुन राहिलीं, दोन उमललीं फुलें मधुर ताजीं;
फुलें नव्हे तीं, कुलकीर्तीच्या तुताऱ्याच दोन,
किंवा पूर्वजपराक्रमांच्या पताकाच जाण;
फुलें पाहुनी खुले न ऐसा कुठें हृदयकोन ?
डुले न अथवा झुले न ऐसा उदासीन कोण ?
हरित कांतिवरि होइ खुलावट शांत धवलिमेची
गगन-नीलिमेवरी कोर जंव विधुची चवथीची;
अलिकुलमाला झुले तयांच्या तिथें भोंवतालीं,
स्तुतिकवनांना सुकविजनांच्या श्रीमंती व्याली.
श्रीमंतीच्या बंदिजनांच्या स्तुतिच्या गीतांनीं
सत्यान्वेषी सखी कवीची जागृत होवोनी
सौदामिनिच्या चंचलतेनें, विधुच्या दीप्तीनें,
कादंबिनिच्या सहृदयतेनें, रविच्या प्रतिभेनें,
निजहृदयाच्या सारंगीच्या तारा छेडोनी
गाउं लागली सखी—सृष्टिसति—संसृतिच्या सदनीं ॥ १ ॥

"या मातेच्या एका उदरीं जनन उभयतांचें,
भिन्न दिशेला वदन असें कां एकामेकांचें ?
तुम्ही उभयतां तेजस्वी हो कुलदीपक साचे,
छत्तीसांतिल तीन सहांचें वैर धरायाचें—
काय प्रयोजन खुल्या दिलानें सांगा तें मातें
परस्परांचें मुखावलोकन टाकियलें कां तें ?
समान सद्गुण, समान वैभव खुपतें नयनांत,
परोत्कर्ष कां सहन न होई तुमच्या चित्तांत ?
समानशीलें सख्य जमावें जीवाजीवांत,
परि संचरतो कुचित्तकुहरीं नीचवृत्ति-वात;
सुगंध सुटला तव हृदयींचा—म्हणूं सद्गुणांचा,
दिसे वर्तनीं वैरभाव परि कुचक्या वृत्तीचा ;
पाठीवरती पाय देउनी आलां जगतांत,
पाठ फिरवुनी वर्तावें कां अनुजानें येथ ?
सरिदोघांनीं दोन दिशांनीं येउनि एकांत
प्रेमभरानें मीलित व्हावें भूषण हें खचित !
तुम्ही उभयतां कुलभूषण हो एका सदनांत
भिन्न भावना धरितां, हा कां बंधुभाव उचित ?
भृंग गाति ते पोवाडे नच तुमच्या सुगुणांचे
संपत्तीच्या—मकरंदाच्या हो ! ते आशेचे.
आत्मनिरीक्षण करा, तुम्हांला तुमचा क्षुद्रपणा
येइल कळुनी क्षणांत सारा जो दे हीनपणा.
स्तुतिगीतांनीं धुंद होउनी गेलीं तुमचिं मनें,
मनुजपणाला विसरुनि जातो मनुज मद्यपानें.

आत्मनिरीक्षण कसें सुचावें गुणच्युत मनाला?—
विषयसेवनासक्त सज्ज कां सुधाप्राशनाला?
आत्मनिरीक्षण तरी कशाला? पहा वर्तनांत,
तुमचें तुम्हां खातें मानस येइल ही प्रचित!
निर्मल असतां मानस तरि कां अधोवदन करितां?
अधोमुखानें निजवृत्तीची जाणिव ही देतां! ॥ २ ॥
"दंग जाहले भृंग गायनीं रंग कसा मग हा?
कोणकोणत्या सुगुणास्तव मग जलसा चाले हा?
गंध तनूचा असेल मोहक अहो! मिलिंदांनो!
परि शीलाची दुर्गंधी कां न कळे मूर्खांनो!
अंगकांतिची प्रभा फांकली असेल मधुपांनो!
बहिरंगावृत अंतरंग कां दिसे न अंधांनो?
विभव तयांचें पूर्णेंदूला जरीहि दिपवील
अंत:शोधक सुधीजनां तें तरि कां खुलवील?" ॥३॥

काळ करी जों निजनयनांची एक उघडझांप
पुष्प गळालें एक तेथलें तों आपोआप;
म्लान मुखानें वरी पाहुनी पश्चात्तापांत
जीवज्योती विलीन झाली वातावरणांत;
खेळ संपला घटिकेचा तो लटिका सर्वस्वीं
कुठें बंधु तो, कुठें भृंग वा कांती तेजस्वी?
उघडया तोंडीं जावा चिमण्या प्राण पांखराचा,
तसा पडोनी तिथें राहिला देह हाय! त्याचा!
चैतन्याची भूल तरलतम उडूनियां गेली,
मृदुल मुखाची छवी मनोहर हाय! तदा सुकली!

मधुर साजऱ्या छटा स्मिताच्या गेल्या मावळुनी,
माय मुलाची मूक रोदनें पाहि त्यास वळुनी.
खिन्न जाहलें वदन दुजाचें देखुनि अनुजशव,
मूर्च्छित होउनि ढांसळलें तें त्यावरि निर्जीव;
परस्परांच्या वदनामाजी घालुनियां वदन
प्रेमभरानें परस्परांना घेती कवळून;
शवाशवांचीं प्रेमचेष्टितें कशास तीं आतां ?
आलिंगन हें चुंबन तैसें कशास हो देतां ?
विभवमंदिरीं विहरत असतां जिवंत असतांना
शांतिसुखाचा बोल फुकाचा नाहीं वदलां ना ?
घरोघरीं कां अशींच असती बहिणीभावंडें
ज्वलद्हृदय परि वरुनी ज्यांचीं गोंडस बहु तोंडें ? ॥ ३ ॥

हाय ! हरपलीं कुलभूषण तीं रत्नें बिनमोल,
धुळींत पडले वंशध्वज ते होउनियां मलुल !

—यशवंत.

# तुण्तुण्याची तार.

( चाल: "भक्ति ग वेणी•" या पदासारखी. )

ही दुनियेची दिलध्यार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ध्रु०॥
काय हिच्या ज्वानिची बहारी,
लाज नाचते सर्व शरीरीं,
हात न ठरतो मुळीं हिच्यावरि,
अणुं नव्या नवतिची नार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥१॥
लावण्याची और झळाळी,
कोटि हिऱ्यांहुनि प्रभा आगळी,
बघतां बिजली पडेल काळी,
नजर ही करितसे ठार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ २ ॥
चांफेकळिची काय पाकळी,
जर्द पात केतकिची पिवळी,
लवलवते कीं नागिण गव्हळी,
कीं सोन्याची तलवार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ ३ ॥
हिचें चालणें मराठमोळी,
वर मोत्यांची घाली जाळी,
कसे पितांबरि साडीचोळी,
करि भर्जरिचा शिणगार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥४॥
हिची बांधणी नाजुक पातळ,
जशी रानची कवळी कर्दळ,

करिती पायीं पैंजण झुळमुळ,
बोलणें मऊ गुळजार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ ५ ॥
ओझरता जों होइ स्पर्श न,
तोंच उसळती तिच्या मुखांतुन
सूर मनोहर; कारंजांतून—
जशि उचंबळे जलधार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ ६ ॥
सदा लागला पंचमीं गळा,
झरा वाहतो जसा खळखळा,
झुरत बैसल्या वनीं कोकिला,
आश हिच्या सुखाची झार । तुण्तुण्याचि माझ्या तार॥७॥
हिचा ऐकतां सूर जनानी,
जंगलच्या थांबतात हरिणी,
गुरें विसरती चारापाणी,
वनिं नाचति मैना मोर । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ ८ ॥
मंद पडे ओढयाची झुळझुळ,
वाऱ्याची थांबते धांवपळ,
आनंदानें नाचति सळसळ,
हीं शेतें हिरवींगार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ ९ ॥
खडकामधुनी पाझर फोडिल,
वठलीं झाडें क्षणीं पालविल,
मातीमधलीं प्रेतें उठविल,
ही अद्भुत जादूगार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ १० ॥
हिच्या सुराची अशी धडाडी,
ठाणबंद कीं काठेवाडी,

जशी धांवते अब्लख घोडी,
बैसतां तिच्यावर स्वार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥११॥
सरळ होतसे भुवइ वांकडी,
उलगडते काळजांतिल अढी,
सरसावतसे पुढतीं मांडी,
परिसतां हिचा झंकार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥१२॥
हिच्या सुरानें पळते भीती,
तटतटुनी ही फुगते छाती,
अवसानाची उसळे भरती,
करि धैर्य मनीं संचार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ १३ ॥
नसानसांतुनि रक्त उसळवी,
दंडावरती सरवी बाही,
मुर्दाडाचा मर्द करी ही,
रणधीर वीर झुंजार ! तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ १४ ॥
आपलपोटेपणा वितळवी,
कर्तबगारी उरीं उपजवी,
माणुसकीला मनीं जागवी,
विसरवी पार वरदार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ १५ ॥
रुसणें फुगणें ठाउक नाहीं,
कुणी विचारा तिजसी कांहीं;
गुलगुल बोले मैनाबाई,
करितसे तसा दिल गार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥१६॥
तुटल्यावरतीं हिला जोडणें,
भगवंताविण कुणी न जाणें,

विस्कळल्यावर कसा गुंफणें
इष्काचा फिरुनी हार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥१७॥

एक दिलाचें एकच गाणें,
खड्या सुरानें अक्षय म्हणणें,
ह्यावांचुनि ती दुसरें नेणे,
सत्यांत तिचा निर्धार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ १८ ॥

ओबडधोबड माझीं गाणीं,
त्यांत आपुली सुरेल वाणी
मिसळुनि दुनिया टाक भारुनी,
देवी ! हा तुजवरी भार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥१९॥

उदो ! उदो ! त्रैलोक्यमोहिनी !
तूंच सारजे विश्वस्वामिनी !
एकनिष्ठ गोंधळी तुझा मी,
भवदर्यांतुनि मज तार । तुण्तुण्याचि माझ्या तार ॥ २० ॥

प्रल्हाद केशव अत्रे.

# मोगऱ्याचीं फुलें.

( चाल–'सुवर्णकेतकिपरि जो दिसतो०' )

धन्य मोगरा धारण करि जो कवित्रयींच्या शुभ नामा;
जसे मोगरे, शब्द तयांचे प्रसन्न देती आरामा !
रसना ज्यांची रसाळ सरिता संतकवींची प्रिय कन्या,
मित्रवरा ! तूं जरी न देहीं अमर गिरा तव ती धन्या !
जेव्हां जेव्हां फुले मोगरा, वाटे तो तव कविच खरा !
प्रसन्नवदनें बर्णी तो तव सुवर्णकृतितिल दिव्य हिरा !
जशीं मोगरीं अंतर्यामीं हांसति बाह्यांतरीं, तशी
द्राक्षापाकासमान कविता तुझी निर्मला गुणराशि !
काय भाग्य तव फुला मोगऱ्या कविकुलगुरु तूं पुष्पांचा,
म्हणुनी शिरसावंद्य रसज्ञा महिला गणती तुज साचा !
असा मोगरा कविंचा कवि जो निर्मि तयातें नमन करूं !
सदा मोगऱ्यापरी सरलता गोंडस त्याचें हास्य वरूं !
झुळुक तयाच्या सौगंधाची श्वास हरीचा दिव्य खरा !
तत्पदकमलीं भक्तवृन्द तो भक्तिरसाचा विमल झरा !

रामराव बाळकृष्ण कीर्तिकर.

# कर्तव्य-पथ.

हा जीवितसागर तरण्या, जाहलों सज्ज अभिमानें
लांकडी मोडकीं भांडीं, बनविलीं बहू यत्नानें !
संबोधीं प्रेमभरानें, त्यांना नौका नांवानें !
डबक्याला सागर म्हटलें !
काजव्या सूर्य लेखीलें !
पाषाणा देवहि केलें !
मग तसाच पोहत सुटलों, अभिमानें अंधहि झालों ! ॥ १ ॥
या खुळचट फोल उपायीं, हा सागर तरणें नाहीं
परि सत्य सदा कोणाला, अनुभवविण पटणें नाहीं !
प्रत्येक आपुली दिवटी, ओवाळुनि अपुणा घेई !
या अशा घोर अंधारीं
काजवा चकचके भारी !
झुडुप रुक्षतेमाझारीं !
पाहुनी वाटतें सकलां—वृक्षांचा राजा पहिला ! ॥ २ ॥
मोजिली कुणीं कां लांबी, आजवरी आकाशाची ?
केली कां गणती कोणीं, या वरच्या ग्रहमालेची ?
कळली कधिं जगतीं कोणा, मर्यादा सूक्ष्म जिवांची ?
हें शक्य सकल जरि झालें,
पाषाण देव जरि बनले,
परिमाणू सजीव उठल,
तरि जीवित-सागर तरण्या, सामर्थ्य नसे हो कोणा ! ॥ ३ ॥
" यत्नांची करुनी नौका, ओलांडूं सागर घोर
प्रेम-दुवे ते गुंफोनी, पलिकडलें गांठूं तीर."

वल्गना अशा या करुनी, मांडिला किती बाजार !
पाण्यांत जाउनी पडले,
मग तिथें किती धडपडले !
हृदयाचें पाणी झालें !
सकलांना मग हें कळलें, बळ अपुलें कोतें पडलें ! ॥ ४ ॥

जरि जाणें अपुल्या हातीं, येणें तें दैवाधीन !
पाऊल चुकीचें पडलें, परतुनि मग घेइल कोण ?
भवसागर असतां तेथें, तळमळती मानव-मीन !
सागरीं भटकती स्वैर,
उरला ना मुठि त्यां जोर !
दैवाचा बसला मार !
मग कितीक गेले खालीं, गणती ना त्यांची झाली ! ॥ ५ ॥

उर्मीच्या अंकावरती, पोहुनि कुणि लीला करिती !
खालीं जे बुडती मरती, त्यां पाहुनि वरचे हसती !
समजती मनीं ते मूर्ख, ही प्रचंड अमुची शक्ती !
तों उलट्या लाटा येती !
शक्तीची पडते भ्रांती !
मग निमूट खालीं जाती !
मग कळतें तेव्हां त्यांना—शक्ती ना तरण्या कोणा ! ॥ ६ ॥

लाटांचा चाले खेळ, वर कोणी, कोणी खालीं !
हा मार्ग रेखला सारा, करणी ना कांहीं अपुली !
जरि दिसे स्पष्ट सकलांला, खात्री ना त्यांची झाली !
म्हणती ते—"आम्ही थोर;
दैवाचा कुठला जोर ?

यत्नांनीं करुं त्या जेर !"
जा, खुशाल दैवासंगें, झुंजा हो अपुल्या अंगें ! ॥ ७ ॥
अधिकार कर्मणी अमुचा, नच मुठि तो साध्यावरती !
स्वेच्छेनें करुं तें आम्ही, कर्तव्य दिसे जें पुढती !
मग तशांत मृत्यू आला, आनंदें सोडूं जगती !
प्राक्तन जेथें नेईल
त्या स्थलीं हृदय जाईल !
जी स्थिती पुढें येईल,
आनंदें राहुनि तेथें, करुं हो निजकर्तव्यातें ! ॥ ८ ॥
तूं थोर आससी दैवा! नच माझा तुजशीं वाद;
मी अपुल्या कर्तव्याशीं, निशिदिनीं करिन संवाद !
स्वर्गीं वा नरकीं गेलों, त्याचा ना मोद, न खेद !
यत्नांला यश न मिळालें,
कांहींही संकट आलें,
मरण जरी तें ओढवलें–
तूं पुरतें दैवा जाण, मी नच रे परत फिरेन ! ॥ ९ ॥
आशेचा भंगहि होणें, ही कसोटीच मनुजांची !
यत्नांना अपयश येणें, पायरी भावि उन्नतिची !
एकेक या अपयशानें–खचते शक्ती दैवाची !
हें पुरतें जाणें म्हणुनी
भय नसे मला या भुवनीं !
कर्तव्य सदा मी करुनी,
आनंदें भेटिन तेथें, येईल त्या प्रसंगातें ! ॥ १० ॥

नारायण केशव बेहेरे.



१९९

REFBK 0001969

REFBK-0001969